

मासिक वार्तापत्र • अंक 27 • जून 2022 • सहयोग मूल्य - रु. 10 • 16 पाने

# कामगार बिगुल

नव्या समाजवादी क्रांतीचा उद्घोषक

काश्मिरमध्ये हिंसाचारात पुन्हा वाढ: मोदी सरकारचे दावे फोल 4

ओबीसी राजकीय आरक्षण: ओबीसी भांडवलदारांना लूटीत वाटेकरी बनवण्याची धडपड! 7

राजद्रोहाच्या दमनकारी कायद्याला वाचवण्यासाठी मोदी सरकारची धडपड 9

## साम्राज्यवादी युद्धामुळे जगभर महागाईचा कहर

### महागाईने कामगार-कष्टकरी बेहाल, जगभरातील भांडवलदार तरीही मालामाल

### मोदी सरकारने लादली जनतेवर अभूतपूर्व महागाई!

**संपादक मंडळ**

गेल्या महिन्याभरात भारतासहीत जगातील अनेक देशांमध्ये महागाईने कहर केला आहे. या विरोधात विविध देशांमध्ये जनतेची तीव्र आंदोलनेही सुरू झाली आहेत. महागाईने नेहमीप्रमाणेच कामगार-कष्टकऱ्यांचे जगणे असह्य करून टाकलेले असले तरी भांडवलदार वर्गाचे काही हिस्से या स्थितीतही अधिक मालदार होतच चालले आहेत.

#### जगभरात महागाईचा कहर

जगातील अनेक देशांमध्ये महागाईचा कहर दिसून येते आहे. एप्रिल मध्येच ब्रिटन मध्ये महागाई दर 9 टक्क्यांवर गेला होता, स्पेनमध्ये व अमेरिकेत (सहसा 2 टक्क्यांच्या आसपास असणारा महागाईचा दर) 8.3 टक्क्यांवर, जर्मनीत 7.4 टक्के, ब्राझीलमध्ये तर तब्बल 12 टक्क्यांवर गेला होता. वाढत्या महागाईमुळे भारतातच नाही तर जगभरामध्ये कामगार वर्गावर संकट ओढवले आहे. इंग्लंड-अमेरिकेसारख्या तथाकथित "विकसित" देशांमध्येही आई-वडील स्वत: कमी खाऊन मुला-बाळांना दोन घास जास्त खाऊ घालण्यास मजबूर झाले आहेत,

भारतातही हा दर (ग्राहक किंमत सूचकांक) एप्रिलमध्ये 7.79 टक्के होता. भारतात भाजीपाल्याचे दर 15 टक्क्यांनी, मसाले 10.5 टक्क्यांनी, मांस-मासे 7 टक्क्यांनी, तृणधान्य 6 टक्क्यांनी, इंधन 11 टक्क्यांनी महागले आहे. गेल्या वर्षभरातच देशात गॅसच्या किमती 25 टक्क्यांनी वाढल्या आहेत. भारतात घाऊक महागाईचा दर गेल्या वर्षभरापासून सतत 10 टक्क्यांच्या वर राहिला आहे आणि सध्या तो 15 टक्क्यांवर गेलेला आहे. महागाई ही तशी नेहमीचीच परिघटना आहे, परंतु मोदी सरकारच्या गेल्या पाच वर्षांमध्ये गहू, तांदूळ, तूर, मूग, मसूराचे दर किमान 20 टक्के वाढले आहेत, खाद्यतेलांचे दर तर 100 टक्क्यांपर्यंत वाढले आहेत, भाज्यांच्या दरामध्ये 60 टक्क्यांपेक्षा जास्त, आणि अगदी मीठाच्या किमतीतही 20 टक्क्यांहून जास्त वाढ झाली आहे, आणि यातच सध्या चालू असलेल्या जागतिक महागाईने मोठी भर टाकली आहे. परिणामी गरिबांच्या ताटातून एकेक करून वस्तू गायब होत आहेत!

#### महागाई वाढण्यात साम्राज्यवादातून जन्मलेल्या रशिया-युक्रेन युद्धाचा वाटा

प्रचंड प्रमाणात संचित झालेल्या भांडवलाला गुंतवणूक व बाजाराकरिता, आणि वर्तमान व भविष्यातील आर्थिक व भौगोलिक सुरक्षिततेकरिता अधिकाधिक भूभागांवर प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष नियंत्रण हवेच असते. याचाच परिणाम आहे दुसऱ्या महायुद्धानंतर अमेरिकेने जगावर थोपवलेली असंख्ये लहान-मोठी युद्धे. 1991 मध्ये सोवियत साम्राज्यवादी रशियाचे पतन झाल्यानंतर आज रशिया-चीनच्या गटामधील भांडवलदार वर्ग पुन्हा या साम्राज्यवादी स्पर्धेकरिता स्वत:ला लायक मानू लागल्यानंतर जगातील ही स्पर्धा तीव्र झाली आहे. परिणाम आहे रशियाने युक्रेनवर थोपवलेले युद्ध.

महागाई वाढण्यामागे प्रमुख कारण निश्चितपणे तेल आणि गॅसचे वाढते दर आहेत, ज्यामागे एक प्रमुख कारण युक्रेन-रशिया युद्ध आहे. रशिया जगातील प्रमुख तेल-गॅस उत्पादकांपैकी आहे आणि युद्धामुळे रशियातून होणारा पुरवठा प्रभावित झाला आहे. दुसरीकडे अमेरिकेच्या

पान 6 वर

## ज्ञानवापी मशीद प्रकरण: कामगार वर्गीय दृष्टिकोन

**✎ निखिल**

देशात कामकरी जनता महागाई, बेरोजगारी आणि गरिबीने अत्यंत त्रस्त असतांना किंबहुना तसे असल्यामुळेच धार्मिक उन्माद आणि ध्रुवीकरण वाढवणाऱ्या अनेक मुद्यांमध्ये भर घालत जुनाच असलेला ज्ञानवापी मशिदीचा मुद्दा परत एकदा बाहेर काढला गेला आहे. बाबरी मशिदीनंतर ज्ञानव्यापी मस्जिद, मथुरा मशीद, ताजमहाल, कुतुबमीनार अशी अनेक धार्मिक आणि ऐतिहासिक ठिकाणं परत एकदा मंदिर-मशीद वादासंदर्भात वादाच्या घेऱ्यात ढकलली जात आहेत. सोबतच संघपरिवाराकडून अशा नवनवीन मुद्यांचा दिवसागणिक आविष्कार सुद्धा केला जात आहे. हे सर्व मुद्दे कामकरी जनतेच्या आजच्या जिवंत प्रश्नांना मूठमाती देण्याचे आणि जनतेत फुटीचे विष कालवण्याचे काम करत आहेत. अशा स्थितीत ह्या मुद्द्यासंबंधातील कामगार वर्गीय दृष्टिकोन स्पष्ट करणे आणि अशा फॅसिस्ट मोहिमांना योग्य प्रतिउत्तर देण्यासाठी कामगार वर्गाने सजग व सज्ज होणे अत्यंत आवश्यक आहे. अशा अनेक धर्मवादी प्रश्नांसंदर्भात `फायर ब्रिगेड अप्रोच' सोडून एकंदरीत फॅसिझम विरोधी संघर्षाच्या कार्यक्रमाबद्दलही गांभीर्याने विचार करावा लागेल.

#### ज्ञानवापी प्रकरण नक्की काय आहे?

1980 च्या दशकात देशातील भांडवल संचयाचे संकट गडद झालेले असतांना तोपर्यंत राजकारणाच्या परिघावर असणाऱ्या प्रतिक्रियावादी फॅसिस्ट शक्तींचा उभार सुरू झाला. ह्या काळात आर्थिक संकटावर पडदा टाकण्याचे काम व जनअसंतोषाला भरकटवण्याचे काम राम मंदिर आंदोलन आणि मंडल आयोग आंदोलनाने केले. तसेच राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि त्यांची राजकीय आघाडी भाजप कडून देशात हिंदु मुस्लिम वाद पेटवण्यासाठी अनेकाअनेक मुद्दे उपस्थित केले जाऊ लागले. हिंदुत्ववादी शक्तींकडून 1991 मध्ये काशी विश्वनाथ मंदिर आणि ज्ञानवापी मशीद वादाची सुरवात करण्यात आली. वाराणसी येथील जिल्हा न्यायालयामध्ये एक याचिका दाखल करण्यात आली. या याचिकेमध्ये वाराणसी शहरामधील चौक परिसरात असणारी ज्ञानवापी मशीद ही अनधिकृत असल्याचा दावा करण्यात आला होता. मशिदीच्या जागी आधी मंदिर होतं आणि मुघल बादशाह औरंगजेबने आपल्या कार्यकाळामध्ये हे मंदिर पाडून येथे मशीद बांधल्याचा दावा या याचिकेत करण्यात आला. 1992 सालीच बाबरी मशीद पाडल्यानंतर विश्व हिंदु परिषदेने 'अयोध्या तो झाँकी है, काशी- मथुरा बाक़ी है' नारा दिला होता. ही सर्व आंदोलने भडकत असताना तत्कालीन कॉंग्रेस सरकारांची भुमिका ही मूक समर्थकाची होती.

परंतु कॉंग्रेसप्रणित सरकार चालवणाऱ्या, आणि जनतेच्या असंतोषाला उजवे वळण लावणाऱ्या भांडवलदार वर्गाला हे सुद्धा समजत होते की अशा मुद्यांना नियंत्रित ठेवणे गरजेचे असते. असे अनियंत्रित विस्फोट अराजकाकडे जाऊन बाजारालाही अस्थिर करू शकतात व भांडवल संचयात बाधाही बनू शकतात. ह्या मुद्द्यांमुळे तत्कालीन सरकारची राजकीय कोंडी सुद्धा होत होती त्यामुळे तत्कालीन सरकारने 1991 मध्येच प्रार्थना स्थळे (विशेष तरतुदी) अधिनियम पारित करून

पान 15 वर

# वाढते तापमान, पूर, दुष्काळ!

पान 8 वरून

भांडवलशाही व्यवस्थेचे स्वरूप असे आहे की तेथे एकाच वेळी धूम्रपान बंदी, दारूबंदी विषयी 'जनजागृती' आणि विडी-सिगारेट-दारूच्या ब्रँड्सचीही जाहिरात व विक्री केली जाते. भांडवलशाही व्यवस्थेत प्रत्येक समस्येचे निराकरण स्वतःच एक समस्या बनते. कीटकनाशके-रसायनांचे दुष्परिणाम टाळण्यासाठी 'ऑरगॅनिक फूड' ला चालना दिली जाते आणि बघता बघता त्याचा एक मोठा उद्योग निर्माण होतो, 'स्वच्छ ऊर्जा' ह्या नावाखाली सौरऊर्जा, पवनऊर्जा निर्मिती या क्षेत्रांत महाकाय देशी-विदेशी मक्तेदार घरे जन्माला येतात, थोडक्यात नफा कमविण्याचे नवे क्षेत्र विकसित होते, ज्यामध्ये पुन्हा पर्यावरणाला अमर्याद ओरबाडण्याच्या समस्येला दुर्लक्षिले जाते. भांडवलशाही उत्पादन पद्धतीचा अराजकता हा एक आवश्यक अंतर्निहित घटक आहे. भांडवलशाही नफ्याच्या तीव्र स्पर्धेतील भांडवलदारांना त्यांच्या नफ्याव्यतिरिक्त इतर कसलाही विचार करण्याची मुभा देत नाहीत, मानवतेच्या दूरगामी भविष्याची तर नाहीच नाही!

### एन.जी.ओ., भांडवली सरकार प्रणित 'पर्यावरण प्रेमाची' भंपकता आणि भांडवलदारांच्या चुकांचे खापर सामान्य जनतेवर फोडण्याचे 'षडयंत्र'!!

कॉर्पोरेट कंपन्यांच्या, उद्योगसमूहांच्या भिकेवर आपला धंदा चालवणारे एन.जी.ओ (गैर सरकारी संस्था) लोकांना **झाडे लावा, टाकाऊ उपभोग्य संस्कृती टाळा, नद्या स्वच्छ करा, तलाव आणि जंगले वाचवा, प्लास्टिक वापरू नका इत्यादी उपदेशाचे डोस देत राहतात व असे भासवतात की पर्यावरणाच्या ऱ्हासाला माणसांच्या वाईट सवयी किंवा यांत्रिकीकरण, आधुनिकीकरण जबाबदार आहे. अशा प्रकारे खरा गुन्हेगार पडद्याआड दडवला जातो आणि 'पापांचा घडा' फोडला जातो सामान्य जनतेच्या डोक्यावर!**

भांडवलदारांच्या भिकेवर विसंबून राहणाऱ्या 'अभिजात भिकाऱ्यांच्या' या संस्था "पर्यावरण-सुधारणावाद" चा मुखवटा घालून भांडवलशाहीच्या मायाजालाला वस्तुच्या रूपाने प्रत्यक्षात विकतात. ते भांडवलशाही व्यवस्थेची सुरक्षा-रेषा, सेफ्टी वॉल्व्ह आणि स्पीड ब्रेकर म्हणून काम करतात. या एन.जी.ओ ब्रँड स्वतःवर पुरोगामीपणाचे आवरण चढवून कोणताही मोबदला न देता जनतेकडून भांडवलशाहीने केलेली घाण साफ करवून घेतात. सामान्य लोकांच्या "वाईट सवयीं" मुळे पर्यावरणाचे नाममात्र नुकसान होते, (आणि त्या वाईट सवयी भांडवलदारांनीच त्यांच्या मालाची विक्री करून नफा मिळविण्यासाठी निर्माण केल्या आहेत) पर्यावरणाचे बहुतांश नुकसान भांडवलशाही उत्पादन पद्धती, अनियंत्रित - अराजक उत्पादन, खनिजांचे शोषण, जीवाश्म इंधन, नफ्याच्या शर्यतीतून जन्माला आलेली विनाशकारी युद्धे आणि युद्धसामग्री निर्मितीचे सर्वात मोठे जागतिक उद्योग यांतून होत आहे.

**येत्या काही वर्षांत नफेखोर भांडवली दैत्याच्या विळख्यातून पर्यावरणाला सोडवले नाही तर पृथ्वीवरील सजीव सृष्टीचा विनाश अटळ आहे!** भांडवली सरकार, भांडवली व्यवस्थेचे पाईक जे उत्पादनापासून तुटलेले आहेत, हे काम करणार नाहीत, हे काम फक्त तो कामगार वर्गच करू शकतो, ज्याची उत्पादनाद्वारे निसर्गाशी जैविक नाळ बांधलेली आहे. पृथ्वी येणाऱ्या पिढ्यांच्या हातात सुरक्षित सोपविण्यासाठी, मानवतेचा संहार होण्यापासून वाचवण्यासाठी कामगार-कष्टकरी, सामान्य जनतेला आपली वर्गीय एकजूट बनवत कामगारांना आणि निसर्गाला तिन्ही त्रिकाळ ओरबाडणाऱ्या भांडवलशाहीचे थडगे बांधणे आणि स्पर्धेच्या नव्हे तर सहकार्याच्या, नफ्याच्या नव्हे तर न्यायपूर्ण वाटणीच्या, शोषणाच्या नव्हे तर प्रत्येकाला विकासाची संधी देण्याच्या तत्त्वावर आधारित कामगार वर्गाची सत्ता स्थापन करण्याशिवाय दुसरा पर्याय शिल्लक नाही!

## कामगार बिगुलच्या दरवाढीबद्दल

**साथींनो, कामगार बिगुलची किंमत जून 2022 च्या अंकापासून रु. 10 करण्यात येत आहे.**

भांडवली वर्तमानपत्रे भांडवलदारांनी दिलेल्या कोट्यवधी रुपयांच्या जाहिरातींच्या माध्यमातून आपल्या अंकाची किंमत कमी ठेवतात आणि बदल्यात भांडवलदार वर्गाचे गोडवे गातात. कामगार वर्गाचे वर्तमानपत्र मुख्यत्वे फक्त कामगार वर्गाने दिलेल्या निधीतूनच चालू शकते. कामगार बिगुल करिता लेखन करणारे सर्व लेखक, पत्रकार आणि याच्या छपाईपासून ते वितरणापर्यंत कामात सामील होणारे विविध कामगारवर्गीय कार्यकर्ते हे सर्व काम विनामोबदलाच करत आलेत, आणि कामगार वर्गीय राजकारणाच्या प्रचाराचे काम असेच झालेही पाहिजे. परंतु छपाई आणि वितरणासारखे खर्च मात्र करावेच लागतात.

गेली 7 वर्षे अंकाची किंमत रु. 5 होती. गेल्या जवळपास दोन वर्षांपासून अंक छपाईची किंमत रु. 5 च्या वर गेली होती आणि फक्त कामगारवर्गाने दिलेल्या अतिरिक्त सहयोगाच्या जोरावरच कामगार बिगुलचे अंक छापले जात होते. परंतु गेल्या वर्षभरात इतर सर्व महागाईसोबतच कागद, छपाई आणि वितरणाच्या खर्चाने सुद्धा सर्व मर्यादा ओलांडल्या आहेत आणि अंकाची किंमत नाईलाजाने रु. 10 करावी लागत आहे. कामगार बिगुलच्या नियमित वाचकांना आणि सहयोगीदारांना आवाहन आहे की जर जनतेचा पर्यायी मीडीया उभ्या करण्याच्या, कामगार वर्गाच्या क्रांतिकारी वर्तमानपत्राच्या गरजेला आपण समजत असाल तर कामगार बिगुलला जास्तीत जास्त आर्थिक सहयोग नक्की करावा. भांडवलदारांनी दिलेल्या निधीवर नव्हे, तर जनतेच्याच जोरावर आजपर्यंत कामगार बिगुल प्रसिद्ध होत आहे, आणि आम्हाला विश्वास आहे की आपल्या साथीने यापुढेही होत राहील.

## बिगुल व्हॉट्सअॅप चॅनेल

**जर तुम्ही आमच्याशी व्हाट्सअॅप वर जोडून घेऊ इच्छिता, तर या लिंक वर जाऊन आमचा व्हॉट्सअॅप चॅनेल जॉईन करावा :**

**http://www.marathi.mazdoorbigul.net/whatsapp**

**चॅनेल जॉईन करण्यामध्ये काही समस्या असेल तर या नंबर वर आपले नाव आणि जिल्हा लिहून पाठवावा : 9892808704**



**बुर्झ्वा वृत्तपत्रे भांडवलाच्या विशाल ढिगांच्या बळावर चालतात, कामगारांची वृत्तपत्रे स्वतः कामगारांनी गोळा केलेल्या पैशावर चालतात.**

**लेनिन**

साथींनो

'कामगार बिगुल' आपले स्वतःचे वृत्तपत्र आहे. हे वृत्तपत्र अधिक चांगले बनवण्यासाठी आपल्या सूचनांचे आम्ही स्वागत करतो. त्याच बरोबर आपण जर देशभरातील कामगारांपर्यंत आपल्या कारखान्यातील, ऑफिस मधील परिस्थिती, मालक वर्गाकडून केली जाणारी लूट, संसदीय राजकीय पक्षांचा श्रीमंत धार्जिणेपणा, पोलिस व मालकांच्या खाजगी गुंडांकडून केले जाणारे अत्याचार, तुमच्या रहिवासी वस्त्यांमधील खराब परिस्थिती, शिक्षण, आरोग्य यांसारख्या सुविधांचा अभाव इत्यादी विषयी आपली मतं पोहचवू इच्छित असाल तर आम्हाला आपले लेख किंवा प्रतिक्रिया पाठवू शकता. आपण आम्हाला खालील पत्त्यावर पत्र पाठवू शकता किंवा फोन करून सुद्धा संपर्क साधू शकता.

•रूम नंबर 209, हिरानंदानी बिल्डिंग-7-बी, लल्लुभाई कंपाऊंड, मानखुर्द (वेस्ट) मुंबई 400043 मो. - 9619039793, 9082861727

• अहमदनगर : 74992 64646

• पुणे : 8669735643

## 'कामगार बिगुल'चे स्वरूप, उद्देश आणि जबाबदाऱ्या

**1. 'कामगार बिगुल' व्यापक कष्टकरी जनतेमध्ये क्रांतिकारी राजकीय शिक्षक व प्रचारकाची भूमिका पार पाडेल. हे वृत्तपत्र कामगारांमध्ये क्रांतिकारी वैज्ञानिक विचारधारेचा प्रचार करेल आणि खऱ्याखुऱ्या सर्वहारा संस्कृतीचा वाहक बनेल. हे वृत्तपत्र जगभरातील क्रांत्यांचा इतिहास आणि त्यांच्यातून घ्यावयाचे शिक्षण, आपल्या देशातील वर्ग संघर्ष, कामगार चळवळीचा इतिहास आणि त्यातून घ्यावयाचे धडे यांच्याशी कामगार वर्गाला परिचित करेल. त्याच बरोबर समस्त भांडवली अफवा-दुष्प्रचारांचा भांडाफोड करेल.**

**2. 'कामगार बिगुल' भारतीय क्रांतीचे स्वरूप, मार्ग आणि समस्यांविषयी क्रांतिकारी कम्युनिस्टांमध्ये चालणाऱ्या विविध चर्चा नियमित रुपात छापेल आणि देश-विदेशातील राजकीय घटना आणि आर्थिक परिस्थितीचे योग्य विश्लेषण मांडून कामगार वर्गाला शिक्षित करण्याचे काम करेल.**

**3. 'कामगार बिगुल' स्वतः अशा चर्चा चालवेल जेणे करून कामगारांचे राजकीय शिक्षण होईल. तसेच त्यांच्यामध्ये योग्य राजकीय कार्यदिशेची समज विकसित होऊन ते क्रांतिकारी पार्टी बनवण्याच्या प्रक्रियेमध्ये सहभागी होऊ शकतील आणि त्यातून व्यवहारामध्ये योग्य कार्यदिशेच्या सत्यापनाचा आधार तयार होऊ शकेल.**

**4. 'कामगार बिगुल' कामगार वर्गामध्ये राजकीय प्रचार आणि शिक्षणाचे कार्य चालवत सर्वहारा क्रांतीच्या ऐतिहासिक जबाबदारीशी त्याला परिचित करेल, त्याला आर्थिक संघर्षांसोबतच त्याच्या राजकीय अधिकारांसाठी लढायला शिकवेल, चार आणे-आठ आण्याच्या किरकोळ आर्थिक लढायांमध्ये कामगारांना अडकावून टाकणाऱ्या नकली कम्युनिस्टांपासून आणि भांडवली राजकीय पक्षांचे शेपूट असलेल्या किंवा व्यक्तिवादी-अराजकतावादी ट्रेड युनियन्स पासून सावध करत त्याला हरतऱ्हेच्या अर्थवाद व सुधारवादाविरुद्ध लढायला शिकवेल, त्याच बरोबर त्यांच्यात सच्ची क्रांतिकारी चेतना निर्माण करेल. 'कामगार बिगुल' सर्वहारा वर्गाच्या फळ्यांमधून क्रांतिकारकांची भरती करण्याच्या कामात सहाय्यक बनेल.**

**5. 'कामगार बिगुल' हे वृत्तपत्र कामगार वर्गाचा क्रांतिकारी शिक्षक, प्रचारक आणि आवाहनकर्ता ह्या भूमिकांबरोबरच क्रांतिकारी संघटनकर्ता व आंदोलनकर्त्याची भूमिका सुद्धा पार पाडेल.**

## कामगार बिगुल

खाजगी वितरणासाठी

संपादक मंडळ : निखील एकडे, बबन ठोके

संपादकीय कार्यालय : रूम नंबर 209, हीरानंदानी बिल्डिंग - 7-बी, लल्लुभाई कम्पाउण्ड, मानखुर्द (वेस्ट), मुंबई 400043

संपर्क : 8669735643 , 9619039793

ईमेल : kamgarbigul@gmail.com

सहयोग राशी : रु. 10 (एका अंकासाठी)

वार्षिक : रु. 120 (टपाल शुल्काशिवाय)

# फौजदारी प्रक्रिया (ओळख) कायदा

## जनतेच्या लोकशाही नागरी अधिकारावरील नवीन हल्ला

✎निखिल

फौजदारी प्रक्रिया (ओळख) विधेयक 2022 संसदेच्या दोन्ही संदनांमध्ये पारित होऊन आणि राष्ट्रपतींच्या सहीने लागू झाले आहे. भाजप कडून केंद्रात सत्तेत आल्यापासून राज्यसत्तेच्या दमनकारी यंत्रणेची धार वाढवणारे विविध कायदे पारित केले गेलेले आहेत. ह्या माध्यमातून सशस्त्र दल आणि त्यांच्याशी संलग्न अन्वेषण संस्थांचे अधिकार क्षेत्र जनतेच्या लोकशाही-नागरी अधिकारांना अजून कोरू शकतील ह्याची तजवीज करण्यात आलेली आहे.

भारत देश इंग्रजांपासून राजकीय दृष्ट्या स्वतंत्र झाला परंतु स्वातंत्र्य लढ्याला नेतृत्व देण्याचे काम काँग्रेसच्या माध्यमातून भारतीय उदयोन्मुख भांडवलदार वर्गाने केले. स्वातंत्र्यानंतर देशात अस्तित्वात आलेली वैधानिक, कायदेशीर आणि प्रशासनिक यंत्रणा देशी भांडवलदार वर्गाच्या हितांच्या अनुषंगाने थोड्याफार बदलांसकट मुख्यत्वे इंग्रजी सत्तेअंतर्गत जशी होती तशीच स्वीकारली गेली. पुढे वेळप्रसंगी अशा कायद्यांना अजून जास्त जनविरोधी आणि जुलमी बनवण्याचे कामही करण्यात आले. त्याचेच एक उदाहरण कैदी ओळख कायदा सुद्धा आहे. **आधी 'कैदी ओळखेच्या' नावाखाली केवळ हातापायांचे ठसे वा छायाचित्रापुरते नमुने घेण्याच्या अधिकारापुरता मर्यादित असलेला कैदी ओळख कायदा 1920 आता रद्द झालेला आहे. नवे विधेयक आरोपी, संशयित, प्रतिबंधात्मक कारवाई अंतर्गत ताब्यात असलेले किंवा आरोप सिद्ध झालेले ह्यात कुठलाही भेद करत नाही. जमा केलेला सर्व तपशील राष्ट्रीय गुन्हेगारी व नोंदणी विभागाकडे गोळा होणार आहे.**

### इंग्रजी कायद्यापेक्षाही जास्त जुलमी आणि प्रतिगामी नवीन कायदा

कैदी ओळख कायदा 1920 या नावाने अस्तित्वात असलेल्या कायद्यात, न्यायालयाने एक वर्ष किंवा त्याहून अधिक शिक्षा ठोठावलेले दोषी यांचे तसेच फौजदारी प्रक्रिया संहिता कलम 118 अंतर्गत चौकशीसाठी ताब्यात घेतलेल्या व नंतर सोडून दिलेल्या व्यक्तीच्या हातापायांचे ठसे आणि छायाचित्र घेण्याचा अधिकार तपास यंत्रणेला दिला होता. इंग्रज नक्कीच ह्याचा वापर मुख्यत्वे जनआंदोलन आणि क्रांतिकारकांच्या विरोधात करत होते. नवीन कायदा तर त्यापेक्षाही जास्त प्रतिगामी व जुलमी असा कायदा आहे. आतापर्यंत लागू असलेल्या इंग्रजकालीन कायद्यांतर्गत फक्त बोटांचे, पायांचे ठसे आणि फोटोग्राफ घेतले जाणे शक्य होते, भाजपने आणलेल्या या कायद्यानुसार व्यक्तींच्या बोटांचे ठसे, तळहात व तळपायाचे ठसे, छायाचित्र, आयरिस व रेटिना स्कॅन (डोळ्यांचा स्कॅन), रक्त, वीर्य, लाळ व इतर शारीरिक-जैविक नमुने आणि त्यांचे परीक्षण, संबंधित व्यक्तीच्या वर्तणुकीशी संबंधित गुणधर्म ज्यात स्वाक्षरी, हस्ताक्षर इत्यादी किंवा फौजदारी प्रक्रिया संहितेमधील कलम 53 किंवा 53अ मध्ये निर्देशित केलेले कुठलेही परीक्षण करणे शक्य करण्यात आलेले आहे. आधी असे नमुने संकलित करण्याचे अधिकार, तपासाचा अधिकार असलेल्या पोलीस उपनिरीक्षक किंवा त्याच्या पेक्षा वरिष्ठ अधिकाऱ्यांना देण्यात आलेला होता; पण आता हेड कॉन्स्टेबल, जेल वार्डन सुद्धा हे सर्व नमुने घेऊ शकतील. आधी मर्यादित असलेले हे नमुने फक्त शिक्षा पूर्ण होण्यापर्यंत ठेवले जात होते, पण आता ते 75 वर्ष (म्हणजेच व्यक्ती जिवंत असेपर्यंत) ठेवण्यात येतील. आधी या नमुन्यांद्वारे मिळवलेली माहिती स्थानिक पोलीस ठाण्यात ठेवली जात असे, पण आता ही सर्व माहिती राष्ट्रीय गुन्हे माहिती-संकलन संस्थे (एन.सी.आर.बी.) कडे राहील व देशात कुठेही ही माहिती मुक्तपणे दिली जाऊ शकेल. आधी कुठलेही मोजमाप किंवा नमुन्याच्या संकलनासाठी व विश्लेषणासाठी त्याचा केसच्या साक्षीशी संबंध असणे आवश्यक होते, पण आता मॅजिस्ट्रेटच्या संमतीने केससोबत संबंध नसलेले नमुने सुद्धा घेतले जातील.

सोबतच कायद्याची भाषा नेहमीप्रमाणेच अनेक अर्थ काढता येतील अशी आहे. असे का केले जाते ते एकदम स्पष्टच आहे. कायद्यातील अनेक शब्दांना किंवा सरकारच्या अधिकारांना कोटेकोरपणे स्पष्ट न करता यंत्रणांना अनेक अलिखित अधिकार दिले जातात. तसेच अधिकार ह्या कायद्याअंतर्गत पोलिसांना देण्यात आलेले आहेत. **उदा., नमुने कशाचे घेतले जाऊ शकतात हे सांगतांना त्यांची व्याख्या न करता अत्यंत व्यापक शब्दांचा प्रयोग केला गेला आहेत; उदा., कायद्यात शारीरिक-जैविक नमुने, संबंधित व्यक्तीच्या वर्तवणुकीशी संबंधित नमुने म्हटले गेले आहे त्यानुसार तुमच्याकडून कुठलाही नमुना मागितला जाऊ शकतो.** अधोरेखित करण्यासारखी गोष्ट ही आहे की सुप्रिम कोर्टाने अशा चाचण्यांना 2010 मध्ये अमानवीय आणि पिडादायक म्हटले होते. परंतु ह्या कायद्यात मनोवैज्ञानिक परीक्षण सुद्धा मोडते. म्हणजे तपास यंत्रणांकडून आरोपीला नार्को टेस्ट, पोलिग्राफी टेस्ट ह्यासारख्या अनेक टेस्ट करायला भाग पाडले जाऊ शकते. तुम्ही गुन्हेगार असा किंवा नसलात तरी पोलीस मागतील ते सर्व अत्यंत खाजगी असे नमुने देणे आता तुमच्यावर बंधनकारक असणार आहे. असे नमुने देणे कोणीही नाकारल्यास ते जबरदस्तीने घेतले जातील व नकार देणाऱ्या व्यक्तीवर सरकारी कामात अडथळा आणल्याची कार्यवाही केली जाईल. ह्यात **तुम्हाला पोलिसांनी कुठल्याही कारणाने फक्त स्थानबद्ध केले असेल तरीही तुमचे नमुने मागितले जाऊ शकतात!**

या कायद्याचे उद्दिष्टच आहे की सरकार विरोधात लढणाऱ्यांना अजून जरब बसवली जावी. आजही देशात असंख्य आंदोलने रोज होतात ज्यात आंदोलक स्थानबद्ध होतात आणि सोडले जातात. आत तुम्ही गुन्हा केला असो वा नसो, तुमच्यावर आरोप असोत वा नसोत, कोणत्याही कारणाने तुम्हाला स्थानबद्ध जरी केले गेले तरी तुमच्या बद्दलची सर्व "बायोमेट्रिक" माहिती गोळा करून ना फक्त खाजगीपणाच्या अधिकारावर आक्रमण केले जाईल, तर भविष्यात या माहितीचा सर्वप्रकारे गैरवापर करून तुम्हाला बदनाम करणे, खोटे आरोप लावणे, **तुमची "प्रोफाईल" बनवून तुम्हाला "चिन्हीत" करणे याकरिता सुद्धा केला जाईल, आणि तुमचे सामान्य नागरी जीवनसुद्धा उध्वस्त केले जाईल ही भिती जनतेच्या मनात रुजवणे हे या कायद्याचे खरे उद्दिष्ट आहे.**

ह्या सर्वातून हे स्पष्टच आहे की ह्या कायद्याच्या माध्यमातूनही अनेक तथाकथित मूलभूत अधिकारांना धाब्यावर बसवले जाणार आहे. जसे की गोपनियतेचा अधिकार आणि सन्मानाने जीवन जगण्याचा अधिकार अजून पायदळी तुडवला जाणार आहे. फौजदारी प्रक्रिया (ओळख) कायदा हा **1920 साली इंग्रजांनी बनवलेला एक कायदा आज 2022 साली अजून जाचक बनवला गेला आहे** ह्यातून आजच्या भांडवली सत्तेबद्दल काय स्पष्ट होते हे समजणे महत्त्वाचे आहे.

### भांडवली राज्यसत्तेचे दमनकारी चरित्र

1947 साली जनलढ्याचा परिणाम म्हणून देशात सत्तांतर झालं आणि इंग्रजी वसाहत म्हणून भारताची मुक्तता झाली पण राजकीय सत्ता मात्र देशातील भांडवलदार वर्गाच्या ताब्यात आली. साहजिकच ही सत्ता दमनकारीच राहिली. इंग्रजकालीन अनेक दमनकारी कायदे जसेच्या तसे अमलात राहिले. पुढे अनेक दमनकारी कायद्यांची भरही ह्यात घालण्यात आली. पण आजच्या भांडवली संकटाच्या काळात जनतेच्या संभाव्य दबावाला चिरडण्यासाठी आवश्यक सर्व यंत्रणेला अजून सुसज्ज करण्यात येत आहे. देशातील भांडवलदार वर्ग फॅसिस्ट हिंदुत्ववादी गुंड टोळ्यांच्या रस्त्यावरील दहशतीला अनौपचारिक राज्यसत्तेच्या स्वरूपात वापरतो सोबतच औपचारिक राज्यसत्तेच्या यंत्रणेला दमनासाठी अजून जास्त सुसज्ज करत आहे. सांप्रतच्या काळात देशात आधीच अस्तित्वात असलेल्या जुलमी कायद्यांचा सुद्धा अत्यंत सढळ हाताने वापर केला जात आहे. जसे की मागील तीन वर्षात यूएपीए कायद्याअंतर्गत 4690 लोकांना अटक करण्यात आली त्यातील 139 लोकांना शिक्षा झाली. 2016 ते 2019 दरम्यान राज्यद्रोहाच्या कायद्याअंतर्गत अटकेचे प्रमाण 160 % वाढले आहे; परंतु शिक्षेचा दर 3% पेक्षाही खाली राहिलेला आहे. 2010 ते 2020 या काळात बघितले तर तब्बल 10,938 इतके राजद्रोहाचे खटले दाखल केले गेले. यामध्ये मोदी सत्तेत आल्यानंतर, 2014 नंतर, प्रतिवर्षी 28 टक्के इतक्या वेगाने वाढ झालेली आहे. ह्यात अटक झालेल्यामध्ये सगळ्यात मोठी संख्या त्याच राजकीय-सामाजिक कार्यकर्त्यांची आहे जे जनविरोधी सरकारचा किंवा हिंदुत्ववादाचा प्रतिकार करत आहेत किंवा जनतेच्या लोकशाही-नागरी अधिकारांसाठी किंवा कामकरी जनतेच्या वर्गीय आर्थिक-राजकीय हक्कांसाठी लढत आहेत. ह्यात पत्रकार, ट्रेड युनियन कार्यकर्ते, क्रांतिकारी मार्क्सवादी कार्यकर्ते, लेखक, शिक्षक, विद्यार्थी, लोकशाही-नागरी अधिकार कार्यकर्ते, संघर्षशील दलित-आदिवासी-मुस्लिम इत्यादी लोकं आहेत. ही सर्व लोकं खरेतर सरकारचाचे जनविरोधी चरित्र समोर आणण्याचे काम किंवा त्याचा प्रतिकार करण्याचे काम करत आहेत.

ह्या संदर्भात संसदेत विरोधी पक्षांनी फक्त दिखाऊ विरोध केला. संसदेत काँग्रेस कडून माजी गृहमंत्री पी.चिदंबरम ह्यांनी ह्या कायद्याचा दुरुपयोग कशा पद्धतीने होऊ शकतो ह्या बद्दल तोकडी भूमिका मांडली. पण स्वतः काँग्रेसने असे कित्येक दमनकारी कायदे स्वतः पारित केले, टिकवले आणि विरोधी कार्यकर्त्यांच्या विरोधात सढळ हाताने वापरले जसे की टाडा, रासुका इत्यादी. चिदंबरम यांची स्वतःची ह्यात मोठी भूमिका राहिलेली आहे. संसदेत ह्या कायद्याचा प्रस्ताव आणतांना भाजप कडून सर्व तथाकथित संसदीय मर्यादांचेही उल्लंघन करण्यात आले. असे अनेक कायदे भाजप सरकारने पारित करून घेतले जसे की रासुका मधील जनविरोधी संशोधन इत्यादी. पण सुप्रिम कोर्टाने भाजपने आणलेल्या अशा एकाही कायद्यांना असंविधानिक ठरवलेले नाही. त्यामुळे आताही कोर्टाकडूनही तशी अपेक्षा केली जाऊ शकत नाही.

मूलतः एक खरी कामगार वर्गीय सत्ताच अशा दमनकारी सर्व कायद्यांना निरास्त करू शकते परंतु तोपर्यंत ह्यांच्या विरुद्धचा संघर्ष तीव्र करावा लागेल. स्वातंत्र्यपूर्व काळात ब्रिटीश सत्तेने ह्या सारख्या अनेक कायद्यांचा वापर सतत जनलढे व क्रांतिकारकांच्या दमनासाठीच केला. स्वातंत्र्यानंतर भांडवलदार वर्गाच्या प्रामाणिक प्रतिनिधीचे काम करणाऱ्या काँग्रेस सरकारने या कायद्यांना जपलेच नाही, तर वेळोवेळी विरोधकांच्या दमनासाठी त्यांचा वापरही केला. लोकशाही आणि उदारवादाचा बुरखा घालणाऱ्या काँग्रेसनेच स्वतः टाडा, रासुका सारखे कायदे बनवले आणि लागू केले. आज प्रधानमंत्री वा मुख्यमंत्र्यांबद्दल अनुद्गार (!) काढल्यासारख्या घटनांवरूनही अनेकांविरोधात अनेक गंभीर गुन्हे दाखल झालेले आहेत. विरोधक राजकीय नेते, पत्रकार, बुद्धीजीवी, लेखक आणि विद्यार्थ्यांवर अशा प्रकारच्या खटल्यांचे मोठे प्रमाण हेच दर्शवते की राज्यसत्तेला आता लोकशाहीचा दिखावी बुरखा सुद्धा नकोसा होत आहे.

अशा सर्व कायद्यांच्या आणि सर्व प्रकारच्या दमनाविरोधात आज आवाज उठवणे, लोकशाही-नागरी अधिकारांच्या रक्षणार्थ उभे राहणे आपले कर्तव्य आहे. कोणाच्याही लोकशाही-नागरी अधिकारांवर गदा किंवा कुठल्याही पद्धतीने दमन (फॅसिस्ट, धर्मांध, जातीयवादी शक्तींचे दमन सोडून) होत असेल तर त्याचा विरोध करणे हे कामगार वर्गाचे कर्तव्य आहे. भांडवली संकटाच्या काळात व्यवस्थेचे संकट विस्फोटक स्थितींकडे जाऊ नये म्हणून सत्ताधारी वर्ग आज जनतेच्या मूलभूत अधिकारांनाही हिरावू बघतो आहे कारण ह्याच दैन्य, दारिद्र्य, कुपोषण, असमानता, अन्यायाच्या ज्वालामुखीच्या तोंडावर अय्याशी करणाऱ्या भांडवलदार, मालक व उच्च मध्यमवर्गाला ह्या धगधगत्या लाव्हाच्या विस्फोटाची शंका व भिती नेहमीच असते व ह्या व्यवस्थेच्या अंतापर्यंत ती असणारही आहे. सतत असे अधिकाधिक दमनकारी कायदे पारित होत जाणे आणि अशा अनेक काळ्या कायद्यांचा वापर वाढण्याचे मूलभूत कारण हे आहे की आज भांडवली संकटाच्या काळात बेरोजगारीचा दर उच्चांक गाठत असताना, महागाईने शिखर गाठलेले असताना, समाजातील वस्तुगत स्थिती विस्फोटक बनत असतांना भांडवली राज्यसत्तेची दमन यंत्रणा चुस्त-दुरुस्त करण्याचे काम सत्ताधारी वर्गाने द्रुतगतीने चालू ठेवलेले आहे. अशा परिस्थितीत या व्यवस्थेतील सर्वात शोषित वर्ग व त्यामूळेच व्यवस्थाविरोधी संघर्षाची सर्वात जास्त गरज असणारा वर्ग म्हणून, लोकशाही-नागरी अधिकारांवर होणाऱ्या प्रत्येक हल्ल्यांविरोधात कामगार व कष्टकरी वर्गाने अत्यंत निग्रहाने संघर्ष केला पाहिजे.

# काश्मिरमध्ये हिंसाचारात पुन्हा वाढ: मोदी सरकारचे दावे फोल

निमिष

2019 मध्ये, दुसऱ्यांदा सत्तेत आल्यावर मोदी सरकारने 5 ऑगस्ट 2019 रोजी कलम 370 निकामी करण्याचा निर्णय घेताना अमित शहांनी लोकसभेत दिलेल्या भाषणात मोठ्या वल्गना केल्या होत्या. **युवकांना रोजगार, काश्मीरचा विकास, दहशतवाद संपवणे, असे अनेक दावे केले गेले होते, आणि मोदी सरकारच्या इतर सर्व दाव्यांप्रमाणे हे देखील खोटेच ठरणार होते.** काश्मिरमधील गेल्या काही महिन्यांमधील घडामोडींनी हे पुन्हा सिद्ध केले आहे. रोजगार आणि विकास तर लांबच राहिले, काश्मिरमध्ये पुन्हा एकदा हिंसाचाराचे सत्र चालू झाले आहे, अजूनही जम्मू-काश्मीरमध्ये विधानसभेची निवडणूक देखील झालेली नाही. पूर्वी कॉंग्रेस करत असे, त्याप्रमाणेच भाजपने देखील कधी अमरनाथ यात्रेचे कारण पुढे करून तर कधी सुरक्षेचे निमित्त करून निवडणुका पुढे ढकलल्या गेल्या आहेत. काश्मीरमधील अनेक मोठे क्षेत्रीय नेते भारतीय सैन्याच्या नजरकैदेत अजूनही बंद आहेत.

**भाजपने केवळ निवडणूक, मतदान, अशा रूढार्थाने जम्मू-काश्मीर मधील लोकशाही काढून घेतली आहे एवढेच नव्हे, तर सर्वच लोकशाही व नागरी स्वातंत्र्य आणि अधिकार लष्करी बुटांखाली चिरडून टाकले आहेत.** प्रत्येक 30 नागरिकांमागे एक इतक्या मोठ्या प्रमाणावर तिथे सशस्त्र फौजफाटा तैनात आहे. ह्या प्रचंड सैन्यशक्तीच्या दहशतीखाली आज काश्मीरचा सामान्य नागरिक जगत आहे. अभिव्यक्ती स्वातंत्र्य तर नाहीच, साधे घरातून बाहेर पडण्याचे स्वातंत्र्य देखील राहिलेले नाही. काश्मीरच्या प्रेस क्लब वर सैन्य पाठवून मोदी सरकारने प्रेस क्लबचा बळजबरीने ताबा घेतला आहे, त्यामुळे काश्मीर मधील वास्तवाच्या बातम्या आणि वृत्तांकन देखील काश्मीरच्या बाहेर पडणे अशक्यप्राय झाले आहे. सातत्याने काश्मीरमध्ये इंटरनेट व सोशल मीडिया बंद केले आहेत.

काश्मिरी जनतेला विचारात, विश्वासात, आणि निर्णयप्रक्रियेत सामिल करून न घेता अतिशय तडकाफडकीने मोदी सरकारने कलम 370 निकामी केले. त्यानंतर मोठा फौजफाटा लावून प्रचंड दहशत आणि दडपशाही केली. ह्या सगळ्याचा रोष काश्मिरी जनतेमध्ये आजही आहे, परिणामी तिथे हिंसेचे प्रमाण प्रचंड वाढले आहे. आज काश्मिर भारतीय राज्यसत्तेकडून होणारे सामान्य काश्मिरींचे दमन, त्याविरोधातील काश्मिरी जनतेची दगडफेकीसारखी प्रतिक्रिया आणि इस्लामी दहशतवाद्यांकडून हल्ले अशा तिहेरी हिंसेला तोंड देत आहे. मोदी सरकारने काश्मीरमधील हिंसा आणि दहशतवाद संपल्याचा कितीही गाजावाजा केला तरी काश्मिरमध्ये असंतोष कायम आहे. उदाहरणार्थ, जुलै 2021 मध्ये एकट्या श्रीनगरमध्ये 17 सशस्त्र हल्ले झाले. ऑक्टोबर 2021 मध्ये झालेल्या सशस्त्र हल्ल्यांमध्ये 33 नागरिक मृत्युमुखी पडले होते. अशीच हिंसेची आणखी एक लाट गेल्या काही दिवसांत काश्मीरमध्ये पसरली आहे.

7 मार्चला श्रीनगरच्या एका बाजारात काही दहशतवाद्यांनी ग्रेनेड हल्ला केला होता, ज्यात 2 नागरिकांना जीव गमवावा लागला होता. 9 मार्चला श्रीनगरच्या एका गावाचे सरपंच समीर अहमद भट ह्यांना दहशतवाद्यांनी ठार मारले होते. त्यानंतर 16 मार्चला श्रीनगरमध्येच पुन्हा चकमक झाली ज्यात 3 दहशतवादी मारले गेले. 3 एप्रिल ह्या एकाच दिवशी श्रीनगरच्या विविध भागात 4 सशस्त्र हल्ले झाले ज्यात प्रवासी कामगार आणि काश्मिरी हिंदूंना लक्ष्य केले गेले. 3 व 4 एप्रिलला पुलवामामध्ये घडलेल्या दोन हल्ल्यांमध्ये चार प्रवासी कामगारांवर गोळीबार करण्यात आला होता. 5 एप्रिलला श्रीनगरच्या माईसुमा भागात झालेल्या हल्ल्यात एक सीआरपीएफ जवान मृत्युमुखी पडला आणि सहा जखमी झाले. त्याच दिवशी ह्याच हल्लेखोरांनी एका हिंदू नागरिकावर गोळीबार देखील केला. 14 एप्रिलला काश्मीरच्या दक्षिणेतील शोपियामध्ये झालेल्या चकमकीत 4 दहशतवादी आणि 3 जवान मारले गेले. 22 एप्रिलला बारामुल्लामध्ये झालेल्या प्रदीर्घ चकमकीत 4 दहशतवादी मारले गेले. 6 मेला झालेल्या चकमकीत 3 दहशतवादी मारले गेले. 14 मेला शोपियामध्ये दहशतवादी आणि सैन्यामध्ये झालेल्या चकमकीत शोएब गनाई ह्या 20-वर्षीय तरुणाचा नाहक बळी गेला आहे. 18 मे रोजी बारामुल्ला येथील एका दारूच्या दुकानात दहशतवाद्यांनी केलेल्या बॉम्बस्फोटात 3 जण जखमी झाले तर 1 मृत्यू झाला आहे. 24 मे रोजी श्रीनगर मध्ये झालेल्या सशस्त्र हल्ल्यात एका पोलिसाची हत्या करण्यात आली होती. 25 मे रोजी अभिनेत्री अंबरीन भट हिच्या घरावर केलेल्या गोळीबारात त्या अभिनेत्रीचा मृत्यू झाला व तिच्या भाच्याला जखम झाली आहे. त्याच दिवशी बारामुल्ला मध्ये पोलिसांशी झालेल्या चकमकीत 3 दहशतवादी व एक पोलीस मारले गेले आहेत. हिंसेच्या ह्या लाटेतील सर्वात महत्त्वाच्या दोन घटना म्हणजे 13 मे रोजी चदूरा येथे तहसीलदार कार्यालयात काम करणाऱ्या राहुल भट ह्या काश्मिरी पंडिताची झालेली हत्या, आणि 25 मे रोजी फुटीरतावादी नेता यासिन मलिकला झालेली जन्मठेपेची शिक्षा.

यात हे लक्षात घेतले पाहिजे की, गेल्या वर्षी ऑक्टोबरमध्ये व ह्या वर्षी मार्चपासून काश्मीरमध्ये जी हिंसा होते आहे तिच्या निशाण्यावर प्रामुख्याने गैर-मुस्लिम व गैर-काश्मिरी लोक, व त्यातही प्रवासी कामगार, पंचायतींचे व सरकारचे अधिकारी व कर्मचारी, तसेच भारतीय सैनिक व पोलीस आहेत. ह्याचे एक मुख्य कारण आहे कलम 370 निकामी केल्यानंतर काश्मीरच्या नागरिकत्वाचे नियम शिथिल केले जाणे. त्यामुळे काश्मीरमध्ये उद्योगधंदे सुरु करणे, जमीनजुमला विकत घेणे हे काश्मीरबाहेरील, म्हणजेच गैर-काश्मिरी लोकांना शक्य झाले. काही गैर-काश्मिरी लोकांनी काश्मीरमध्ये छोटे-मोठे धंदे सुरु देखील केले. बारामुल्लामधील ज्या दारूच्या दुकानात बॉम्बहल्ला झाला ते दुकान गैर-काश्मिरी मालकाचे होते. फेब्रुवारी 2021 मध्ये अशाच एका हल्ल्यात 'कृष्णा ढाबा' ह्या हॉटेलचे मालक आकाश मेहरा मारले गेले, तेसुद्धा गैर-काश्मिरीच होते. परंतु, असे करून मोदी सरकार हे काश्मीरची जनसंरचना (demography) बदलून टाकणार आहेत, व काश्मीरमध्ये काश्मिरींनाच, आणि मुख्यत्वे काश्मिरी मुसलमानांना अल्पसंख्याक बनवून टाकणार आहेत अशी भीती इस्लामी संघटनांनी पसरवायला सुरु केली. भारतीय राज्यसत्तेबद्दल काश्मिरी जनतेला पहिल्यापासूनच प्रचंड अविश्वास होताच. त्यातूनच अशा तऱ्हेचे षडयंत्र सिद्धांत बळकट होत गेले, आणि त्याचा परिणाम आहेत हे हल्ले.

**काश्मिरमध्ये इस्लामी कट्टरतावादी संघटनांची वाढती शक्ती हे सुद्धा यामागील महत्त्वाचे कारण आहे.** 'द रेजिस्टन्स फ्रंट' ह्या संघटनेने ह्यातील बहुतांशी हल्ल्यांची जबाबदारी घेतली आहे, आणि ही संघटना लष्कर-ए-तोयबा ह्या दहशतवादी संघटनेचीच एक आघाडी आहे. झालेले हल्ले हे सुसंघटित हल्ले आहेत आणि या हल्ल्यांमधून धर्मद्वेष देखील स्पष्टपणे दिसून येत आहे. यातून दिसून येते की इस्लामी कट्टरतावादी सशस्त्र संघटनांकडे खोऱ्यातील तरुणांचा ओढा वाढतो आहे. एखाद्या भागात सशस्त्र चकमक झाली कि त्या भागातून सशस्त्र संघटनांमध्ये होणारी भरती ही त्या चकमकीत मारल्या गेलेल्या हल्लेखोरांपेक्षा बरीच जास्त असते आणि त्यामुळे ती चकमक निरर्थकच ठरते असे सरकारच्याच 2018 सालच्या एका अहवालात नोंदवले आहे. 8 जुलै 2016 ला बुरहान वाणीची हत्या झाल्यानंतरच्या दोन वर्षांमध्ये पोलिसांनी 121 सशस्त्र दहशतवाद्यांची हत्या केली (ह्यातील सर्वच इस्लामी कट्टरतावादी असतीलच असे नव्हे, भारतीय सत्ता मात्र सगळ्यांचेच असुरीकरण करण्यासाठी सगळ्यांनाच इस्लामी कट्टरतावादी असल्याचा शिक्का मारून टाकते). ह्याच काळात खोऱ्यातील 216 तरुण सशस्त्र संघटनांमध्ये भरती झाले. मोदींच्या सगळ्या भाडोत्री भाटांनी काश्मीरमधील दहशतवाद संपल्याचे कितीही ढोल बडवले तरी जमिनीवरील वास्तव हे असे आहे.

तिसरे म्हणजे ह्या **इस्लामी कट्टरतावाद्यांना आता शासनयंत्रणेतील लोकांचा देखील पाठिंबा आहे, असे दिसून येते आहे.** दहशतवाद्यांनी राहुल भटच्या कार्यालयात जाऊन त्याच्यावर गोळ्या झाडून त्याची हत्या केली व पसार झाले. राहुल भट कोण होता, काय करत होता, कार्यालयात कुठे बसत होता ह्याची अचूक माहिती त्यांना अगोदरच होती. मार्चमध्ये दोन पोलीस कॉन्स्टेबल आणि तीन सरकारी कर्मचारी (एक कॉम्प्युटर ऑपरेटर, एक शिक्षक, आणि आरोग्य खात्यातील एक ऑर्डर्ली) 'दहशतवाद्यांशी संबंधित असल्यामुळे' बडतर्फ केले होते. जम्मू काश्मीरमधील सरकारी यंत्रणेत, व पोलिसांमध्ये देखील जमात-ए-इस्लामी ह्या इस्लामी कट्टरतावादी संघटनेने मोठ्या प्रमाणावर हातपाय पसरले असल्याचे माजी रॉ प्रमुख अमरजित सिंग दुलत ह्यांनी 'द वायर' पत्रिकेला दिलेल्या मुलाखतीत म्हटले आहे.

चौथे म्हणजे, इस्लामी कट्टरतावाद्यांच्या ह्या हल्ल्यांना जनतेत वाढती सहानुभूती मिळत आहे. ह्यातील अनेक संघटनांना पाकिस्तान व इतर देशांमधून धनाचा व मनुष्यबळाचा पुरवठा होत असतो हे खरे आहे. पण ह्या संघटनांमध्ये होणारी स्थानिकांची भरती वाढत आहे. तसेच स्थानिक या संघटनांना माहिती पुरवून, आसरा देऊन, किंवा त्यांच्या कारवायांना मूक राहून सहानुभूती व साहाय्य करतात. एके काळी केवळ काश्मीरच्या सीमेकडील भागांमध्ये होणारे सशस्त्र हल्ले आता श्रीनगरसारख्या काश्मीरच्या मध्यवर्ती शहरांमध्ये देखील मोठ्या प्रमाणावर होऊ लागले आहेत, हे देखील त्याचेच द्योतक आहे.

काश्मीरच्या खोऱ्यातील ह्या अशांततेवर भारताच्या राज्यसत्तेने कसा प्रतिसाद दिला आहे? ह्या प्रश्नाच्या उत्तरातून भारतीय राज्यसत्ता आणि सध्या सत्तेत बसलेली फॅसिस्ट भाजप ह्या दोघांचेही वास्तव आपल्यासमोर स्पष्ट होईल.

ऑक्टोबरमध्ये माखन लाल बिन्द्रू आणि आता राहुल भट ह्या दोन काश्मिरी पंडितांची गेल्या काही महिन्यात दहशतवाद्यांनी हत्या केली आहे. ह्या हल्ल्यांमुळे खोऱ्यातील काश्मिरी पंडितांमध्ये भीतीचे वातावरण आहे. 1990 मध्ये झालेल्या दंगलीत देखील सरकारी कर्मचारी आणि काश्मिरी पंडितांना मोठ्या प्रमाणावर लक्ष्य बनवले गेले होते. त्या दंगलीमुळे काश्मीर पंडितांचे खोऱ्यातून मोठ्या प्रमाणावर विस्थापन व पलायन झाले होते. त्यानंतर 2008 मध्ये काश्मिरी पंडितांना पुनर्स्थापित करण्याचा प्रयत्न म्हणून काश्मिरी पंडितांसाठी 'प्रधानमंत्री विशेष रोजगार योजना' सुरु करण्यात आली ज्याद्वारे विस्थापित काश्मिरी पंडितांना काश्मीरमध्ये सरकारी नोकऱ्या व संरक्षित परिसरात घरे दिली गेली. ह्या योजनेचा फायदा ज्यांनी घेतला त्यातील बहुसंख्य काश्मिरी पंडित विस्थापित झाल्यानंतर जम्मूला वास्तवास गेलेले आहेत. आता होणाऱ्या हल्ल्यांमध्ये इतिहासाची पुनरावृत्ती होत असल्याची भीती काश्मिरी पंडितांना आहे. त्याचमुळे राहुल भटची हत्या झाल्यानंतर त्यांनी आंदोलन केले. 'आम्हाला इथे सुरक्षित वाटत नाही. सरकारने आमच्या सुरक्षेची हमी द्यावी अन्यथा आम्हाला दुसऱ्या सुरक्षित ठिकाणी नोकरी द्यावी' अशी मागणी त्यांनी केली. सरकारी कर्मचारी असलेल्या शेकडो काश्मिरी पंडितांनी राजीनामा देखील दिलेला आहे. परंतु, **भारतभरात काश्मिरी पंडितांच्या नावाने गळे काढण्याची एकही संधी न सोडणाऱ्या भाजपच्या सरकारने ह्या काश्मिरी पंडितांवर निर्दयीपणे लाठीमार आणि अश्रूधुराचा मारा केला**! आंदोलन सुरु झाल्यानंतर बाराव्या दिवशी राज्यपालांना आंदोलनकर्त्या काश्मिरी पंडितांना भेट देऊन यायची बुद्धी झाली आहे! राज्यपालांशी झालेली चर्चा अयशस्वी झाल्याने आंदोलन आणखी तीव्र करणार असल्याचे काश्मिरी पंडितांनी म्हटले आहे! हाच आहे भाजपचा खरा चेहरा! जाहीरपणे गंगेच्या नावाने टाहो फोडायचा, आणि गंगेसाठी लढणाऱ्या कार्यकर्त्यांना तुरुंगात डांबून ठेवायचे, दुर्लक्षून मारायचे, गंगा स्वच्छ करण्याच्या योजनेतील कोट्यवधी रुपये दुसऱ्या खात्यांकडे वळवायचे; जाहीरपणे गायींना डोक्यावर घेऊन नाचायचे, बीफवरून कत्तली, दंगली करणाऱ्यांना कवटाळायचे, आणि बीफच्या बड्या कंपन्यांकडून गडगंज देणगी घ्यायची, गोशाळांचे अनुदान काढून घेऊन हजारो गायींना मरायला मोकळे सोडायचे हेच भाजपने आजवर केले आहे, व काश्मिरी पंडितांच्या बाबतीत देखील हेच होताना दिसत आहे.

काही दिवसांपूर्वी काश्मिरी पंडितांच्या पलायनावर **'द काश्मीर फाईल्स' नावाचा सिनेमा प्रदर्शित झाला होता. हा चित्रपट काश्मीरी पंडितांच्या पलायनाची घटना अतिशय अर्धवटपणे, एकांगीपणे व भडकपणाने दाखवतो आणि सर्वच काश्मिरी**

**पान 5 वर**

# मोदी सरकारच्या काळात पत्रकारांवर वाढते हल्ले, “गोदी” मीडियाचा उच्छाद!

अविनाश

आज जागतिक पातळीवर नफ्याच्या घसरत्या दराच्या संकटामुळे संपूर्ण जग आर्थिक मंदीचा सामना करत आहे. ज्यामुळे जगात सगळीकडे कट्टर उजवे/फॅसिस्ट पक्ष सत्तेत येत आहेत. त्याचाच परिणाम म्हणजे जनतेवर आणि इमानदार पत्रकारांवर दमनाचा वरवंटा फिरत आहे. कमिटी टू प्रोटेक्ट जर्नलिस्ट्स (CPJ) च्या वार्षिक गणनेनुसार 1 डिसेंबर 2021 पर्यंत जगभरात तब्बल 293 पत्रकार आपल्या कामामुळे जेलमध्ये बंद आहेत. आणि हे सततचे सहावे वर्ष आहे जेव्हा **250 पेक्षा जास्त पत्रकार तुरुंगांत आहेत. याच परिघटनेचे एक भीषण रूप भारतात बघायला मिळत आहे.**

नुकत्याच आलेल्या ग्लोबल मीडिया वॉचडॉग, रिपोर्टर्स विदाउट बॉर्डर्स (आरएसएफ) द्वारे प्रसिद्ध नवीन रिपोर्टनुसार, 2022 च्या जागतिक प्रेस स्वातंत्र्य निर्देशांकात 180 देशांच्या यादीत भारताचा क्रमांक घसरून 150 झाला आहे. गेल्या वर्षीच्या रिपोर्टमध्ये भारत 142 व्या स्थानावर होता. जागतिक प्रेस स्वातंत्र्य निर्देशांकाचा उद्देश-ज्याला ते दरवर्षी प्रसिद्ध करतात- “गेल्या कॅलेंडर वर्षांत 180 देशांतील आणि क्षेत्रांतील पत्रकार आणि मीडिया द्वारे प्राप्त प्रेस स्वातंत्र्याची तुलना करणे आहे”. तसे तर या रिपोर्ट्सच्यासुद्धा बऱ्याच कमतरता आहेत परंतु तरीसुद्धा जागतिक पातळीवरची सामान्य माहिती आणि दिशा याबद्दल ती खूप काही सांगते.

देशांचे आकलन आणि रँक करण्यासाठी आरएसएफ द्वारे वापरली जाणारी कार्यप्रणाली देशांना 0 पासून 100 पर्यंत गुण देते, ज्यात 100 हा आकडा प्रेसच्या स्वातंत्र्याच्या सर्वोच्च शक्य स्तराचे प्रतिनिधित्व करतो आणि 0 सर्वात वाईट. भारताचा 2021 च्या सूचकांकात जागतिक स्कोर 53.4 होता आणि यावर्षी केवळ 41 आहे. याची करणे सुद्धा स्पष्ट आहेत. भारतात फॅसिस्ट मोदी सरकार आल्यानंतर लोकशाहीचा वाव कमी झाला आहे आणि जनतेवर दमन वाढले आहे, तसेच न्यायप्रिय पत्रकारांना सरकार देशद्रोह आणि कायद्याच्या विविध कलमा लावून तुरुंगात टाकत आहे. मोदीच्या नेतृत्वात सरकारने जनतेच्या लोकशाही अधिकारांना दाबण्यासाठी राज्यसत्तेच्या यंत्रणांचा उपयोग कुशलतेने केला आहे. इंटरनेट बंद करण्यापासून विविध पद्धतींनी त्यांच्या विरोधात होणाऱ्या आंदोलनांना दाबण्याचे काम केले आहे. थोडक्यात भारतामध्ये प्रसारमाध्यमांना असलेल्या "स्वातंत्र्यात" घसरण चालूच आहे. ही वाढत्या सरकारी दमनतंत्राचीच निशाणी आहे.

### पत्रकारांवर आणि मीडिया हाउसेसवर हल्ला

राइट्स एंड रिस्क एनालिसिस ग्रुप (आरआरएजी) द्वारे इंडिया प्रेस फ्रीडम रिपोर्ट 2021 नुसार, देशभरात कमीत कमी सहा पत्रकार मारले गेले, 108 पत्रकारांवर हल्ले झालेत आणि 13 मीडिया हाऊस किंवा वर्तमानपत्रांना लक्ष्य केले गेले. यातील नवीन दिल्लीतील अधिकार समूहाच्या एका रिपोर्टमध्ये म्हटल्या गेले आहे की जम्मू आणि काश्मीर, उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश आणि त्रिपुरा यामध्ये सर्वात वर आहेत. अनेक ठिकाणी कमीत कमी 24 पत्रकारांवर कथित रूपात शारीरिक हल्ला केला गेला, त्यांना धमकावले गेले, त्रस्त केले गेले आणि त्यांचे व्यावसायिक काम करण्यापासून त्यांना रोखले गेले. पोलिसांनी त्यातील 17 जणांवर हल्ला केला. यावर्षी 44 पत्रकारांविरुद्ध एफ.आय.आर. नोंदवले गेले, ज्यातील 21 जणांचा एफ.आय.आर. आईपीसी चे कलम 153 अंतर्गत शत्रुत्वाला प्रोत्साहन देण्यासंदर्भात होता. **रिपोर्टर्स विदाउट बॉर्डर्स ने मोदी सरकार वर “मीडिया विरुद्ध खटल्यांचे गुरिल्ला युद्ध सुरु करण्याचा आरोप लावला, ज्यांनी महामारी कव्हरेज मध्ये सत्य सांगितले होते.**” याचा अर्थ आहे की सरकार विरोधात रिपोर्टींग करणाऱ्या प्रसारमाध्यमांना सरकारी यंत्रणांद्वारे, फॅसिस्ट गुंडांद्वारे निशाणा बनवणे मोठ्या प्रमाणात वाढले आहे.

### हिन्दुत्ववादी एजेंड्याला पसरवण्याचे काम करतोय ‘गोदी मीडिया’

तर दुसऱ्या बाजूला मोदी सरकारने आतापर्यंत 130 अब्ज रुपयांपेक्षा अधिक रक्कम केवळ छापील आणि ऑनलाईन माध्यमांतील जाहिरातींवर खर्च केली आहे. ज्याचा परिणाम हा आहे की गेल्या काही वर्षांपासून ‘गोदी मीडिया’चा उदय झाला आहे. यामध्ये सुद्धा टाइम्स नाऊ आणि रिपब्लिक टीवी सारखे मीडिया आउटलेट उघडपणे भाजपचा प्रचार करताना दिसत आहेत. पूर्ण नग्नपणे 'गोदी मीडिया' भाजपच्या समर्थनात नतमस्तक उभी आहे आणि हिंदुत्व व भाजपच्या समर्थनात बातमी बनवत आहेत. अलीकडेच आलेले आकडे या गोष्टीची पुष्टी करतात. **मे 2022 मधील 150 टीवी मीडिया डिबेट पैकी 138 हिन्दू-मुस्लिम मुद्द्यावर होते, 9 भाजप समर्थक तर 3 देशद्रोह कायद्यावर होते.** या भांडवली मीडीयाला, ज्याने आता 'गोदी मीडीया'चे रूप धारण केले आहे, त्याच्या भांडवलदार मालकांनी दिलेले कामच हे आहे की जनतेच्या जीवनाशी जोडलेल्या प्रश्नांवर चर्चा न घडवता, ती अशा मुद्यांवर घडवावी, प्रश्न अशाप्रकारे विचारावेत, “अजेंडा" अशाप्रमारे "सेट्" करावा की जनतेच्या विचारविश्वामध्ये तेच मुद्दे खेळत राहतील जे राज्यकर्त्यांना हवे आहेत. या प्रसारमाध्यमांचे अस्तित्व बातम्या देण्याकरिता नाहीच, तर भांडवलदार वर्गाच्या हितामध्ये, सत्तेच्या हितामध्ये, जनतेचे मत बनवण्याकरिता किंवा बिघडवण्याकरिताच आहे.

### खरे प्रश्न गायब

देशभरात पेट्रोल-डीजेल, गॅस-सिलेंडर आणि खाद्य सामग्रीचे भाव गगनाला भिडले आहेत. **कोरोनानंतर बेरोजगारी अक्राळ-विक्राळ वाढली आहे आणि गरिबीची स्थिती इतकी भीषण आहे की नवीन आकडे सांगत आहेत की जर तुम्ही 25,000 रुपये किंवा त्यापेक्षा जास्त कमावत आहेत तर तुम्ही देशातील वरच्या 10 टक्के लोकसंख्येत सामील आहात. जागतिक भूक निर्देशांकात 116 देशांच्या यादीत 2020 मध्ये 94 व्या स्थानावर असलेला भारत 2021 मध्ये घसरून 101 व्या स्थानावर आला आहे आणि 27.5 गुणांसोबत भारतातील भुकेची पातळी गंभीर आहे. जनतेचे हे सर्व महत्वाचे प्रश्न या भांडवली मीडियामधून पूर्णपणे गायब आहेत, ते यामुळेच.**

अशावेळी ज्या पद्धतीने भांडवली मीडिया भांडवलदार वर्गाचे विचार, तत्वज्ञान आणि संस्कृतीच्या वर्चस्वाला स्थापित करतो, ज्या प्रकारे तो जनतेला आज्ञाधारी, गुलाम आणि स्वतःच्या या स्थितीबद्दल अनभिज्ञ बनवतो आणि "स्वातंत्र्याच्या" एका खोट्या चेतनेचे निर्माण करतो, त्या विरोधात आपण नवीन सर्वहारा क्रांतिकारी पुनर्जागरण आणि प्रबोधनाच्या माध्यमातून एक नवीन क्रांतिकारी विचार, संस्कृती, तत्वज्ञान आणि समाजाची पर्यायी संरचना जनतेसमोर प्रस्तुत करण्याची गरज आहे. जनतेचा स्वतःचा स्वतंत्र पर्यायी मीडिया उभा करण्याची गरज अगदी स्पष्ट आहे.

# काश्मिरमध्ये हिंसाचारात पुन्हा वाढ: मोदी सरकारचे दावे फोल

पान 4 वरून

**मुस्लिम हे पंडितांचे शत्रू होते अशी चुकीची प्रतिमा निर्माण करतो.** वास्तव इतिहासाला मोडून-मुरगाळून त्याआड मुस्लिमद्वेष, आणि डाव्यांबद्दल द्वेष पसरवण्याचे काम कारण्यासाठीच हा चित्रपट बनवला गेला आहे. चित्रपटाचा मुख्य उद्देश म्हणजे काश्मिरी पंडितांच्या शोकांतिकेचा वापर करून घेऊन हिंदुत्ववादाचा प्रसार करणे हाच आहे. त्यामुळेच मोदींपासून सर्व संघी-भाजपायींनी, संघाच्या ‘अंगठेबहाद्दरांनी’ व्हाट्सऍप, फेसबुक इत्यादी समाजमाध्यमांवरून ह्या चित्रपटाचा जोरदार प्रचार केला. चित्रपट संपल्यावर चित्रपटगृहात संघी-प्रेक्षकांनी मुस्लिमविरोधी नारे लावले. भारतात हे असे सगळे सुरु असताना **ह्याची प्रतिक्रिया काश्मीरमध्ये उमटणार होतीच.** मार्चपासून सुरु झालेल्या हिंसेच्या लाटेमागे, आणि त्या हिंसेमागे जनतेच्या वाढत्या सहानुभूतीमागे ‘द काश्मीर फाईल्स’मध्ये केलेले सर्वच काश्मिरी मुसलमानांचे एकाश्मी अमानवी चित्रीकरण देखील कारणीभूत आहे असे काश्मीरमधील अनेक नेत्यांनी म्हटले आहे. **ह्या चित्रपटात केलेले 1990 च्या घटनेचे आणि काश्मिरी मुसलमानांचे चित्रण चुकीचे आहे, व त्याने काश्मिरी पंडितांना काहीही फायदा न होता उलट नुकसानच झाले आहे असे सध्या आंदोलन करत असलेल्या काश्मिरी पंडितांचे म्हणणे आहे. एकंदरीतच, भारतात होत** असलेली झुंडशाही आणि हिंसेची प्रतिक्रिया म्हणून काश्मीरमध्ये गैर-मुस्लिमांवर होणारी हिंसा आणि त्या हिंसेची स्वीकार्यता वाढत आहे.

अशा चिघळलेल्या परिस्थितीत राष्ट्रीय अन्वेषण एजन्सीच्या (National Investigation Agency) विशेष न्यायालयाने जम्मू काश्मीर लिबरेशन फ्रंटचा नेता यासीन मलिकला जन्मठेपेची शिक्षा सुनावली. जम्मू काश्मीर लिबरेशन फ्रंट ही सुरूवातीला एक धर्मनिरपेक्ष संघटना होती. ती सुरुवातीच्या काळात दहशतवादी मार्गाने लढत असली, तरी 1994 मध्ये यासीन मलिकने काश्मीरच्या स्वातंत्र्यासाठी अहिंसेच्या मार्गाने लढणार असल्याची घोषणा केली. नंतर, ऑल पार्टी हुर्रियत कॉन्फरन्स ह्या संघटनांच्या मंचात जम्मू काश्मीर लिबरेशन फ्रंट सहभागी झाली. शिक्षा झालेले प्रकरण यासीन मलिकच्या 1994 अगोदरच्या खरोखर दहशतवादी असलेल्या कारवायांसाठी निधी गोळा केल्याचे नाही, तर 2010 ते 2016 दरम्यान केलेल्या कारवायांबद्दल आहे! त्यात यासीन मलिकवर बेकायदेशीर कृत्ये प्रतिबंधक कायदा (UAPA), राजद्रोह ह्यांसारखे कायदे लावले आहेत. ह्या सगळ्या प्रकरणाबद्दल आणि त्या प्रकरणाच्या निकालाबद्दल देखील काश्मीरच्या जनतेत रोष आहे. 25 मेला कोर्टाचा निकाल आल्यानंतर श्रीनगरमध्ये अनेक ठिकाणी दगडफेक झाली. त्यानंतरच्या तीन दिवसांमध्ये चकमकीच्या अनेक घटना घडल्या, व पोलिसांनी दहा दहशतवाद्यांना ठार मारले आहे. या सर्व घटनाक्रमामागे जम्मू-काश्मिरच्या जनतेसोबत भारत-पाकिस्तानच्या राज्यसत्तांनी सतत केलेला विश्वासघात आहे.

काश्मिरमध्ये पाकिस्तानने सैन्य पाठवल्यानंतर काश्मिरच्या हिंदू राजाने भारतात विलय स्विकारला. परंतु जुनागढ मध्ये भारताने जनतेचे सार्वमत घेतले, त्याचप्रमाणे नेहरूंनी जम्मू-काश्मिर बाबत 1947 मध्ये सार्वमत घेण्याचे आश्वासन दिले होते, पण नंतर पाकिस्तान आणि भारत या दोन्ही सरकारांनी काश्मिरी जनतेचा विश्वासघात केला आणि सार्वमत घेतलेच नाही. याबद्दलचा असंतोष कायम जम्मू-काश्मिरमध्ये धगधगत राहिला. 1987 मध्ये राजीव गांधींच्या नेतृत्वातील काँग्रेस सरकारने दिखाऊ निवडणुका घेत केलेल्या हस्तक्षेपानंतरच मोठ्या प्रमाणावर काश्मिरी जनतेचा उद्रेक झाला. 1988-89 चा उठाव जरी बेरोजगारी, बिघडणारी आर्थिक स्थिती ह्या जनतेच्या वास्तव मुद्द्यांवरून झालेला उठाव असला तरी त्या उठावातूनच सशस्त्र संघटना, कट्टर इस्लामी संघटना ह्यांचा काश्मीरमध्ये शिरकाव झाला. काँग्रेसचीच धोरणे पुढे चालवत, देशी-विदेशी भांडवलदारांना जम्मू-काश्मिरची जमिन मिळावी म्हणून **मोदी सरकारने 370 कलम रद्द केल्यानंतर गेल्या तीन वर्षात काश्मीरच्या युवकांना रोजगार, विकास वगैरे सोडाच, अनिश्चितता, हताशा व निराशेच्या गर्तेत ढकलले आहे.**

काश्मिरी जनतेमध्ये भारतीय राज्यसत्ता आणि सैन्य ह्यांच्याबद्दलचा तिरस्कार टोकाला पोहोचलेला आहे. अशा परिस्थितीत, कामगारवर्गीय क्रांतिकारी शक्ती काश्मीरमध्ये अस्तित्वात नसल्यामुळे, जनतेचा रोष प्रतिक्रियेच्या मार्गाकडे वळत आहे. इस्लामी दहशतवादी संघटनांना सहानुभूती मिळत आहे व जमात-ए इस्लामी सारख्या कट्टर इस्लामी जनसंघटनांचा जनाधार वाढत आहे. असे होताना जगात अनेकदा दिसले आहे. पॅलेस्टाईनमध्ये देखील जनतेची ऊर्जा क्रांतिकारी मार्गाकडे वळवणारी शक्ती अस्तित्वात नसल्याने, किंवा, संपुष्टात आल्याने, हमास सारख्या कट्टर इस्लामी संघटनेचा जनाधार वाढला आहे व आजही वाढत आहे. 2011 मध्ये होस्नी मुबारकची हुकूमशाही सत्ता उलथवून टाकणारे प्रचंड मोठे जनआंदोलन इजिप्तमध्ये झाले, पण तिथेही योग्य मार्गाने तो उठाव पुढे घेऊन जाऊ शकणारी क्रांतिकारी शक्ती अस्तित्वात नसल्याने ‘मुस्लिम ब्रदरहूड’ ह्या इस्लामी संघटनेने सत्ता काबीज केली. काश्मिरच्या सत्ताधारी वर्गातील अब्दुल्ला असोत, मुक्ती किंवा हुर्रियत कॉन्फरस, या सर्वच पक्षांचे भारतीय आणि पाकिस्तानी भांडवलदार वर्गाशी हितसंबंध स्थापित झालेले आहेत. त्यामुळे जनतेचा या सर्वांवरील विश्वासही मोठ्या प्रमाणात उडालेला आहे. अशामध्ये “राष्ट्रवादा”चा अभिनिवेश सोडत, भारत व पाकिस्तान या दोन्ही देशांनी सतत धुडकावलेली सार्वमताची, स्वनिर्णयाची मागणी पूर्ण करणे, हाच जम्मू-काश्मिरच्या राजकीय प्रश्नावर खरा उपाय आहे.

# साम्राज्यवादी युद्धामुळे जगभर महागाईचा कहर

पान 1 वरून

नेतृत्वात युरोपियन देशांनी रशियन तेल-गॅस आयातीवर निर्बंध घातले आहेत. त्यामुळे इतर तेल उत्पादक देशांकडून होणाऱ्या तेल पुरवठ्यासाठी मागणी वाढून तेलाचे भाव वाढले आहेत. सोबतच रशियाने सुद्धा जगातील ओपेक या व्यापारसमुहातील तेल उत्पादक देशांशी हातमिळवणी करून तेलाच्या उत्पादनाच्या वाढीवर मर्यादा आणल्या आहेत आणि युरोपियन देशांसहीत जगावर तेलाची महागाई लादली आहे. डिसेंबर पासूनच कोव्हिडोत्तर मागणीमुळे सतत वाढत असलेला आणि युक्रेन युद्ध सुरू होण्याअगोदर 85 डॉलरवर असलेला, तेलाचा "मानक" दर मानला गेलेला "ब्रेंट क्रुड"चा दर बॅरलला 100 डॉलरच्या वर कधीच गेला आहे आणि सध्या तो 110 डॉलरच्या जवळपास आहे. युद्धामुळेच जगात चालू झालेल्या व्यापार युद्धामुळे विविध कच्च्या मालाच्या पुरवठ्यामध्ये अडचणी निर्माण झाल्या आहेत आणि यामुळेही माल उत्पादनात घट होऊन महागाई वाढली आहे. थोडक्यात जगातील साम्राज्यवादी स्पर्धेने, म्हणजेच भांडवलदार वर्गांच्या विविध हिश्श्यांमधील नफ्याकरिताच्या वाढत्या स्पर्धेने जगाला ही वाढती महागाई दिली आहे. काही अंदाजांनुसार जर रशिया-युक्रेन युद्ध चालूच राहिले तर वर्षाअखेरीस जगातील अन्न-धान्याचे भाव 45 टक्क्यांपर्यंत वाढू शकतात.

### जगभरात महागाईविरोधात आंदोलन

या महागाईविरोधात जगातील अनेक देशांमध्ये जनतेचा राग उफाळून आला आहे. इराणमध्ये महागाईने उच्चांक गाठला असून तेथे अन्नधान्याच्या अभावामुळे दंगली घडल्या आहेत. पेरू, पाकिस्तान, इंडोनेशिया, अर्जेंटीना, दक्षिण आफ्रिका, चिले, इराण, लेबनॉन, सुदान ट्युनिशियाच नव्हे तर स्पेन, ब्रिटन, सायप्रस, गीस सहीत युरोपातील अनेक देशांमध्ये सुद्धा महागाईवरून आंदोलने व दंगली होत आहेत. श्रीलंकेमध्ये तर आर्थिक संकटामुळे प्रधानमंत्र्यांना राजीनामा द्यावा लागला असून जनतेने दंगली केल्या आहेत व प्रधानमंत्र्याचे घर जाळण्यापर्यंत आंदोलन झाले आहे. पेरूमध्ये सर्वत्र जनतेने रस्त्यावर उतरून आंदोलन छेडले आहे आणि अगदी नवीन राज्यघटनेची सुद्धा मागणी केली जात आहे. दक्षिण आफ्रिकेमध्ये आरोग्य कर्मचारी महागाईमुळे संपावर गेले आहेत. अर्जेंटीनामध्ये राजधानीसहीत अनेक शहरांमध्ये हजारोंच्या संख्येने लोक रस्त्यावर उतरले आहेत आणि सरकारच्या कल्याणकारी खर्चात वाढीची मागणी करत आहेत. इथे बस-ड्रायव्हर्सनी सुद्धा महागाईवरून आंदोलन छेडले आहे आणि परिवहन प्रभावित झाले आहे. ब्रिटनमध्ये विविध शहरांमध्ये जनता रस्त्यावर उतरून महागाई विरोधात आंदोलन करत आहे. डेन्मार्क मधील कोपेनहेगेन येथे विमानतळावर बॅगा हलवणारे कामगार महागाईमुळे संपावर गेलेत. फ्रान्समध्ये विमान-कर्मचारी महागाईवरून संपावर गेलेत. उत्तर समुद्रातील तेलखाणीतील 1000 कामगार महागाईमुळे संपावर गेलेत. युरोपात सर्वत्र कामगार दिनाच्या आंदोलनांमध्ये महागाईविरोधात एल्गार पुकारला गेला. महागाईविरूद्धचा राग अशाप्रकारे जगभरात उफाळून येणे चालू झाले आहे.

### महागाईला फक्त रशिया नाही तर संपूर्ण जगातील भांडवलदार कारणीभूत

वाढत्या महागाईचे खापर फक्त रशियावर फोडण्याचे काम भारतातील अनेक अमेरिकन साम्राज्यवाद धार्जिणी प्रसारमाध्यमे करत आहेत, परंतु या महागाईला जगातील एकंदरीतच सर्व भांडवलदार वर्ग कारणीभूत आहे. एकीकडे युद्धामुळे रशिया-युक्रेनमधून अन्न-धान्याचा पुरवठा विस्कळीत झालेला असला, तरी अमेरिका व युरोपातील कारगील पासून ते बेअरपर्यंत अनेक बहुराष्ट्रीय़ कंपन्यांनी महागडे धान्य विकून अतिरिक्त नफा कमावण्याची संधी अजिबात गमावलेली नाही. जागतिक मंचांवर महागाईकरिता रशियावर खापर फोडले जात आहे, परंतु या मंचांवरून अमेरिकन व युरोपियन कृषीमाल कंपन्यांविरोधात चकार शब्दही बोलला जात नाहीये. भांडवलदार वर्ग प्रत्येकच संकटात "संधी" शोधत असतो, आणि युक्रेन-रशिया युद्धाने भांडवलदार वर्गाच्या एका गटाला ती संधी दिली आहे. भारतातील शेतकी भांडवलदार वर्गही नफेखोरीच्या या स्पर्धेत मागे नाही.

### मोदी सरकारचे निर्यात धोरण: देशातील जनतेला उपाशी ठेवून जगाचा "अन्नदाता" बनण्याची संधीसाधू कवायत

युक्रेन युद्धामुळे जगभरात निर्माण झालेल्या गहू तुटवड्याचा वापर भारताने देशी धनिक शेतकी भांडवलदारांचा आणि मोठमोठ्या शेतकी कंपन्यांचा नफा वाढवण्यासाठी केला आणि गव्हाच्या निर्यातीला परवानगी दिली. मोदी गेल्या महिन्यात (नेहमीप्रमाणे) जगाचा दौरा करत असताना भारत कसा जगाचा "अन्नदाता" बनला आहे याच्या फुशारक्याही त्यांनी मारल्या. परंतु निर्यातीमुळे देशांतर्गत गव्हाचे दर वाढू लागल्यावर नुकतीच निर्यातीवर बंदी घातली गेली आहे. 2020-21 मध्ये (हवामानातील बदलांमुळे, जे खुद्द भांडवलशाहीचाच परिणाम आहेत) गहू उत्पादनात घट झालेली असूनही, देशांतर्गत गव्हाचे उत्पादन 2021-22 मध्ये 111.32 दशलक्ष टन (प्रतिव्यक्ती 79 किलोपेक्षा जास्त) होणार आहे. अशामध्ये देशातील सर्व जनतेची गव्हाची गरज सहज भागवणे सरकारले शक्य होते आणि निर्यातीमुळे देशातील किमती वाढतील हे समजायला काही विशेष ज्ञान लागत नाही, परंतु मोदी सरकारला जास्त काळजी धनिक भांडवली शेतकऱ्यांची आणि शेतकी कंपन्यांची आहे, ना की कामगार वर्गाची! सरकारने या भांडवलदारांचे हित जपत कामगार-कष्टकऱ्यांच्या माथी महागाई मारणे निवडले आहे.

### व्याजदरात वाढ: एक तकलादू कारवाई

वाढत्या महागाईचा परिणाम आहे की जगभरात केंद्रिय बँकांद्वारे व्याजदर वाढवले जात आहेत. उदाहारणार्थ भारततही रिझर्व बँकेने मे महिन्यात व्याजदर (रेपो रेट) 0.4 टक्क्यांनी वाढवला आणि जूनमध्ये अजून 0.5 टक्क्यांनी वाढवून तो 4.9 टक्क्यांवर जाईल. ब्रिटनमध्येही व्याजदर 0.75 टक्क्यांवरून 1 टक्क्यांवर नेला आहे. भांडवली अर्थशास्त्राचा यामागील तर्क असा असतो की व्याजदर वाढल्यामुळे लोक कमी उधार घेतील, त्यामुळे असे लोक कमी खर्च करू पाहतील, त्यामुळे मालाच्या मागणीत घट होईल आणि त्यामुळे महागाई कमी होईल.

परंतु जागतिक अर्थव्यवस्थेची बिकट स्थिती पाहता या पावलाने कोणताही मोठा फरक पडण्याची शक्यता नाममात्र आहे. अगोदरच संपूर्ण जगातील अर्थव्यवस्था मंदीच्या घेऱ्यात सापडलेली आहे. याचा अर्थ आहे की गुंतवणूकीवर परतावे मिळत नाहीयेत. अशा स्थितीत कमी व्याज दराने कर्ज मिळत असल्यामुळे गुंतवणूकीच्या बाजारात धुगधुगी तरी होती. आता व्याजदर वाढवले गेल्यानंतर गुंतवणुकीवर परिणाम होण्याची दाट शक्यता आहे. थोडक्यात अर्थचक्राचे गाडे चिखलात अजून जास्त रूतण्याचीच शक्यता जास्त आहे.

भांडवली अर्थशास्त्र हे नेहमी नफ्याच्या तर्काच्या आडूनच आंधळेपणाने काम करते आणि त्यामुळेच महागाईसारख्या परिघटनेला सुद्धा वैज्ञानिक पद्धतीने समजण्यात अपयशी होते. बेरोजगारीच्या व आर्थिक संकटाच्या स्थितीमध्ये सरकारने केलेला कल्याणकारी खर्च अर्थव्यवस्थेमध्ये महागाई वाढू देत नाही, अशा आजवर "किन्स" च्या तर्कानुसार काम करणारे अर्थशास्त्रज्ञ यामुळेच तोंडघशी पडतात. कारण सध्या जी परिघटना दिसून येत आहे, ती आहे स्टॅग्नेशन. म्हणजे एकाच वेळी महागाई आणि मंदावलेली अर्थव्यवस्था सुद्धा. याचे कारण आहे भांडवलशाहीमध्ये नफ्याच्या दराच्या घसरणीची प्रवृत्ती जी भांडवली अर्थव्यवस्थेच्या अंतर्गत नियमांनीच उत्पन्न होते. सतत वाढते मशिनीकरण , ऑटोमेशन यामुळे "स्थायी" गुंतवणूकीत वाढ होते आणि नफ्याच्या दरात घटीची शक्यता निर्माण होते. मशिन स्वस्त होण्यापासून ते कामगारांच्या अतीव शोषणापर्यंत अनेक घटकांमुळे ही शक्यता अल्पकाळात नेहमीच वास्तव म्हणून समोर नाही, परंतु दीर्घकाळात दिसून येतेच. नफ्याचा दर घसरल्यामुळे भांडवलदार गुंतवणूक घटवतात, त्यामुळे बेरोजगारी वाढीस लागते, उत्पन्न घटते आणि सहसा यातून मागणीत घट व किमती घसरणे दिसून येणे अपेक्षित आहे. परंतु जेव्हा नफ्याच्या घसरणीचे संकट अतितीव्र झालेले असते तेव्हा मागणी वाढवण्यासाठी सरकारने केलेले जुजबी उपाय अर्थव्यवस्थेला चालना न देता, महागाई वाढवण्याकडे नेतात.

### महागाईमुळे श्रीमंतांना जास्त नुकसान होते, म्हणतंय मोदी सरकार!

जनतेच्या दैन्यावस्थेने सर्व मर्यादा पार केलेल्या असताना मात्र केंद्रातील मोदी सरकारचे अर्थ-मंत्रालय जनतेला ही शिकवणूक देत आहे की महागाईमुळे गरिबांपेक्षा जास्त फटका श्रीमंतांना बसतो! मंत्रालयाने प्रसिद्ध केलेल्या मासिक आर्थिक आढावा अहवालात म्हटले आहे की "उपभोगासंदर्भात उपलब्ध पुरावे याकडे इशारा करतात की भारतातील महागाईचा जास्त-उत्पन्न गटातील लोकांपेक्षा कमी-उत्पन्न गटातील लोकांवर कमी परिणाम होतो." त्यांनी असेही म्हटले आहे की "... वर सिद्ध केल्याप्रमाणे कमी महागाईमुळे वरच्या लोकांचे उत्पन्न खालच्या लोकांमध्ये पुनर्वितरित होण्यास मदत केली आहे."

हे सिद्ध करण्यासाठी मंत्रालयाने प्रसिद्ध केलेल्या विविध कागदपत्रांमध्ये असे दाखवले गेले आहे की सर्वाधिक जास्त कमावणारी ग्रामीण भागातील वरची 10 टक्के लोकसंख्या आणि शहरी भागातील जवळपास 40 टक्के लोकसंख्या अन्नापेक्षा जास्त खर्च इतर गोष्टींवर करते, आणि वाढत्या महागाईमुळे (अनेकदा) या "इतर" (म्हणजे खरेतर चैनीच्या) वस्तूंवरचा बोजा जास्त असतो व म्हणून या "श्रीमंतांना" जास्त फटका बसतो!

या सरकारच्या गरीब विरोधी, श्रीमंत धार्जिण्या पक्षपातीपणाचा अजून काय पुरावा हवा? खरेतर अन्न-धान्य, इंधन, इतर वस्तू अशाप्रकारे महागाईची मोजदाद वेगवेगळी केली तरी आकडे हेच दाखवतात की गरिबांवर पडलेला बोजा जास्तच आहे, परंतु जास्त पैसेवाल्या लोकांनी चैनीच्या वस्तूंवरील खर्चात केलेली कपात आणि गरिबांनी अन्नामध्ये केलेली कपात यांची तुलना करणेच क्रूर आहे! एखाद्या पैसेवाल्याने न केलेली एखादी सहल आणि गरिबांच्या घरातील उपाशी राहिलेली मुलं यांची तुलना होऊ शकते? यातूनच दिसून येते की या भांडवली सरकारांची मानसिकता किती कामगारविरोधी आणि उच्चभू वर्गाची आहे!

### मोदी सरकारकडून पेट्रोल-डिझेल-गॅस दरात कपात: भांडवलदार वर्गाच्या हितासाठीच

मोदी सरकारने पेट्रोल-डिझेलवरील केंद्रिय करात थोडीशी कपात करून 9-10 रुपयांनी किंमत खाली आणली आहे. अगोदरच 80 रुपयांचे पेट्रोल 120 रुपयांवर नेऊन आता केलेली 10 रुपयांची नाममात्र कपात म्हणजे स्वत:च केलेल्या जखमेवर केलेली बारीकशी मलमपट्टी आहे, ही सर्वत्र होत असलेली टीका तर योग्यच आहे, परंतु यामागे भाजपाई-संघी लोक मोदींना गरिबांची काळजी असल्याचा जो अपप्रचार करत आहेत त्यामागचे तथ्यही समजणे आवश्यक आहे. ही दरकपात गरिबांची काळजी आहे म्हणून नाही तर भांडवलदारवर्गाचे व्यापक हित समोर ठेवूनच केली गेली आहे.

वास्तवात **दरकपातीचे पाऊल उचलले गेले आहे तेच भांडवली व्यवस्थेच्या दूरगामी हितांना डोळ्यासमोर ठेवून.** इंधन दरवाढीमुळे सर्वच जीवनावश्यक वस्तूंचे भाव वाढतात हे तर सर्वज्ञात आहे. या दरवाढीमुळे स्वाभाविपकणे कामगार वर्गाच्या श्रमशक्तीच्या पुनर्निमितीचा खर्चही वाढतो आणि किमान मजुरी वाढवण्याचा दबाव निर्माण होतो. यामुळे व्यापकरित्या भांडवलदार वर्गाच्या नफ्यावर परिणाम होण्याची शक्यता निर्माण होते. अर्थव्यवस्थेची स्थिती अगोदरच बिघडलेली असताना, नफ्याचे दर कायम ठेवण्याकरिता आणि देशांतर्गत राजकीय संघर्ष नियंत्रणात ठेवण्यासाठीच मोदी सरकारने हे पाऊल उचलले आहे.

जर खरोखर जनतेला महागाईपासून दिलासा द्यायचा असता तर यांनी किमान पेट्रोल-डिझेलवरचे सर्व कर रद्द करणे, किमान वेतनात भरघोस वाढ करून ते लागु करणे, आणि श्रीमंतांच्या कमाईवर भरभक्कम कर लावणे चालू केले असते. परंतु भांडवलदारांच्या सेवेत जीवापाड मेहनत करणाऱ्या मोदी सरकारकडून ही अपेक्षा म्हणजे पालथ्या घड्यावरचे पाणी! जगभरात कामगारवर्ग, कष्टकरी रस्त्यांवर उतरून सरकारांना झुकवण्यासाठी संघर्ष छेडला आहे. येत्या काळात भारतही या संघर्षाचे प्रमुख केंद्र बनल्याशिवाय राहणार नाही.

# ओबीसी राजकीय आरक्षण: ओबीसी भांडवलदारांना लूटीत वाटेकरी बनवण्याची धडपड!

✍ रवी

महाराष्ट्रामध्ये ओबीसी राजकीय आरक्षणाचा मुद्दा पुन्हा जोर पकडत आहे. स्थानिक शासनसंस्थांच्या होणाऱ्या निवडणुका ओबीसी आरक्षणासहित व्हाव्यात या मागणीला धरून भांडवली पक्ष ओबीसी मतांच्या बेगमीसाठी या मागणीच्या समर्थनात डंका वाजवताना दिसत आहेत. एकीकडे महाविकास आघाडी सरकार ओबीसी आरक्षणासाठी सर्वोच्च न्यायालयात पाठपुरावा करत आहे तर दुसरीकडे आरक्षण लागू करण्यासाठी राज्य सरकारच्या विरोधात भाजप आंदोलने करत आहे. भाजप शासित मध्य-प्रदेशात ओबीसी आरक्षणाला हिरवा कंदिल मिळाल्यापासून महाराष्ट्रात भाजपचा या मागणीसाठी जोर दिवसेंदिवस वाढत आहे. 25 मे रोजी भाजपच्या कार्यकर्त्यांनी ओबीसी आरक्षण संपवल्यामुळे राज्य सरकारच्या विरोधात मुंबई येथे आंदोलन केले. या आरक्षणाकरिता आपण किती प्रयत्नरत आहोत आणि दोष केंद्र सरकारचाच कसा आहे, हे दाखवण्यात महाविकास आघाडी सुद्धा पूर्ण जोर लावत आहे. थोडक्यात **"ओबीसी" जनसमुदायाचे आम्हीच तारणहार आहोत हे सिद्ध करण्याची अहमहमिका लागली आहे.**

महाराष्ट्रात 1994 पासून ओबीसी जनतेला आरक्षण मिळत आले होते ज्याचा आधार 1931 च्या जनगणनेला बनवले होते. 2021 मध्ये राज्य सरकारने आदेश काढून ओबीसी आरक्षण लागु केल्यानंतर सर्वोच्च न्यायालयाने अपुऱ्या इम्पिरिकल डेटाचे (प्रत्यक्ष अनुभवजन्य माहिती) आणि आरक्षणाची 50%ची मर्यादा ओलांडल्याचे कारण देत हे आरक्षण सप्टेंबर 2021 मध्ये रद्द केले. इम्पिरिकल डेटा मिळवण्याच्या हेतुने कराव्या लागणाऱ्या जातिनिहाय जनगणनेच्या माहितीला प्रसिद्ध करण्यासाठी मोदी सरकारने नेहमीच टाळाटाळ केली आहे. त्यामुळे असा कोणताच डेटा महाराष्ट्राकडे लगेच उपलब्ध नाही असे महाविकास आघाडीचे म्हणणे आहे. परिणामी सध्या महाराष्ट्रातील स्थानिक शासनसंस्थांच्या निवडणुका सप्टेंबर-ऑक्टोबर मध्ये होतील असे राज्य निवडणुक आयोगाने जाहीर केले आहे आणि सोबतच राज्य सरकार इम्पिरिकल डेटावर आधारीत अहवाल बनवण्याच्या मागे लागले आहे.

या सर्व दिखाव्यामागे "ओबीसी" म्हणवल्या जाणाऱ्या जातसमुहांमधील कामगार-कष्टकऱ्यांचे हित नाही तर या जातींमधील भांडवलदार, निम्न-भांडवलदार वर्गाचे हित आहे आणि ओबीसींमधील भांडवलदार वर्ग आणि त्यांचे प्रतिनिधी नेते यांना एकंदरीत लुटीचा जास्त वाटा मिळावा यासाठीच हे सर्व महाभारत चालू आहे, हे समजणे आवश्यक आहे.

**भांडवलशाहीत मालक वर्ग एकमताने कामगारांचे शोषण करत असला तरीही आपसांतल्या नफ्याच्या स्पर्धेतुन निर्माण होणारे मित्रतापूर्ण अंतरविरोधसुद्धा त्यांच्यामध्ये अस्तित्वात असतात.** त्यामुळे भांडवलदार वर्ग वेगवेगळ्या गटांमध्ये (मोठा, मध्यम, छोटा भांडवलदार वर्ग, प्रादेशिक भांडवलदार, निम्न-भांडवलदार, इत्यादी) विभागला जातो. या विविध गटांचे अंतर्विरोधी हितसंबंध त्यांच्या विविध राजकीय पक्षांमार्फत पुढे येतात. भारतासारख्या भौगोलिक दृष्ट्या विस्तृत आणि जातीधर्माने विभागलेल्या देशात मतांसाठी जातीय अस्मितावादी राजकारण करणारे प्रादेशिक व देशस्तरावरील भांडवली राजकीय पक्ष सुद्धा मोठ्या प्रमाणात अस्तित्वात आलेले आहेत. ओबीसी असोत वा इतर कोणी, अशा विविध जातसमूहांचे लांगुलचालन करणे हा या भांडवलदारांकरिता निवडणुकीच्या राजकारणात मते मिळवण्याचा मार्ग असतो, परंतु **सत्तेत वाटा मिळवून व्यावसायिक हित साधणे आणि एकंदरीत लुटीतील आपला वाटा वाढवणे यासाठीच विविध जातसमुहातील भांडवलदार या राजकारणाचे समर्थन करतात. महाराष्ट्रात सुद्धा सत्तेत येऊन लुटीमध्ये वाटा मिळावा यासाठी ओबीसी नेत्यांनी आरक्षणाचा मुद्दा ऐरणीवर आणला आहे.** याच राजकारणाचा भाग म्हणून अनेक राज्यांमधून जातिनिहाय जनगणनेची मागणी मागच्या काही वर्षांपासून केली जात आहे.

ओबीसी राजकीय आरक्षणाने काय साध्य होईल? तर काही जागी ओबीसी आरक्षण मिळाल्यामुळे स्थानिक स्वराज्यसंस्थांच्या पदांवर मध्यम आणि उच्च वर्गीय ओबीसींची संख्या वाढेल, ज्यामुळे सर्व निर्णयप्रक्रियेत आणि पर्यायाने तिच्याशी जोडलेल्या आर्थिक व्यवहारांमध्ये वाटा मिळणे चालू होईल. नगरसेवकांच्या निधीतून होणाऱ्या भ्रष्टाचारात हिस्सा मिळवणे, हितचिंतक कंत्राटदारांना टेंडर मिळवून देणे, "विकास" कामांमधील कमिशन खिशात टाकणे त्यांनाही सहज शक्य होईल. अनेक नगरसेवक स्वतः विकसक असल्यामुळे नगरपालिकेच्या कामांचे कंत्राट स्वतःच घेण्याचे प्रमाणसुद्धा अधिक आहे. स्थानिक स्वराज्यसंस्थांच्या निवडणुका राज्यसभा आणि लोकसभेच्या निवडणुकांसाठी महत्वाची पायरी असतात. या सर्वांचा फायदा "ओबीसी" राजकारण्यांना नक्कीच होणार आहे.




आरक्षण या संकल्पनेत अंतर्भूत आहे की ती गोष्ट सर्वांना नाही तर थोडक्यांनाच मिळेल. आरक्षण ही गरिबी हटावची योजना नसून ती प्रतिनिधित्वाची योजना आहे असे जे आरक्षणाचे समर्थक ओरडून सांगतात ते खरेच सांगत असतात. जी गोष्ट ते बोलत नाहीत ती ही आहे की हे प्रतिनिधित्व त्या-त्या जातसमुहातील भांडवलदार (बिल्डर, उद्योजक, शेतकी भांडवलदार, ठेकेदार, इत्यादी सर्व), मध्यम वर्ग, निम्न-भांडवलदार वर्गातील काही जणांना सत्तेत प्रतिनिधित्व मिळावे म्हणून आहे, ना की त्या-त्या जातसमुहातील सर्व कामगार-कष्टकऱ्यांसाठी. यामुळेच ओबीसी राजकीय आरक्षण हे उच्चभ्रु ओबीसींच्याच फायद्याचे आरक्षण आहे. सत्तेचा वाटा भांडवलदार वर्गीय ओबीसींना सुद्धा मिळावा म्हणुन ते पुढे रेटले जात आहे.

मराठा असोत, धनगर, ब्राह्मण वा ओबीसी वा दलित, सर्व भांडवली पक्षांचे सर्वजातीय नेते सत्तेत येऊन करतात काय? एकतर यापैकी **बहुसंख्यांक नेते हे स्वत: उद्योजक, व्यापारी, बिल्डर, ट्रान्सपोर्टर, धनिक शेतकरी, आडते अशा भांडवलदार वर्गाच्याच विविध हिश्श्यांमधून येतात. सत्तेत आल्यावर ते बाजाराच्या व्यवस्थेचे संचालन करण्यासाठी राबतात,** भांडवलदारांना सवलती देतात, सरकारी कराच्या पैशातून मालक-वर्गासाठी "विकास-योजना" बनवतात, कामगार-कष्टकरी विरोधी कायदे बनवत जातात (आणि चाराणे मोलाच्या फाटक्या कल्याणकारी योजना बनवतात जेणेकरून जनतेत व्यवस्थेबद्दल भ्रम टिकेल, जनतेचा राग नियंत्रणात राहिल), ठेके-कंत्राटांसाठी आपल्या मर्जीतल्या माणसांची कमी-अधिक वर्णी लावण्यासाठी आपसात स्पर्धा करतात, देशांतर्गत निर्माण होणाऱ्या संपत्तीच्या लुटीमध्ये भांडवलदार वर्गाकडून मिळणाऱ्या दलालीचा वाटा वाढवण्यासाठी प्रयत्न करतात, स्वतःच्या सरकारी पदांचा वापर करून वैयक्तिक सोयी-सवलतींचा भरपूर लाभ घेतात, सत्तेचा वापर करून आपापले व्यापार-उद्योग वाढीस लावतात, एकीकडे भांडवलदारांचे दलाल बनून कमिशन खातात आणि दुसरीकडे जनकल्याणाच्या योजनांचा पैसाही हडपतात, आणि हे सर्व करत असताना सतत जातीय-धार्मिक अस्मितावादी मुद्दे जन्मास घालून जनतेला त्यात गुंतवून ठेवतात.

ओबीसी समुदाय हा मागासलेला आहे असा तर्क देताना ग्रामीण गरिबांमध्ये (बटाईदार शेतकरी, गरीब शेतकरी, धोबी, न्हावी, विविध कारागीर, इत्यादी व्यवसायातील) ओबीसी जातसमुहांच्या संख्येचे आणि ते मोठ्या प्रमाणात आर्थिकदृष्ट्या मागासलेले असल्याचे दाखले दिले जातात. हे दाखले निश्चितपणे खरे आहेत. परंतु फक्त एवढेच सत्य आहे का? सत्य हे सुद्धा आहे की या **प्रत्येक जातीमध्ये आज कमी-जास्त संख्येने एक मध्यम, उच्च-मध्यम वर्ग, छोटा-मध्यम-मोठा भांडवलदार वर्ग जन्माला आलेला आहे आणि या वर्गाचे हित मात्र स्वत:च्या जातीसहीत इतर सर्व जातींमधील कामगार-कष्टकऱ्यांच्या शोषणात आहे!** स्वत:लाच विचारा, तुम्ही एखाद्या जातीत जन्माला आले असाल म्हणून तुमच्याच जातीतील मालक, बिल्डर, ठेकेदार, उद्योगपती तुम्हाला काम देताना मजुरी वाढवून देतो काय? उलट आपापल्या जातीतील गरिब कामकऱ्यांचे शोषण करतानाच त्यांना "आश्रित" करवून राजकारणाकरिता वापर करवण्याचे काम हे सर्व मालदार करत असतात.

त्यामुळे ओबीसी राजकीय आरक्षण असल्या किंवा नसल्याने ओबीसीच काय कोणत्याही कामकरी जनतेच्या जीवनाच्या वास्तवात कोणताही बदल होणार नाही. सत्तेचा वाटा भांडवलदारांच्या कोणत्या हिश्श्याला किती मिळावा, कामगार वर्गाचे शोषण कोणी किती करावे हा कामगार वर्गाचा मुद्दा असु शकत नाही. धनगर आरक्षण असो, मराठा आरक्षण असो किंवा ओबीसी आरक्षण, कामकरी जनतेने आपली शक्ती अशा वर्गघातकी



उपलब्ध संधी

मुद्द्यांसाठी संघर्ष करण्यात खर्च करू नये.

हाच तर्क सामाजिक आणि शैक्षणिक आरक्षणातही लागु होतो. **आज जेव्हा उदारीकरण-खाजगीकरणाच्या धोरणांमुळे रोजगाराच्या आणि शिक्षणाच्या कमी होत चाललेल्या संधींवर प्रश्न उपस्थित व्हायला पाहिजे, तेव्हा उरल्या सुरल्या मोजक्या नोकऱ्यांसाठी जनतेला जातीय अस्मितेच्या राजकारणात ढकलले जात आहे.** जातीनिहाय आरक्षणाच्या मुद्द्यावरून होणाऱ्या संघर्षात सर्वांसाठी शिक्षण व रोजगार आणि सार्वजनिक आरोग्य सेवा यांसाठीचा संघर्ष भरकटवला जात आहे आणि जनतेला आपापसांत भांडवून व्यवस्थेच्या अपयशावरुन लक्ष वळवले जात आहे. हे सर्व करत असताना भांडवली व्यवस्थेचे संधी निर्माण करण्यातले अपयश झाकून सर्व यश-अपयशाची जबाबदारी स्पर्धेत गुंतवलेल्या आणि 'उंदिर-शर्यतीत' लागलेल्या सर्वजातीय बेरोजगारांच्या खांद्यावर ढकलली जात आहे. सध्याचे **आरक्षण रद्द करण्याची मागणी करणारे लोक बुरसटलेल्या ब्राह्मणवादी-जातीयवादी विचारांनी ग्रस्त आहेत, कारण हे लोक कधीही शैक्षणिक संस्थांमधील मॅनेजमेंट कोटा किंवा एनआरआय कोटा रद्द करण्याची मागणी करत नाहीत.** पण त्याचवेळी असे लोक सुद्धा आहेत ज्यांना वाटते शिक्षण आणि नोकरीचा प्रश्न नवीन आरक्षण निर्माण करून सुटू शकतो. **आडातच नाही ते पोहऱ्यात कसे येणार? हे अस्तित्त्वातच नसलेल्या काल्पनिक भाकरीच्या तुकड्यासाठी लढण्यासारखेच आहे.** सत्ताधारी वर्ग आरक्षणाच्या राजकारणाचा उपयोग जनतेला शिक्षण आणि रोजगाराच्या प्रश्नापासून भरकटवून सरकारच्या आणि भांडवली व्यवस्थेच्या विरोधात नाही तर एकमेकांच्या विरूद्ध उभे करण्यासाठी करत आहेत हे जनतेने समजणे आणि या राजकारणाला नाकारत वर्गीय एकजुटीवर आधारित, कामगार-वर्गीय समजदारीवर आधारित जातीविरोधी राजकारण उभे करणे गरजेचे आहे.

# राजद्रोहाच्या दमनकारी कायद्याला वाचवण्यासाठी मोदी सरकारची धडपड

✍सुस्मित

मे महिन्यात सर्वोच्च न्यायालयाने भारतीय दंडविधानातील राजद्रोहाच्या 124 (अ) कलमाला तात्पुरती स्थगिती दिली आहे. सर्वोच्च न्यायालयात राजद्रोहाचे कलम हे असंविधानिक असून याचा गैरवापर होत असल्याने रद्द करण्यात यावे यासाठी अनेक याचिका दाखल झाल्या होत्या. केंद्र सरकारने सुरवातीला या कलमाचा फेरविचार करण्याची गरज नसल्याचे सांगितले पण नंतर दोनच दिवसात यु- टर्न घेत केंद्र सरकार यावर फेरविचार करेल असे मांडले. यामागे पंतप्रधानांची “मानवाधिकार, संविधानिक हक्क आणि विविधता” यांप्रती असलेली निष्ठा अशी कारणं देण्यात आली. यामध्ये किती तथ्य आहे त्यावर लेखाच्या पुढील भागात येईलच. पण सध्यातरी सर्वोच्च न्यायालयाने तात्पुरती केंद्र आणि राज्य सरकारांना राजद्रोहाच्या कलमाखाली गुन्हे दाखल करण्यास मनाई केलेली आहे. राजद्रोहाचे कलम हे नेहमीच जनांदोलनांना चिरडण्यासाठीच वापरले गेले आहे आणि मोदी सरकार त्याला वाचवण्यासाठी धडपड करत आहे.

## राजद्रोह म्हणजे काय?

राजद्रोहाचा गुन्हा हा भारतीय दंड संहितेच्या 124 अ या कलमाखाली दाखल केला जातो. शासनाविरोधात विद्रोह, तिरस्कार अथवा विद्वेष पसरवण्याचा प्रयत्न करणे, बोलणे, लिखाणाने चिन्हांचा वापर वापर करून किंवा दृश्य हावभावाचा उपयोग करून विद्वेष पसरवणे, असे प्रयत्न प्रयत्न केल्यास हा गुन्हा दाखल करण्यात येतो. राजद्रोह हा अजामीनपात्र गुन्हा आहे. यात आरोपीला 3 वर्षांपासून ते जन्मठेपेची शिक्षा होऊ शकते.

## राजद्रोहाच्या कलमाचा थोडक्यात इतिहास

राजद्रोहाचे कलम 1890 मध्ये ब्रिटिशांनी भारतीय दंडविधानात जोडले होते. भारतीय स्वातंत्र्य चळवळीत हे कलम राजकीय हत्यार म्हणून वापरले गेले आणि अनेक स्वातंत्र्य चळवळीतल्या क्रांतिकारकांना आणि इतर अनेक नेत्यांना हे कलम वापरुन अटकेत टाकण्यात आले. यामध्ये गांधी, टिळक, मौलाना आझाद आणि इतर अनेक नेत्यांची नावे येतील. भारतात स्वातंत्र्यानंतर 1951 तसेच 1959 मध्ये राजद्रोहाचे कलम म्हणजे ब्रिटिशांचे राजकीय असंतोष संपवण्यासाठी वापरण्यात येणारे हत्यार असल्याचे कारण देत अनुक्रमे पंजाब व अलाहाबाद हायकोर्टाने त्याला असंविधानिक ठरवले होते; पण 1962 मध्ये केदारनाथ सिंह केसमध्ये सर्वोच्च न्यायालयाने राजद्रोहाच्या कलमाला पुन्हा संविधानिक ठरवले पण कलमाची व्याख्या मर्यादित केली. यात व्यक्तीच्या कृतीने सार्वजनिक शांततेचा (public disorder) भंग होणार नसेल तर राजद्रोहाचे कलम लावता येणार नाही ही अट घालून देण्यात आली, परंतु या अटीला सतत धाब्यावर बसवतच या कलमाचा वापर होत आला आहे आणि विविध सरकारांनी राजकीय विरोधकांचे दमन करण्यासाठी हे कलम सतत वापरले आहे.

## राजद्रोहाच्या कलमाचा वापर: विरोध चिरडण्यासाठीच

राजद्रोहाचे कलम राजकीय हत्यार म्हणून विरोधक, पत्रकार, बुद्धिजीवी यांचे दमन करण्यासाठी मुख्यत्वे करून वापरण्यात येते. अगदी अलिकडची उदाहरणे पहायची तर, यात फेब्रुवारी 2021 मध्ये दिशा रवी या पर्यावरण कार्यकर्तीवर शेतकरी आंदोलनाच्या समर्थनार्थ ऑनलाइन टूलकीट बनवल्याप्रकरणी राजद्रोहाचा खटला लावण्यात आला. 2019 मध्ये दिल्ली पोलिसांनी मोदीची टीका केली म्हणून युट्यूबरला अटक केली. 2021 मध्ये उत्तरप्रदेश पोलिसांनी 61 वर्षाच्या व्यक्तीला केंद्र सरकार आणि मोदीची टीका केली म्हणून अटक केली. अशी अनेक उदाहरणे देता येतील. थोडे मागे जाऊन पहावे तर मानवाधिकार कार्यकर्ते डॉ. विनायक सेन (2007), लेखिका अरुंधती रॉय (2010), कार्टूनिस्ट असिम त्रिवेदी (2012) वर काँग्रेस सरकारांच्या काळात राजद्रोहाचे खटले दाखल केले गेले होते. संघ-भाजप समर्थक नेत्यांवरही या कलमाचा वापर काही वेळेस झाला आहे, उदाहरणार्थ विश्व हिंदू परिषदेचे प्रवीण तोगडीया (2003), आणि नुकतेच राणा दांपत्य (जे सरळ भाजपच्या तालावर भोंग्यांचा मुद्दा उपस्थित करत आहे) यांवर खटले दाखल झाल्याचे दिसून येते. जम्मू-काश्मिरचे माजी मुख्यमंत्री फारूक अब्दुल्ला असोत किंवा पत्रकार विनोद दुआ, अशा सारख्यांचे आवाज दडपण्यासाठीही या कायद्याचा वापर झाला आहे. अशा उदाहरणांची यादी प्रचंड मोठी आहे.

एन.सी.आर.बी (NCRB) च्या आकडेवारीनुसार राजद्रोहाच्या केसेस 2014 मध्ये 47 वरुन 2019 पर्यन्त 93 पर्यन्त पोहोचल्या आणि राजद्रोहाचा दोषसिद्धीदर गेल्या काही वर्षात 3% राहीला आहे. राजद्रोहाच्या केसेस लावण्यात उत्तर प्रदेश सर्वात पुढे आहे. 2010 पासून च्या केसेस मध्ये 77% केसेस या योगी आदित्यनाथ च्या काळात लावल्या गेल्या आहेत. यातून हे तर स्पष्ट आहे की सत्तेला प्रश्न विचारणाऱ्यांना तुरुंगात खितपत ठेवण्यासाठी याचा सर्रास वापर करण्यात आला आहे आणि मोदी सरकारच्या काळात तर यामध्ये विशेष वाढ झाली आहे.

## केंद्र सरकारच्या यू- टर्न मागची कारणे

केंद्र सरकारने बदललेल्या भुमिकेतून एकीकडे सर्वोच्च न्यायालयानेच जर 124 अ वर फेरविचार करून राजद्रोहाला असंविधानिक घोषित केले तर हे कलम हातातून जाईल ही भीती दिसून येते, तर दुसरीकडे स्वत:ची प्रतिमा उजळवण्याची संधी साधण्याचा संधीसाधूपणा.

राजद्रोहाच्या कलमात काही फेरफार करून त्याचा तथाकथित “गैर”वापर टाळण्याचा दिखावा मोदी सरकार करेल यात शंका नाही. यात एक गोष्ट केंद्र सरकारसाठी फायद्याची ठरणार आहे ती म्हणजे राजद्रोहाच्या कलमाखाली केसेस लावायला राज्य सरकारला केंद्र सरकारकडून परवानगीची गरज नसते त्यामुळे सध्या विरोधी पक्षांची राज्य सरकारे भा.ज.पा., रा.स्व.सं च्या कार्यकर्त्यांविरुद्ध केसेस लावू शकतात, जे यापुढे बंद करायची संधी असेल; पण यु.ए.पी.ए. सारख्या राजद्रोहासारख्याच दमनकारी कायद्यांअंतर्गत केसेस लावण्यासाठी केंद्र सरकारची परवनानगी घ्यावी लागते. थोडक्यात राज्य सरकारांचे अधिकार मर्यादित करण्यासाठी मोदी सरकार संधी साधू शकते.

यू- टर्न मागे फॅसिस्ट मोदी सरकारची उदारमतवादी छबी प्रस्थापित करणं हे सुद्धा एक प्रमुख कारण आहे. राजद्रोहासारखे ब्रिटिश कालीन कलम रद्द करून आपण 60 वर्षात काँग्रेसने जे केले नाही ते करून दाखवले हे सुद्धा सांगता येईल. हे विसरता कामा नये की असा यू-टर्न घेणारा भाजप एकमेव पक्ष नाही. देशभरात गेली 70 वर्षे या कायद्याचा वापर विरोधकांना चिरडण्यासाठी केल्यानंतर काँग्रेसला आता उपरती झाली आहे आणि 2019 मध्ये त्यांनी घोषणापत्रात या कायद्याला रद्द करण्याचे आश्वासन दिले होते. उदाहरणार्थ, याच काँग्रेस सरकारने 2012-13 मध्ये कुडनकुलम अणुऊर्जा प्रकल्पाविरोधात आंदोलन करणाऱ्या 9000 गरीब शेतकरी, मच्छीमारांवर राजद्रोहाचा खटला भरला होता. राजद्रोहाच्या विरोधात दिखावी भुमिका घेऊन आपली छबी उजळवण्याचा यांचा प्रयत्न म्हणजे “सौ चुहे खाके बिल्ली हज को चली” सारखाच प्रकार आहे.

## राजद्रोह रद्द झाल्याने मोठा फरक पडणार नाही

समजा मोदी सरकारने वा सर्वोच्च न्यायालयानेच हे कलम रद्द केले तरी मोठा फरक पडणार नाही. राजद्रोहासारखे कलम ज्याने सरकारला कोणावरही अगदी क्षुल्लक कारणांसाठी, आणि अगदी एखादा विचार व्यक्त केला तरी राजद्रोहाचे कलम लावून अटक करण्याची परवानगी दिली आहे, अत्यंत लोकशाही विरोधी आहे, परंतु भांडवली लोकशाही कधी खरी लोकशाही असूच शकत नाही. भांडवली लोकशाही म्हणजे भांडवलदार वर्गाची कामगार कष्टकरी वर्गावर लादलेली हुकूमशाहीच असते. जनतेचे दमन करण्यासाठी असे कायदे सरकारांना नेहमीच हवे असतात. राजद्रोहासारखे कलम रद्द झाले पाहिजे यात शंकाच नाही पण तरीही ह्याच तरतूदी असलेले यु.ए.पी.ए., रासुका, मकोका सारखे इतर अनेक कायदे अस्तित्वात आहेतच, ज्यांद्वारे जनांदोलनांचे, विरोधकांचे दमन करण्याचे अधिकार सरकारकडे कायम राहतील.

## कामगार वर्गाची पुढील दिशा

कामगार वर्गाने लोकशाही आणि नागरी अधिकारांच्या विरोधातील प्रत्येक हल्याचा प्रखरपणे विरोध केला पाहिजे आणि भांडवली लोकशाहीची चौकट सतत वाढवत नेण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. जेवढी ही चौकट संकुचित असेल तेवढेच कामगार वर्गाला भांडवलशाही विरुद्ध संघटित होणे आव्हानात्मक होत जाते. लेनिनने म्हटल्याप्रमाणे “कामगारवर्गाच्या दृष्टीने, भांडवलशाही अंतर्गत राज्यसत्तेचे सर्वोत्तम रूप या स्वरूपात, लोकशाही गणतंत्राचे आम्ही समर्थक आहोत.” तेव्हा मर्यादित अर्थाने का होईना मिळालेल्या लोकशाही-नागरी अधिकारांच्या रक्षणार्थ लढणे, भांडवली लोकशाही गणतंत्रा अंतर्गत आपल्या अधिकारांचे रक्षण व विस्ताराकरिता लढणे हे आपले कर्तव्य बनते.

# वाढते तापमान, पूर, दुष्काळ!

पान 12 वरून

घनदाट जंगलांपैकी एक आहे, जो या निर्णयानंतर विनाशाच्या मार्गावर जाणार आहे. ओपन कास्ट कोळसा खाणीच्या नावाखाली हसदेवची जंगले नष्ट करण्यासाठी ग्रामसभांकडूनही संमती न घेता हे सर्व सुरू असल्याचे परिसरातील ग्रामस्थांचे म्हणणे आहे. उदरनिर्वाहाचे स्रोत असलेले हे वनक्षेत्र नष्ट झाले तर ह्या क्षेत्राच्या मोठ्या लोकसंख्येसाठी अस्तित्वाचे संकट निर्माण होईल. मार्च 2019 रोजी सरकारने 1927 च्या भारतीय वन कायद्यात अशा काही सुधारणा सुचवल्या आहेत ज्यामुळे सरकारच्या विनाशकारी कॉर्पोरेट धार्जिण्या धोरणांच्या मार्गात येणारे सर्व कायदेशीर अडथळे तर दूर होतीलच पण लाखो ग्रामीण आदिवासींचे, ज्यांचे जीवन ह्या जंगलांवर पूर्णपणे अवलंबून आहेत, अस्तित्व धोक्यात येईल आणि त्यांना जबरदस्तीने त्यांच्या 'हक्काच्या' जागेवरून बेदखल केले जाईल. प्रस्तावित सुचनांमधील सर्वाधिक चिंताजनक प्रस्ताव आहे वनसंवर्धन, वृक्षारोपणाची जबाबदारी सरकारने सोडून देणे आणि ही जबाबदारी केवळ त्या कॉर्पोरेट घराण्यांना सोपवणे, जे त्या भागात व्यावसायिक उपक्रमांमध्ये गुंतलेले आहेत किंवा त्यात गुंतणार आहेत! जगभरातील अनेक देशांमध्ये आपल्या नफ्याच्या आंधळ्या लालसेपोटी पर्यावरणाचा विध्वंस करण्यासाठी कुप्रसिद्ध वेदांता, अदानी, पॉस्कोसारख्या कंपन्यांना या जंगलांचे 'रक्षक' बनवले जाईल. याशिवाय, या कायद्यातील प्रस्तावित दुरुस्तीमुळे या वनक्षेत्रात उद्योग सुरु करण्यापूर्वी ग्रामसभा/ग्रामपंचायतींकडून संमती घेण्याची आवश्यकता उरणार नाही. ह्या धोरणांना विरोध करणाऱ्या स्थानिक जनतेचे क्रूर दमन कायदेशीर ठरवण्याची संपूर्ण व्यवस्थाही सरकारने प्रस्तावित केलेल्या दुरुस्तीमध्ये आहे. वनगुन्हे रोखण्याच्या नावाखाली पोलीस आणि वन अधिकाऱ्यांना अमर्याद अधिकार देण्याचाही प्रस्ताव आहे, ज्या अंतर्गत या भागात राहणाऱ्या ग्रामीण आदिवासींवर राज्याच्या दडपशाहीचे स्वरूप अधिक हिंसक आणि क्रूर होईल.

हे सरकार भांडवलदारांच्या नफ्यात तसूभर तूट देखील होऊ नये यासाठी सतत कार्यरत असते. देशातील तीन चतुर्थांश विजेचे उत्पादन करणाऱ्या **थर्मल पॉवर कंपन्या भारतातील सल्फर- आणि नायट्रस-ऑक्साइड्सच्या औद्योगिक उत्सर्जनात 80% वाटा उचलतात, ज्यामुळे तिथे काम करणाऱ्या कामगारांना फुफ्फुसाचे आजार होतात, आजूबाजूला वस्ती करून राहणाऱ्यांना आम्लवर्षेचा सामना करावा लागतो.** उत्सर्जन मानकांतर्गत ह्या विषारी सल्फर डायऑक्साइडचे उत्सर्जन कमी करणारे फ्ल्यू गॅस डिसल्फुरायझेशन (FGD) युनिट्स ह्या औष्णिक वीज प्रकल्पांमध्ये स्थापित करण्याची अंतिम मुदत 2017 पर्यंत होती जी भारताच्या ऊर्जा मंत्रालयाने वाढवून 2022 करवून घेतली आहे आणि ती पुढेही अशीच वाढत राहील यात शंका नाही. भांडवलशाही व्यवस्थेच्या दूरगामी भविष्याचा विचार करण्याचे काम भांडवलदारांच्या व्यवस्थापकीय समितीवर म्हणजेच सरकारकडे असते. पण ते देखील भांडवलदारांच्या दीर्घकालीन हिताचा विचार करून पृथ्वी आणि पर्यावरण वाचवण्यासाठी प्रभावी पावले उचलू शकत नाहीत.

पान 2 वर

# पॅरिस कम्युन: पहिल्या मजूर राज्याची सचित्र कथा (अकरावे पुष्प )

आज भारतातच नाही, तर संपूर्ण दुनियेत कामगार भांडवली लुटखोरांच्या वेगवान होत चाललेल्या हल्ल्यांचा सामना करत आहेत, आणि कामगार आंदोलन विखुरलेपण, साचलेपणा, आणि हताशेने ग्रासलेले आहे. अशामध्ये इतिहासाची पाने उलटून कामगार वर्गाच्या गौरवशाली संघर्षांपासून शिकण्याचे आणि त्यांच्यापासून प्रेरणा घेण्याचे महत्व फार वाढते. **आजपासून 150 वर्षे अगोदर, 18 मार्च 1871 ला फ्रांसची राजधानी पॅरिस मध्ये पहिल्यांदा कामगारांनी आपले शासन कायम केले. याला पॅरिस कम्युन म्हटले गेले.** त्यांनी शोषकांद्वारे पसरवल्या जाणाऱ्या या विचारांना ध्वस्त केले की कामगार राज्यकारभार चालवू शकत नाहीत. पॅरिसच्या बहादुर कामगारांनी फक्त भांडवली सत्तेच्या रथालाच उलटवले नाही तर 72 दिवसांच्या शासनाच्या दरम्यान येणाऱ्या दिवसांचे एक छोटे मॉडेल जगासमोर प्रस्तुत केले आणि दाखवले की समाजवादी समाजामध्ये भेदभाव, असमानता, आणि शोषण कशाप्रकारे समाप्त केले जाईल. पुढे चालून 1917 च्या रशियन कामगार क्रांतीने या क्रांतीचा पुढचा टप्पा रचला.

कामगार वर्गाच्या या साहसी कारवाईने फक्त फ्रांसमधीलच नाही तर जगातील भांडवलदारांचे काळीज थरथरले. त्यांनी कामगारांच्या पहिल्या सत्तेला सुरुंग लावण्यासाठी जीवतोड प्रयत्न केले आणि शेवटी कामगारांच्या कम्युनला त्यांनी रक्ताच्या नद्यांमध्ये न्हाऊन काढले. पण कम्युनचे सिद्धांत अमर झाले.

पॅरिस कम्युनच्या पराजयातूनसुद्धा जगातील कामगार वर्गाने महत्वाचे धडे घेतले. पॅरिसच्या कामगारांचे बलिदान कामगार वर्गाला सतत आठवण देत राहील की भांडवलशाहीला नष्ट केल्याशिवाय त्यांना मुक्ती मिळू शकत नाही.

पॅरिस कम्युनला 150 वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने ‘कामगार बिगुल’ च्या मार्च 2021 अंकापासून आम्ही जगातील पहिल्या कामगार राज्याच्या सचित्र कथेची सुरुवात केली आहे. ‘मजदूर बिगुल’ मध्ये मार्च 2012 पासून प्रकाशित झालेल्या धारावाहिक कथेचा अनुवाद पुढील अंकांमध्ये आम्ही देत राहू.

या लेखमालेतील सुरुवातीच्या काही पुष्पांमध्ये आपण पॅरिस कम्युनच्या पार्श्वभूमीमध्ये जाणले की भांडवलाच्या सत्तेविरोधात कामगारांचा संघर्ष कशाप्रकारे पावलोपावली विकसित झाला. आपण पाहिले की कम्युनची स्थापना कशी झाली आणि तिच्या रक्षणासाठी कामकरी जनता कशाप्रकारे शौर्याने लढली. आपण हे सुद्धा पाहिले की कम्युनने खऱ्या लोकशाहीच्या तत्वांना इतिहासात पहिल्यांदा लागू कसे केले आणि हे पण दाखवले की “जनतेची सत्ता” वास्तवात कशी अस्ते. गेल्या पुष्पामध्ये आपण हे पहात होतो की कम्युनचा पराजय कोणत्या कारणांमुळे झाला. या चूकांनी नीट समजणे आणि भांडवलशाहीच्या विरोधात निर्णायक लढाईत त्यांच्यापासून धडे घेणे कामगार वर्गासाठी अत्यंत आवश्यक आहे.

— संपादक मंडळ

## कम्युनच्या रक्षणासाठी शेवटपर्यंत लढले कामगार




**1.** भांडवली व्यवस्थेची सभ्यता आणि न्याय आपले भयावह रूप तेव्हा दाखवतात जेव्हा तिचे गुलाम आणि काबाडकष्ट करणारे मालकांविरूद्ध लढण्यासाठी डोके वर काढतात. तेव्हा ही सभ्यता आणि न्याय, तिच्या नागड्या पाशविकतेच्या आणि बदला-घेण्याच्या खऱ्या स्वरूपात समोर येतात. मेहनतीचे फळ हडपण्यासाठी आणि उत्पादकांच्या वर्ग संघर्षाच्या प्रत्येक नव्या संकटात हे तथ्य अधिक नग्न स्वरूपात समोर येते. जून 1848 मध्ये कामगारांचे बंड चिरडण्यासाठी भांडवलदारांनी केलेले जालीम कारनामे सुद्धा 1871 च्या अमीट कलंकापुढे फिके पडले. आपले सर्व काही पणाला लावून ज्या धाडसाने आणि शौर्याने पॅरिसचे स्त्री-पुरूष आणि मुलंसुद्धा व्हर्साय-पंथियांच्या प्रवेशानंतर आठ दिवसापर्यंत लढले, ते ह्या गोष्टीचे प्रमाण आहे की ते कोणत्या मोठ्या ध्येयासाठी लढत होते. दुसरीकडे, व्हर्सायच्या सैनिकांचे नारकीय कृत्य त्या सभ्यतेच्या घृणास्पद आत्म्याला दाखवत होते, जिचे ते भाड्याचे नोकर होते.

**वर: कम्युनच्या लाल झेंड्याखाली भांडवलशाही फौजे सोबत आर-पार लढताना पॅरिसचे कामगार आणि स्त्रिया.**

**उजव्या बाजूला: भीषण युध्दादरम्यान थोडा आराम आणि पुढे लढाईची तयारी करताना पॅरिसचे कामकरी लोक.**




**2.** थियेर आणि त्याच्या खुनी कुल्यांच्या कर्तृत्वासारखी उदाहरणे फक्त जुन्या रोमन साम्राज्यामध्ये झालेल्या पाशवी हत्याकांडांमध्ये मिळतात. त्याच प्रकारचे भीषण हत्याकांड— त्याच उपेक्षेसहीत, मग कोणी म्हातारा असो, युवक ,पुरुष वा स्त्री. बंदिवानांना शारिरीक वेदना देण्याचा तोच पाशवी प्रकार, त्याच प्रकारचा मनमानी कारभार, परंतु यावेळी एका संपूर्ण वर्गाच्या विरोधात. रक्तपिपासू पध्दतीने फरार नेत्यांचा पाठलाग, जेणेकरून कोणीही पळून जावू शकू नये, त्याचप्रमाणे राजकीय आणि वैयक्तिक शत्रूंवर दोषारोपण, त्याच प्रकारे निरपराध लोकांची अंदाधूंद हत्या ज्याचा संघर्षाशी काहीही संबंध नव्हता. फरक एवढाच होता की, रोम लोकांजवळ बंडखोर लोकांच्या संपूर्ण टोळीला एकाच वेळी संपवणारे मशिनगन सारखे हत्यार नव्हते. याशिवाय रोम लोकांनी ना कायदा व न्यायाचे नाटक केले होते आणि ना सभ्यतेची पूर्ण हमी दिली होती.

# पॅरिस कम्युन: पहिल्या मजूर राज्याची सचित्र कथा (अकरावे पुष्प)



कम्युनच्या रक्षणासाठी शेवटच्या श्वासापर्यंत लढणारे पॅरिसचे कामगार.

3. कामगारांना चिरडण्याच्या या पाशवी अभियानाने भांडवली सभ्यतेचा भयंकर चेहरा उघडा पाडला. त्यांच्या स्वत:च्याच वर्तमानपत्रा ंनी या गोष्टीचे वर्णन केले आहे! लंडनच्या एका टोरी वर्तमानपत्राच्या पॅरिसमधील पत्रकाराने लिहिले की, “अशावेळी जेव्हा गोळीबाराचा आवाज अजून्ही कुठेतरी दूरवर गुंजत आहे, अभागी घायाळ ज्यांची कोणी देखभाल करू शकत नाही, पेयर-ला-शेजच्या दफनभूमीत जीव सोडत आहेत. 6,000 दहशतग्रस्त बंडखोर, निराशेने ग्रासून जमिनीतील तळघरांच्या भुलभुलैय्यामध्ये फिरत आहेत. मशिनगनच्या गोळ्यांनी एकावेळी वीसच्या संख्येने उडवून लावले जाण्यासाठी पकडले गेलेले अभागी तडकाफडकी सडकांवरुन धरुन आणले जात आहेत, दारू, बिलियर्डस आणि डोमिनोच्या शौकीनांची गर्दी, सजवलेल्या चौकात उभ्या असलेल्या दुराचारिणी स्त्रिया, फॅशनेबल हॉटेलांच्या अंत:कक्षांतून गुंजणारा आणि रात्रीची शांतता भंग करणारा विलासी उल्हासाचा आवाज घृणा उत्पन्न करत आहे.”



कम्युनच्या रक्षणासाठी रस्त्यावर उभ्या केलेले बॅरिकेड्सची खूप मोठी भुमिका होती. वरील चित्रात जनतेने बनवलेले एक यंत्र दाखवले आहे, ज्याचा वापर बॅरिकेड बनवण्यासाठी होत होता. वरील डाव्या बाजूला– एका बॅरिकेड सोबत एक नॅशनल गार्डचा योध्दा, लाल झेंड्यासोबत.


4.‘जुर्नाल द पॅरिस’ नावाच्या व्हर्सायपंथी वर्तमानपत्रामध्ये, ज्याला कम्युनने बंद केले होते, श्री. एडुअर्ड एर्वे यांनी लिहिले आहे: “पॅरिसच्या जनतेने ज्या पध्दतीने आपली संतुष्टता व्यक्त केली, त्यामध्ये तुच्छतेचा आवश्यकतेपेक्षा जास्त आभास होता आणि आम्हाला भय आहे की वेळ जसा-जसा जाईल तस-तसा तो वाढत जाईल. पॅरिसमध्ये आता जी उत्सवाची भडकता आहे ती अतिशय अनुपयुक्त आहे; ही गोष्ट आता संपली पाहिजे नाही तर लोक आम्हाला पतनोन्मुख पॅरिसवासी म्हणतील.” यानंतर त्यांनी त्यांचा जुना लेख तासितुस मधली एक उक्ती उधृत केली. “परंतु त्या भीषण संघर्षाच्या पुढच्या सकाळीच, जेव्हा संघर्ष पूर्णपणे संपला नव्हता, पतित आणि भ्रष्टाचारी रोम परत एकदा व्यभिचाराच्या त्या चिखलात लोळायला लागले, जो त्याच्या शरिराला नष्ट आणि आत्म्याला भ्रष्ट करत होता.” एर्वे एवढेच म्हणायला विसरले की, ज्या “पॅरिसच्या जनते”ची गोष्ट त्यांनी सांगितली आहे ती म्हणजे थियेरची, व्हर्साय आणि आजूबाजूने परत येणाऱ्या झुंडीच्या-झुंडी धुर्त लोकांची, म्हणजेच पतनोन्मुख पॅरिसच्या जनताची गोष्ट आहे.




कम्युनला शंभर वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त सोवियत संघात काढलेले टपाल तिकीट

5. मेहनतीच्या गुलामीवर आधारित ही घृणास्पद सभ्यता जेव्हा-जेव्हा नव्या श्रेष्ठ समाजाच्या आत्मत्यागी समर्थकांवर रक्तरंजित विजय प्राप्त करते, तेव्हा ती पराजितांच्या कण्हण्याला कुत्सित-प्रचाराच्या पुरामध्ये बुडवते आणि हा कुत्सित-प्रचार संपूर्ण जगात पसरवला जातो. कामगारांद्वारे प्रशासित पॅरिस जेथे कम्युनचे राज्य होते, ‘व्यवस्थेच्या’ खुनी कुत्र्यांद्वारे अव्यवस्था आणि हिंसेचे शहर बनवले जाते. आणि जगातील सर्व देशातील भांडवली मेंदूंसाठी हे एक जबरदस्त परिवर्तन काय असते? हेच की कम्युनने सभ्यतेच्या विरुध्द षडयंत्र केले होते! कम्युनसाठी पॅरिसची जनता इतक्या मोठ्या संख्येने उत्साहपूर्वक आपल्या प्राणांचा बळी देत होती ज्याचे इतिहासात दुसरे उदाहरण नाही. यातून काय सिद्ध होते? हेच की कम्युन जनतेचे सरकार नव्हते तर मूठभर अपराध्यांची अनौरस औलाद होती! पॅरिसच्या कामगार स्त्रिया हसत-हसत सडकेवरील लढ्यात आणि फाशीच्या तख्तावर आपले प्राण अर्पण करत होत्या. हे काय सिद्ध करते? हेच की कम्युनरूपी राक्षसाने त्यांना लढावू राक्षसणी बनवले. जितक्या शौर्याने कम्युनने स्वत:च्या रक्षणासाठी लढाई केली तेवढीच त्यांनी दोन महिने एकछत्र शासनात नरमाई सुद्धा दाखवली. यातून काय सिद्ध होते? हेच की कम्युनने अनेक महिने कोमलता आणि मानवतेच्या छद्मी आवरणाखाली आपल्या रक्तलोलुप राक्षसी हिंसक प्रवृत्तीला लपवले होते.

कामगारानी जुन्या शासनातील दमनाच्या सर्वात मोठ्या प्रतिकाला, ‘गिलोतिन’ला, तोडून टाकले. परंतु ते शोषणाच्या जुन्या व्यवस्थेला मुळापासून उखडून नाही टाकू शकले. हे काम त्यांच्या येणाऱ्या पुढील पिढीला करायचे आहे.



भांडवलदारांनी कामगारांच्या रक्तरंजित दमनात जुलुमशाहीची सगळी हद्द पार केली; परंतु जेव्हा कामगारांनी मागे हटताना आपल्या आत्मरक्षणासाठी काही इमारतीना आग लावली, तेव्हा भांडवलदारांचे नेते आणि वर्तमानपत्र यांला क्रूरता म्हणत ओरडायला लागले.



6.भांडवलदारांनी या गोष्टीवर खूप आरडा-ओरडा केला की कामगारानी पॅरिसच्या इमारतींना आग लावून बर्बाद केले. आजही बुर्झ्वा प्रसारमाध्यमे कम्युनच्या इतिहासात पॅरिसच्या बर्बादीला सगळ्यात मोठ्या घटनेच्या रूपात दाखवतात. पण सत्य काय होते? कामगारांच्या पॅरिसने जेव्हा शौर्याने आपले बलिदान देण्यास सुरवात केली तेव्हा त्यांनी इमारती आणि स्मारके यांनाही आगीच्या ज्वाळांमध्ये भस्म होऊ दिले. कामगारांच्या शरिराचे तुकडे–तुकडे करताना शासकांनी आगी कडून ही आशा नव्हती ठेवली पाहिजे की ते विजयी होऊन जेव्हा घरी येतील तेव्हा त्यांच्या इमारती खात्रीने उभ्या असतील. व्हर्सायच्या सरकारने “जाळपोळी”चा आरडा-ओरडा केला आणि दूरवरच्या गावांपर्यंत आपल्या गुंडांना संकेत दिले की त्यांनी शत्रूला व्यावसायिक जाळपोळ करणारे म्हणून पकडावे. मार्क्सने लिहिले, “सगळ्या जगातील भांडवलदार, जे युध्दानंतर होणाऱ्या सामुहिक हत्याकांडांबाबत हु की चु नाही करत, विटा आणि भिंतींची पवित्रता नष्ट झाल्यावर थरथर कापून उठताहेत!”

# पॅरिस कम्युन: पहिल्या मजूर राज्याची सचित्र कथा (अकरावे पुष्प)

**7.** कम्युनने आगीचा वापर अगदी सोळा आणे स्वरक्षणाचे साधन म्हणून केला. त्यांनी याचा वापर व्हर्सायच्या फौजेसाठी त्या मोठ्या मार्गांना बंद करण्यासाठी केला, ज्यांना व्हर्सायचे जनरल ओस्मान यांनी जाहीरपणे तोफांच्या माऱ्यासाठी खुले सोडले होते. कामगार मागे हटत असताना आपल्या बचावासाठी आगीचा त्याच प्रकारे वापर करत होते, ज्या प्रकारे व्हर्सायचे सैनिक पुढे येण्यासाठी तोफांच्या गोळ्यांचा वापर करत होते, ज्यात कमीत कमी तेवढीच घरे उध्वस्त झाली जेवढी कम्युनव्दारे लावलेल्या आगीने झाली. हे कधीच समोर आले नाही की कोणती घरे आत्मरक्षकांनी जाळली आणि कोणती आक्रमण करणाऱ्यांनी जाळली. आणि आत्मरक्षकांनी आगीचा वापर तेव्हाच केला जेव्हा व्हर्सायच्या फौजेने बंदिवानांची अंदाधूंद कत्तल करणे चालू केले. याशिवाय कम्युनने खूप आधीच सार्वजनिक रूपात या गोष्टीची घोषणा केली होती की, जर त्यांना शेवटपर्यंत मजबूर केले गेले तर ते स्वत:ला पॅरिसच्या ढिगाऱ्यामध्ये गाडून घेतील. कम्युनला माहित होते की त्यांच्या विरोधकांना पॅरिसच्या जनतेच्या जीवाची पर्वा नाही, पण त्यांना त्यांच्या पॅरिस मधील इमारतींची काळजी आहे.





मे 1871 च्या दिवसात झालेल्या भीषण लढाईत नष्ट झालेल्या पॅरिसच्या इमारती. युध्दात आगीचा वापर तेवढाच वैध आहे जितका इतर एखाद्या हत्याराचा असू शकतो. ज्या इमारतींवर शत्रूचा ताबा असतो, त्या इमारतींना आग लावण्यासाठी तोफगोळे टाकले जातात. जर आत्मरक्षकांना मागे हटावे लागले तर ते स्वत: आग लावत जातात, जेणेकरून आक्रमणासाठी त्यांचा वापर केला जावू नये. सगळ्या जगातील नियमित सेनेच्या युद्धक्षेत्रातील घरांचे कमनशिब होते की ते आगीत जाळले गेले. परंतु शोषकांच्या विरुद्ध शोषितांच्या युध्दात, जे इतिहासातील एकमात्र न्यायपूर्ण युद्ध आहे, नेहमी हे म्हटले जाते की येथे हा नियम लागू होत नाही.

**8.** ज्याच्यांत काही महिने नुकतेच भीषण युद्ध चालू होते, ते प्रशिया आणि फ्रांसचे भांडवलदार पॅरिस कम्युनला चिरडल्यानंतर एक झाले. हा या गोष्टीचा पुरावा आहे की जसा वर्ग-संघर्ष गृह-युद्धामध्ये बदलतो, तसा राष्ट्रीयतेचा बुरखा उतरवला जातो. कामगार वर्गाच्या विरुद्ध सर्व राष्ट्रीय सरकारे एकत्र होतात. या गोष्टीची 1917 मध्ये पुन्हा पुनरावृत्ती झाली, जेव्हा सोवियत संघात कामगारांची सत्ता कायम होताच, 16 देशातील सरकारांनी मिळून त्यावर हल्ला केला.



रक्ताची होळी खेळताना आपल्या शिकारीविरूध्द कुत्सित प्रचाराचे वादळ सोडणे ही शासक वर्गाची जुनी रीत आहे. या बाबतीत भांडवलदार वर्ग जुन्या जमान्यातील सामंताचेच वारस आहे, जे समजत होते की सामान्य जनतेच्या विरुद्ध कोणत्याही हत्याराचा वापर वैध आहे, परंतु सामान्य जनतेच्या हातात कोणत्याही प्रकारचे हत्यार असणे अवैध आहे.




कामगारांचे महान नेते आणि शिक्षक–कार्ल मार्क्स.

"कम्युनचे सिद्धांत शाश्वत आणि अनश्वर आहेत. जो पर्यंत कामगार वर्ग मुक्त होत नाही, तो पर्यंत हे सिद्धांत वारंवार प्रकट होत राहतील."

— कार्ल मार्क्स

कम्युनार्डांच्या रक्तरंजित इतिहासाने कामगारांसाठी हा कटू धडा लिहिला की कामगार वर्गाला क्रांतीला शेवटपर्यंत पुढे घेऊन जावे लागेल. सत्ता न शांततेने मिळेल, ना तिचे रक्षण शांततेने करता येईल.




**9.** 1871 पॅरिस कम्युनच्या दमनाने हे सुद्धा सिद्ध केले की, कामगार आणि त्यांच्या उत्पादनाला हडपणाऱ्यांमध्ये आता स्थायी शांती किंवा युध्दविराम होऊ शकत नाही. लढा वारंवार आणि उत्तरोत्तर वाढणाऱ्या रूपात अनिवार्यपणे छेडला जाईल आणि यामध्ये संशयाला जागा नाही की शेवटी कोणाचा विजय होईल—मुठभर लुटखोरांचा की बहुसंख्याक कामगार वर्गाचा. कार्ल मार्क्सच्या शब्दात **"कामगारांचे पॅरिस आणि त्यांची कम्युन नव्या समाजाच्या गौरवशाली पथदर्शकाच्या रूपात नेहमी यशस्वी राहील. कम्युनच्या शहीदांनी कामगार वर्गाच्या विशाल हृदयात आपले स्थान बनवले आहे. कम्युनला नष्ट करणाऱ्यांना इतिहासाने चिरकालासाठी अपराध्याच्या त्या पिंजऱ्यात बंद केले आहे, ज्यातून त्यांच्या पाद्र्यांनी केलेल्या सर्व प्रार्थनाही सोडवू शकणार नाहीत."**

...पुढील अंकात चालू

# वाढते तापमान, पूर, दुष्काळ!

## नफ्याच्या व्यवस्थेपायी कामगार-कष्टकरी भोगताहेत पर्यावरणाचे संकट!

✍ **पूजा**

'यंदाचा उन्हाळा फार कडक आहे', 'ह्यावेळी तर उन्हाने जीव नकोस झालाय' , वगैरे वाक्य आपण सहज बोलून जातो, 'वाढत्या उन्हाची' ही समस्या ह्या वाक्यांपलीकडे किती गंभीर, खोल आणि जीवघेणी आहे ह्याबद्दल आपण सजग नसतो. हा असह्य उन्हाचा तडाखा मानवी आयुष्यात, काय काय सूक्ष्म, विनाशकारी बदल घडवतोय हे एकतर आपल्याला माहीत नसते, किंवा असेल तरी 'मला त्याचे काय' म्हणून सपशेल कानाडोळा केला जातो. गेल्या काही वर्षांतील वाढत्या तापमानाची किंवा इतर नैसर्गिक आपत्तींची तसेच त्यामुळे झालेल्या मृत्यूंची आकडेवारी बघता पर्यावरणीय संकट आ वासून संपूर्ण जगासमोर उभे असलेले आपल्याला दिसेल.

### उष्णतेची लाट व तिच्यामुळे होणारे विनाशकारी परिणाम

यावर्षी 15 मे रोजी देशाच्या राजधानीने तापमान अंशाचा पारा 49 डिग्री सेल्सिअस चढलेला पाहिला, जो उत्तर भारत आणि पाकिस्तानातील काही भागांमध्ये आलेल्या उष्णतेच्या लाटेचा म्हणजेच 'हीट वेव्ह' चा परिणाम होता. मानवी शरीरासाठी घातक ठरणारी तापमानाची स्थिती असे उष्णतेच्या लाटेचे वर्णन केले जाते. कमाल तापमान हे 45 अंश सेल्सिअस किंवा त्यापेक्षा अधिक असेल तर ‘उष्णतेची लाट’ आणि 47 अंश सेल्सिअस किंवा त्यापेक्षा अधिक असल्यास ‘गंभीर/तीव्र उष्णतेची लाट’ ठरवली जाते. **ह्या उष्णतेच्या लाटेत भारतातील गव्हाचे उत्पादन 3 टक्क्यांनी कमी झाले आणि परिणामी गव्हाच्या पिठाचे भाव वाढले!** भारतीय हवामान विभाग (India Meteorological Department) नुसार मार्च - एप्रिल 2022 मधील उष्णतेची लाट मागील 12 वर्षांतील सर्वाधिक तापमान असलेली होती! भारतात एप्रिल महिन्यातील सरासरी उच्चतम तापमान गेल्या 122 वर्षांतील सर्वाधिक होते, जे 1900 नंतर 2010 (33.09 डिग्री सेल्सिअस) मध्ये आणि त्यानंतर 2022 ( 33.1 डिग्री सेल्सिअस) मध्ये नोंदवले गेले. एका अभ्यासानुसार सरासरी तापमानाची उच्चतम असण्याची नैसर्गिक वारंवारता 312 वर्षांतून एकदा अशी आहे जी सध्यस्थितीत 3.1 वर्षांतून एकदा अशी दिसून येत आहे आणि येत्या काही वर्षांत ती 1.15 वर्षांतून एकदा होणे हे जवळ जवळ निश्चित आहे. गंगानगर राजस्थान - 6 वेळेस, चंद्रपूर, महाराष्ट्र - 5 वेळेस, तर डाल्टनगंज, झारखंडने 2 वेळेस मार्च - एप्रिल ह्या काळात 45 डिग्री सेल्सिअस किंवा त्यावरील तापमानची नोंद केली तर धर्मशाळा, पंचमढी, माडीकेरी यांसारखी थंड हवेची ठिकाणं एप्रिल 2022 मध्ये अपेक्षेहून अत्यंत अधिक तापलेली होती. उष्णतेच्या लाटेदरम्यान उन्हापासून संरक्षणाची साधने उपलब्ध नसलेले गरीब, कष्टकरी अनेक माणसं उष्माघातामुळे मरण पावतात, शेतकी उत्पादनात घट होते ज्यामुळे देशात अन्न संकटाची परिस्थिती निर्माण होऊ शकते. जी पिकं बाजारात येतात त्यांचे देखील पोषण मूल्य अत्यंत खालावलेले असते ज्यामुळे देशस्तरावर कुपोषणाचे प्रमाण वाढते. 1992 ते 2015 दरम्यान उष्णतेच्या लाटेमुळे देशात 24,223 मृत्यू झालेत तर 2020 मधे झालेल्या मृत्यूंची अजून गणना सुरू आहे. 2003 मध्ये उष्णतेच्या लाटेत युरोप मध्ये 70 हजारांहून अधिक लोकांचा तर 2015 मध्ये कराची,पाकिस्तानात 2000 लोकांच्या मृत्यूची नोंद झाली. थोडक्यात जगभरात उष्माघाताचे बळी दिसून येत आहेत.

ह्या वाढत्या तापमानामागचे कारण आहे हवामानातील बदल (क्लायमेट चेंज)! जीवाश्म इंधनांच्या जळणामुळे ( नैसर्गिक गॅस, खनिज तेल, कोळसा) हरितगृह वायूंचे (कार्बन, मिथेन) उत्सर्जन होते व त्यात सूर्याची उष्णता अडकून राहते आणि वातावरणात बदल होतात. ह्या बदलांमुळे उष्णतेच्या लाटेसोबतच पूर, चक्रीवादळ, अतिवृष्टी, अवर्षण इत्यादी नैसर्गिक आपत्ती देखील ओढावतात. **2020 ह्या एकट्या वर्षात भारतात हवामान बदलामुळे 3 चक्रीवादळे, अतिवृष्टी, पूर, पिकांवरील मोठ्या प्रमाणात झालेले टोळ हल्ले, देशस्तरावर उष्णतेची लाट यांमध्ये हजारो लोकांचा मृत्यू झाला आणि लाखोंना विस्थापित व्हावे लागले.** आसाममधील सध्याच्या पूरपरिस्थितीत आजघडीला 2,095 खेडी पाण्याखाली असून, राज्यात 93,245 हेक्टरवरील पिकांचे नुकसान झाले आहे. उत्तराखंड, पंजाब, हरियाणा, दिल्ली आणि हिमाचल प्रदेशातही पूराचा फटका सामान्य जनतेला बसला. हवामान बदलामुळे वाळवंट वाढत आहेत, उष्णतेची लाट, वणवा यांची वारंवारता वाढत आहे, **पृथ्वीच्या दक्षिण आणि उत्तर ध्रुवावरील बर्फ, हिमनद्या वितळत आहेत, ज्यामुळे समुद्राची पातळी वाढत आहे व सखल किनारी भागात पुरांची वारंवारता वाढली असून जगभरात लाखो लोकांना आपली घरं सोडायला लागली आहेत**, ध्रुवीय प्रदेशातील अस्वल, समुद्री जीव नष्ट होण्याच्या मार्गावर आहेत.



### कोण आहे पर्यावरणाच्या ह्या विध्वंसाला जबाबदार?

ह्या संपूर्ण विनाशकारी प्रक्रियेच्या मूळाशी आजची भांडवली व्यवस्था आहे. ही व्यवस्था नफ्यासाठी काम करते. भांडवलदारांमधील गळेकापू प्रतिस्पर्धा कामगारांचे आणि निसर्गाचे सर्वाधिक शोषण करून अधिकाधिक नफा कमावण्याचीच गणितं करते. कारखान्यांतील कचऱ्यामुळे नदी, समुद्र, आकाश आणि हवेचे प्रदूषण करून, कचऱ्याच्या निचऱ्याचे प्रदूषण टाळणारे तंत्रज्ञान उपलब्ध असून देखील स्वतःचा पैसा वाचवणारे, नफ्यासाठी रासायनिक शेती करून जमिनीचा कस नष्ट करणारे, अक्षय ऊर्जा स्रोतांचा वापर न करता जीवाश्म इंधन जाळून ग्लोबल वॉर्मिंगसारख्या भयंकर पर्यावरणीय समस्यांना चालना देणारे, वनसंपदा आणि खनिजांसाठी राजरोसपणे जंगले नष्ट करणारे, बाजारपेठांच्या वाटणीसाठी, नफ्याच्या शर्यतीत विनाशकारी युद्ध लढणारे व त्या युद्धांसाठी पर्यावरणाची सर्वाधिक हानी करणारा शस्त्रास्त्रांचा उद्योग उभे करणारे नफेखोर भांडवलदारच असतात ज्यांच्या चुकांचा सर्वाधिक फटका बसतो आणि पुढेही बसेल तो गरीब, कामगार - कष्टकरी वर्गाला! केरळ, तामिळनाडू, कर्नाटक, गुजरातच्या मासेमारी व्यवसायातील कामगार अतिवृष्टी आणि वादळांमुळे मोठ्या संख्येने प्रभावित झाले. दरवर्षी येणाऱ्या पूरांमुळे उत्तराखंड येथील लोकसंख्या मोठ्या प्रमाणात स्थलांतरित होत आहे. महाराष्ट्रात यावर्षी आलेल्या पूरामुळे हजारो कामगार-कष्टकऱ्यांना रोजगाराच्या संधी नष्ट झाल्याने स्थलांतर करावे लागले आहे. ‘क्लायमेट ॲक्शन नेटवर्क साऊथ एशिया’ च्या अहवालानुसार **2020 मध्ये भारतातील दीड कोटी लोकांना वाढती समुद्र पातळी, अतिवृष्टी, कृषिक्षेत्रातील कमी उत्पादन, दुष्काळ आणि परिसंस्थांचा (इकोसिस्टीम) विनाश अशा हवामान बदलाच्या दीर्घकालीन परिणामांमुळे स्थलांतर करावे लागले आहे.** जरी भारताने हरितगृह वायू उत्सर्जन कमी करण्याच्या संकल्पावर अंमल केले तरी 2050 पर्यंत किमान 4.5 कोटी लोकांना स्थलांतर करावे लागणार आहे ज्यात मुख्यत्वे कामगार-कष्टकरी जनतेचा समावेश असेल. अशा सर्व घटनांमध्ये जीवित आणि वित्त हानी होऊन कामगार-कष्टकऱ्यांचे आयुष्य उध्वस्त होत आहे. ‘इंटर-गव्हर्न्मेंटल पॅनेल ऑन क्लायमेट चेंज’ (आय.पी.सी.सी.) म्हणजे हवामान बदलावरील आंतर-सरकारी समितीच्या ऑगस्ट महिन्यात प्रसिद्ध झालेल्या सहाव्या अहवालानुसार 19व्या शतकाच्या तुलनेत आता जगभरातलं तापमान 1.2 सेल्सिअसने वाढलेलं आहे. तर वातावरणातल्या कार्बन डायऑक्साईडचं प्रमाण 50 टक्क्यांनी वाढलंय. हवामान बदलाचे विपरित परिणाम होणं टाळायचं असेल तर जगाचं तापमान वाढण्यापासून रोखणं गरजेचं असल्याचं शास्त्रज्ञांनी म्हटलंय. या अहवालात 'नाईलाजास्तव' मांडण्यात आले आहे की – ‘भांडवलशाहीला शाश्वत ठेवता येणे शक्य नाही. आता भांडवलशाहीत खूप आर्थिक विकास होईल असे वाटत नाही. हवामान बदल हाताच्या बाहेर जाण्याआधी नफा केंद्रस्थानी ठेवून होणारे उत्पादन थांबवावे लागेल.’

भांडवली व्यवस्थेवर येणारे संकट ओळखून हरितगृह वायूंच्या वाढत्या उत्सर्जनाला रोखण्यासाठी 1997 मध्ये संयुक्त राष्ट्र परिषदेने क्योटो येथे आयोजित केलेल्या परिषदेत 192 देशांसोबत हरितगृह वायूंच्या उत्सर्जनात कपात करण्याचा करार करण्यात आला ज्यात मुख्य जबाबदारी विकसित देशांवर होती. पण 2012 पर्यंत कर्बाचे (कार्बनचे) उत्सर्जन 1990 च्या कर्ब उत्सर्जनापेक्षा 5.2% ने कमी करण्याचा संकल्प तर सोडाच, ते 40% ने अजून वाढले आहे! त्यानंतर त्याची मुदत 2020 पर्यंत करण्यात आली परंतु त्यातही यश आले नाही. विकसित देशांनी दिलेली आश्वासनं दिखाव्याचीच होती. 2015 च्या पॅरिस करारामध्ये विकसनशील देशांवर सुद्धा बंधनं लादली गेली. या करारामध्ये झालेल्या जागतिक तापमान वाढ 2 डिग्री सेल्शिअसच्या आत ठेवण्याच्या संकल्पावरही आता काळे ढग नाचू लागले आहेत. आय.पी.सी.सी.च्याच एका अहवालानुसार येत्या दशकभरातच पृथ्वीचे तापमान 2 डिग्री सेल्शिअस वाढणार आहे. विकसित देशांनी 2020 पर्यंत दरवर्षी 100 अब्ज डॉलर्स याप्रमाणे 500 अब्ज डॉलर्स विकसनशील देशांना मदत म्हणून या करारांतर्गत देण्याचे ठरले होते. परंतु त्याच्या 25% रक्कम सुद्धा अद्याप जमा झालेली नाही. नुकत्याच झालेल्या ग्लासगोव परिषदेमध्ये आलेल्या विविध देशांच्या प्रतिनिधींनी पर्यावरण संवर्धनाबाबत गंभीर असल्याचा आव आणला, पण कुठल्याही प्रकारची ठोस पाऊले उचलण्याचा निर्णय या परिषदेमध्ये झाला नाही. त्यामुळे ही परिषद सुद्धा अपयशी ठरली आहे. **ज्या 2 डिग्री तापमान वाढीवर जगातील देशांच्या सरकारांनी एकाप्रकारे छुपी सहमती बनवली आहे, त्याचा अर्थ काय?** पृथ्वीचे तापमान जर 2 डिग्री वाढले तर त्यामुळे पृथ्वीच्या दक्षिण आणि उत्तर ध्रुवावरील बर्फ वितळून समुद्रपातळी वाढेल आणि अनेक देश आणि समुद्रकिनारी असलेली शहरे कायमस्वरूपी पाण्याखाली जातील, चक्रीवादळे-अतिवृष्टी-अवर्षण यात कैक पटींनी वाढ होईल, **हिमालयातील बर्फ वितळून गंगा-यमुनेसारख्या नद्यांचे बारमाही अस्तित्वही धोक्यात येईल, पृथ्वीच्या वातावरणात अपरिवर्तनीय असे बदल होतील.** थोडक्यात कोट्यवधी लोकांचा जीव देण्याची तयारी जगातील भांडवली सरकारे करून चुकली आहेत आणि हवामान बदलाच्या परिषदा फक्त तमाशा आहेत!

### घनदाट वनक्षेत्रे आपल्या कॉरपोरेट मित्रांच्या घशात ओतून पर्यावरणाला आणि कामगार-कष्टकरी जनतेला उध्वस्त करणारे मोदी सरकारचे अच्छे दिन!!

'ग्लोबल फॉरेस्ट वॉच' नुसार, 2014 ते 2018 दरम्यान, भारतातील 1,20,000 हेक्टर जंगलांचे भूभाग साफ करण्यात आले. 2009 ते 2013 दरम्यान झालेल्या वनक्षेत्र तोडीपेक्षा हे 40% अधिक आहे. देशातील काही घनदाट वनक्षेत्रांबद्दल सांगायचे तर, 2014 पासून अवघ्या 4 वर्षांत कोकण आणि महाराष्ट्राच्या पश्चिम किनारपट्टीवर पसरलेल्या सावंतवाडी दोडामार्ग वन्यजीव कॉरिडॉरचे 1600 एकरचे वनक्षेत्र भुईसपाट केले आहे. सुरुवातीला या भागातील खाणकाम आणि इतर औद्योगिक हालचाली नियंत्रणात ठेवण्याचे आश्वासन देण्यात आले होते, परंतु नंतर अडानी आणि वेदांता सारख्या कॉर्पोरेट कंपन्यांना जनतेच्या मालकीची नैसर्गिक साधनसंपत्ती लूटण्याची मोकळीक देण्यात आली आणि देशातील हे घनदाट वनक्षेत्र आता संपुष्टात येण्याच्या मार्गावर आहे. सरकारच्या महत्त्वाकांक्षी "बुलेट ट्रेन" प्रकल्पासाठी, पश्चिम घाटातील 438 हेक्टर घनदाट जंगले साफ करण्याचा प्रस्ताव मंजूर करण्यात आला आहे, त्यापैकी 131 हेक्टर 'मॅनग्रोव्ह' जंगलाचा भाग आहे. आजच्या युगात हवामान आणि पर्यावरणाच्या दृष्टिकोनातून खारफुटीचे जंगल हे एक मौल्यवान साधनसंपत्ती आहे. खारफुटीच्या जंगलांमध्ये सूर्याच्या प्रखर किरणांपासून आणि अल्ट्राव्हायोलेट-बी किरणांपासून संरक्षण करण्याची क्षमता आहे. खारफुटीची जंगले प्रकाशसंश्लेषणाद्वारे वातावरणातील कार्बन डायऑक्साइड कमी करतात. ते सागरी भागात आढळणाऱ्या फायटोप्लँक्टनपेक्षा जास्त कार्बन डायऑक्साइड (प्रति युनिट क्षेत्रफळ) शोषून घेतात, मातीमध्ये कार्बन मोठ्या प्रमाणात साठवतात आणि त्यामुळे हरितगृह परिणाम कमी करतात. या भागातील खारफुटीच्या जंगलांचा नाश केल्याने पर्यावरण आणि हवामानावरच विनाशकारी परिणाम होणार नाहीत तर ह्या किनारी भागातील मत्स्य उद्योगही नष्ट होईल. याशिवाय, मोदी सरकारच्या अत्यंत लाडक्या असलेल्या अदानी समूहाला छत्तीसगडच्या हसदेव अरंड जंगलात कोळशाच्या खुल्या कास्ट खाणकामासाठी मंजुरी मिळाली आहे. हसदेव प्रदेश हा मध्य भारतातील 170,000 हेक्टरमध्ये पसरलेल्या अत्यंत

**पान 8 वर**

# 136वा कामगार दिन देशभरात क्रांतिकारी कामगारवर्गाकडून साजरा

✍ बिगुल पत्रकार

आंतरराष्ट्रीय कामगार दिनानिमित्त मे दिवसाचा वारसा स्मरुन देशभरात क्रांतिकारी कामगार संघटनांनी कामगारांच्या एकजुटीचे प्रदर्शन करत विविध कार्यक्रमांचे आयोजन केले.

महाराष्ट्रात पुणे, मुंबई आणि अहमदनगर येथे कामगार संघटनांनी कामगार दिवसाच्या इतिहासाला उजाळा दिला. पुण्यामध्ये महाराष्ट्र बांधकाम कामगार युनियनने अप्पर डेपो येथे “कामगार दिन रॅली” आयोजित केली होती. ह्या रॅलीत शेकडो कामगारांनी सहभाग घेतला होता. “कामगार दिन चिरायू होवो”, “कामगार एकजूट जिंदाबाद”, “इंकलाब जिंदाबाद”च्या जनघोषाने सभोवतालचा परिसर दुमदुमून गेला होता. रॅलीमध्ये भारताचा क्रांतिकारी कामगार पक्ष, तसेच स्त्री मुक्ती लिगही सहभागी झाले. यावेळी युनियनचे साथी निमिष ह्यांनी उपस्थित कामगारांसमोर मे दिवसाचा इतिहास मांडला, तसेच कामगार चळवळीच्या गौरवशाली इतिहासातून प्रेरणा घेऊन आज पुन्हा कामगारांनी आणखी झुंजारपणे संघटित होण्याची गरज असल्याचे सांगितले. कॉम्रेड परमेश्वर जाधव ह्यांनी सभेला संबोधित करताना कामगारांनी इतिहासापासून शिकून संघटित होण्याचे महत्त्व मांडले आणि फॅसिस्ट राजवटीत महागाई, बेरोजगारीवरचे लक्ष भरकटवण्यासाठीच जातीय धार्मिक दंगली भडकावल्या जात आहेत असे मांडले. भारताचा क्रांतिकारी कामगार पक्षाकडून (RWPI) रॅलीच्या समर्थनात कॉ. निखिल एकडे ह्यांनी सभेत मांडले की कामगारांनी आज केवळ कामाचे तास कमी करण्यासाठीच नव्हे तर आपले राजकारण उभे करण्यासाठी, आपले राजकीय प्रतिनिधी सत्तेत पोचवण्यासाठी संघटित होणे गरजेचे आहे. स्त्री मुक्ती लीग तर्फे समर्थन जाहीर करताना साथी अश्विनी ह्यांनी स्त्री कामगारांच्या परिस्थितीचे चित्रण केले. स्त्रियांची मुक्ती आणि कामगारांची मुक्ती ह्या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत, व कामगारांच्या मुक्तिशिवाय स्त्रियांची मुक्ती देखील शक्य नसल्याचे सांगितले. सभेमध्ये झालेल्या सांस्कृतिक कार्यक्रमात स्त्री मुक्ती लीग तर्फे ‘कहाणी कष्टकरी बाईची’ हे पथनाट्य सादर केले गेले. कामगार चळवळीतील काही क्रांतिकारी गीते देखील सादर करण्यात आली. जोषपूर्ण घोषणांनी कार्यक्रमाची सांगता झाली.

भारताचा क्रांतिकारी कामगार पक्षातर्फे मानखुर्द-गोवंडीतील वस्त्यांमध्ये सांस्कृतिक संध्येचे आयोजन करण्यात आले. यादरम्यान मॉडर्न टाइम्स ह्या चित्रपटाचे स्क्रिनिंग करण्यात आले. तसेच 1 मे रोजी सांस्कृतिक संध्येसोबत रॅलीचे आयोजन देखील करण्यात आले. ह्या संपूर्ण 5 दिवसीय कार्यक्रमाला लोकांचा उत्तम प्रतिसाद मिळाला. कार्यक्रमादरम्यान सफदर हाशमी लिखित “मशीन” नाटक सादर केले गेले तसेच क्रांतिकारी गीतांची प्रस्तुती झाली. तसेच अहमदनगर येथे सिद्धार्थनगर भागात रॅलीचे आयोजन करण्यात आले. रॅलीमधे वस्तीतील कामगार, कष्टकरी सहभागी झाले. कॉ.अण्णाभाऊ साठे यांना अभिवादन करून रॅलीची सुरुवात करण्यात आली. रॅलीमध्ये “आंतरराष्ट्रीय कामगार दिन चिरायू होवो”, “कामाचे तास 6 झालेच पाहिजेत”, “प्रत्येक हाताला काम मिळालेच पाहिजे”, “सर्वांना मोफत, दर्जेदार शिक्षण मिळालेच पाहिजे” अशा जोरदार घोषणा देण्यात आल्या. यावेळी बोलताना कॉ. अतुल ह्यांनी मांडले की कामगारांनी लढून मिळवलेले अधिकार फॅसिस्ट मोदी सरकार काढून घेत आहे, जातीयवाद आणि विषारी धर्मवादाचे विष पसरवले जात आहे, याविरोधात व्यापक कामगार, कष्टकरी जनतेने एकजूट केली पाहिजे.




दिल्लीतील जंतरमंतर येथे वाढती महागाई, बेरोजगारी, कामगार कायद्यांवरील आक्रमणाविरोधात आयोजित आंदोलनात दिल्ली स्टेट आंगनवाडी वर्कर्स एण्ड हेल्पर्स यूनियन, बिगुल मजदूर दस्ता, दिल्ली इस्पात उद्योग मजदूर यूनियन, बवाना क्षेत्र औद्योगिक मजदूर युनियन, दिल्ली घरेलू कामगार यूनियनसह इतर विविध संघटना सहभागी झाल्या होत्या. विशेष म्हणजे दिल्लीतील मंडी हाऊस ते जंतरमंतरपर्यंत रॅलीच्या रूपात हा निषेध करण्यात येणार होता. परंतु प्रशासनाने शांतता राखण्याचे कारण देत कार्यक्रम आयोजित करण्याची विनंती फेटाळून लावली. मात्र दिल्ली पोलिसांच्या या सर्व डावपेचांना न जुमानता कामगारांनी जंतरमंतरवर यशस्वीपणे आंदोलन आयोजित केले. गुडगावच्या ऑटोमोबाईल इंडस्ट्री कॉन्ट्रॅक्ट वर्कर्स युनियनतर्फे सरकारच्या या कामगार विरोधी धोरणांच्या विरोधात ऑटोमोबाईल क्षेत्रातील कामगारांमध्ये कामगार दिनाच्या दिवशी निषेध सभा आयोजित करण्यात आली होती.

बिगुल मजदूर दस्ताच्या वतीने उत्तर प्रदेशातील अलाहाबाद, गोरखपूर, आंबेडकर नगर, लखनौ, मथुरा यांसह अनेक ठिकाणी मे दिनानिमित्त कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. अलाहाबाद येथील एन.आर.एम.यू. च्या सभागृहात 'कामगार दिनाचा वारसा आणि आपले सध्याचे कार्यभार' या विषयावर चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. यासोबतच अलाहाबाद येथील लेबर चौकात कामगारांमध्ये सभा घेऊन पत्रकांचे वाटप करण्यात आले. गोरखपूरच्या बरगदवा औद्योगिक परिसरात बिगुल मजदूर दस्ता आणि टेक्सटाइल वर्कर्स यूनियनच्या वतीने परिसरातून मिरवणूक काढण्यात आली. मे दिनानिमित्त लखनौच्या खदरा भागात आणि तालकटोरा औद्योगिक परिसरात कोपरा सभा करून पत्रके वाटण्यात आली. मथुरेत चर्चासत्राचे आयोजन केले गेले आणि मोदी सरकारच्या कामगार विरोधी धोरणांचा व जातीयवादाच्या निषेधार्थ मिरवणूक काढण्यात आली. कामगार दिनाच्या पूर्वसंध्येला आंबेडकरनगर जिल्ह्यात भारताचा क्रांतिकारी कामगार पक्षा (RWPI) तर्फे जाहीर सभेचे आयोजन करण्यात आले होते. या सभेत सांस्कृतिक कार्यक्रम आणि नाटक सादर करण्यात आले. यासोबतच आझमगड जिल्ह्यात आरडब्ल्यूपीआयने कोपरा सभा आयोजित केल्या.

बिगुल मजदूर दस्ताकडून हरिद्वार येथे आणि हरियाणाच्या नरवाना जिल्ह्यात कोपरा सभा आणि जनसंपर्क मोहीम राबवून पत्रकांचे मोठ्या प्रमाणात वाटप करण्यात आले. हरियाणामध्ये क्रांतिकारी मनरेगा मजदूर युनियन आणि आरडब्ल्यूपीआय तर्फे मनरेगा कामगारांमध्ये एक बैठक आणि सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमादरम्यान 'देश पुढे जाऊ द्या' हे नाटकही सादर करण्यात आले. पाटणा येथे आरडब्ल्यूपीआयच्या कार्यकर्त्यांनी मे दिनानिमित्त सभेचे आयोजन केले.

मे दिनाचा इतिहास असा आहे की 1 मे 1886 रोजी अमेरिकेतील लाखो कामगारांनी 'आठ तास काम, आठ तास विश्रांती आणि आठ तास मनोरंजन' या राजकीय मागणीसाठी एकत्र येऊन संप करण्याचा निर्णय घेतला. जवळपास 11 हजार कारखान्यांतील किमान 3 लाख 80 हजार कामगार संपात सहभागी झाले होते. कामगार संघटित होताना पाहून घाबरलेल्या मालक-भांडवलदारांनीही प्रत्युत्तर म्हणून कामगार वर्गावर वारंवार हल्ले केले. 4मे ला कामगारांच्या सभेवर भांडवलदारांच्या इशाऱ्यावर पोलिसांनी बॉम्ब टाकले ज्यात सहा कामगारांचा मृत्यू झाला आणि 200 हून अधिक जण जखमी झाले. या खटल्यात पोलिसांनी षडयंत्र करून आठ कामगार नेत्यांना अटक केली आणि त्यापैकी सात जणांना फासावर चढवले. अमेरिकेतील कामगारांच्या या राजकीय संघर्षाला आणि बलिदानाला स्मरून हा कामगार दिन जगभरात साजरा केला जातो. दक्षिण कोरिया, श्रीलंका, कंबोडीया, सर्बिया, टर्की, पाकीस्तान, ग्रीस, फ्रांस, सायप्रस आणि इतर देशांमध्ये हजारो कामगार आणि कार्यकर्त्यांनी विविध कार्यक्रमांचे आयोजन केले आणि मे दिवसाचा वारसा पुढे चालवला. तुर्कस्तानच्या इस्तांबुल येथे मे दिवसानिमित्त महागाईच्या विरोधात निदर्शने करणार्या 164 कार्यकर्त्यांना पोलिसांनी अटक केले. फ्रांसमध्ये सामान्य जनतेप्रती निष्क्रीय सरकारच्या विरोधात डाव्या शक्तींनी हजारोंच्या संख्येने जवळपास 250 विरोध प्रदर्शने केली. इटलीच्या रोममध्ये स्लोवाकीया आणि चेक प्रजासत्ताक या देशांमध्ये कामगार आणि विद्यार्थांनी एकत्र येऊन युक्रेनच्या समर्थनात आणि रशियाच्या विरोधात निदर्शने केली. जगभरामध्ये अशाप्रकारे कामगार दिन साजरा केला गेला.

आज कामगार चळवळ जरी दुरुस्तीवाद, अर्थवादाच्या फेऱ्यात अडकून थंडावल्यासारखी दिसत असली तरी कामगार दिनाचा वारसा जगभरातील क्रांतिकारी कामगार विसरलेले नाहीत, आणि शिकागोच्या शहीदांचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा केल्याशिवाय रहाणार नाहीत.

## कविता

### लहर

मी होते एक थंड आणि पातळशार धार
जंगल आणि पर्वतातून धावणारी
दऱ्याखोऱ्यांतून मला जाणवले
की साचलेले, थांबलेले पाणी आतून मरून जाते
मला जाणवले की सागरलहरींना भेटणे
हे इवल्याशा धारांना नवजीवन देणे आहे
ना दीर्घ पल्ल्याचा रस्ता ना पाताळी खड्डा
ना थांबण्याची लालसा.. थांबवू शकेल मला
वाहण्यापासून
आता मी समाहित झाले आहे चिरंतन लहरींमध्ये
आता संघर्षात माझे अस्तित्व आणि
मृत्यूत विश्रांती.

*- मर्ज़िएह ऑस्कोई*

*(ईराणी क्रांतिकारी कवयित्री ज्यांची इराणच्या शाहच्या एजंटांनी हत्या केली होती.)*

अनुवाद: अमन

### स्वप्नांना

स्वप्नांना आवळून ठेवा घट्ट,
त्यांच्या मृत्यूनंतर
जीवन आहे एक पंख तुटलेली चिमणी
जी उडू शकत नाही..
स्वप्नं आवळून ठेवा,
स्वप्नांशिवाय
जीवन आहे बर्फाच्छादित
नापीक जमीन.

- *लँगस्टन ह्यूज.* अनुवाद: अमन

# देहविक्रय `व्यवसाय' नाही, पतीत समाजव्यवस्थेचे लक्षण आहे!

पान 16 वरून

वाटणे अशाप्रकारच्या "तरणोपाय" विचारांच्या प्रभावामुळेही अनेक स्त्रिया या व्यवसायाला "स्वेच्छेने" केलेला म्हणू लागतात.

ज्यांना देहविक्रय हा "व्यवसाय" तितकाच "व्यवसाय" वाटत असेल जितका इतर कोणता व्यवसाय आहे तर याची खुलेआम घरोघरी जाहिरात का केली जाऊ नये आणि याचे समर्थन करणाऱ्यांनी थोडाफार का होईना आदर्श घालून देण्याकरिता स्वत:पासून सुरुवात का करू नये? **मानवी प्रतिष्ठेला पायदळी तुडवणाऱ्या या कामाला "व्यवसाय" म्हणणे तेव्हाच शक्य आहे जेव्हा अशा घृणास्पद कामांना जन्म देणाऱ्या आणि टिकवणाऱ्या शोषणकारी, दमनकारी समाजव्यवस्थेला मान्यता देत तिच्यापुढे शरणागती पत्करलेली असेल.**

### क्रांतिकारी सोवियत रशियाने असा संपवला देहविक्रय

जगातील असे दोन देश आहेत जिथे देहविक्रय करणाऱ्यांची संख्या हजारोंमध्ये होती, प्रचंड गरिबी, दयनीय अवस्था होती, शिक्षण नसल्यामुळे पोट भरण्यासाठी मजुरी देणारे दुसरे साधन ही नव्हते. अशा चीन आणि रशियामध्ये कामगारांची सत्ता स्थापन झाल्यावर समाजात झालेल्या आमुलाग्र परिवर्तनाने देहविक्रय व्यवसायाचा खात्मा केला.

झारशाहीच्या काळात रशियामध्ये व्यापक प्रमाणात देहविक्रय व्यवसाय चालू होता. झार सरकारच्या देखरेखीत हे चालत होते. वेश्यांना पिवळे तिकीट धारक म्हणत असत. ह्या व्यवसायात येणाऱ्यांना पिवळे तिकीट दिले जात असे. जे मिळाल्यावर त्यांचा पासपोर्ट रद्द होत असे, जो दुसऱ्या कुठल्याही नोकरीसाठी अनिवार्य असे. एकदा व्यवसायात पाऊल टाकल्यावर ते पुन्हा मागे घेता येत नव्हतं. त्यांना समाजापासून वेगळं काढलं गेलं होतं. भारतातील ` रेड लाइट ' भागांप्रमाणेच तिथेही वेश्यांना राहण्यासाठी इतर समाजापासून दूर अशी जागा होती. क्रांतीपुर्वी एकट्या पीटर्सबर्ग शहरात वेश्यांची संख्या 60,000 च्या वर पोचली होती. 10 पैकी 8 महिला या 21 वर्षांखालील होत्या. त्यातून निम्म्या पेक्षा जास्त स्त्रियांनी वयाची 18 वर्षे पूर्ण होण्याआधीच देहविक्रय "व्यवसाय" म्हणून स्वीकारले होते. ह्या व्यवसायातून मिळणाऱ्या कमाईचा एक वाटा जिल्हाप्रमुख किंवा मुख्य अधिकाऱ्यांना द्यावा लागत असे.

1917 मध्ये रशियन कामगारांनी आणि शेतमजूरांनी मिळून बोल्शेविक पार्टीच्या नेतृत्वात झारशाही उलथून टाकून समाजवादी राज्याची स्थापना केली. क्रांतीने आर्थिक विषमता नष्ट करण्यासोबतच समाजातील वाईट प्रवृत्तींवर ( देहविक्रय, दारुबाजी, स्त्रीगुलामी ) देखील हल्ला चढवला. सोव्हिएत सरकारने देहविक्रयाविरोधात सर्वप्रथम हल्ला चढवला. वेश्यावृत्तीला मुळापासून समजून घेण्यासाठी डॉक्टर, मनोवैज्ञानिक, मानसोपचार तज्ञ तसेच कामगार नेत्यांनी मिळून एक प्रश्नावली तयार केली आणि रशियामधील विविध वयोगटातील हजारो महिला मुलींमध्ये ते वाटून योग्य ती गोपनीयता पाळून त्यांची उत्तरे मागवली. या **सर्वेक्षणातून खालील तथ्य समोर आले.**

- देह व्यापाराच्या फक्त त्या स्त्रिया शिकार बनल्या ज्यांना भुलवून या व्यवसायात ओढलं गेलं. ओढणारे लोक म्हणजे ते जे या व्यापारातून मिळणाऱ्या गडगंज नफ्याचे भागीदार होते.

- गरीब-असहाय महिलांचे प्रचंड प्रमाण असल्यामुळे ह्या व्यवसायातून प्रचंड नफा कमावता येत होता.

- सर्वसाधारणपणे दैन्यावस्था इतकी शिगेला पोचली होती की पैशाची थोडी लालुच देखील या स्त्रियांना आपले शरीर विकायला भाग पाडत असे.

- बऱ्याच स्त्रियांनी सांगितले की त्यांना **दुसरे चांगले काम मिळाले तर त्या नक्कीच हा व्यवसाय सोडून देतील.**

या सर्व तथ्यांना ध्यानात धरून सोव्हिएत सरकारने 1925 साली देहविक्रया विरोधात एक कायदा पास केला. डायसन कार्टर यांनी त्यांच्या `पाप आणि विज्ञान' या पुस्तकात हे कायदे आणि त्यानंतर झालेल्या परिवर्तनांच्या खालीलप्रमाणे नोंदी केल्या आहेत. **कायद्यातील तरतूदी अशा होत्या:**

1. आत्मनिर्भर, काम करणाऱ्या, घरापासून दूर राहणाऱ्या, गर्भवती, लहान मुले असलेल्या स्त्रियांना कामावरून काढले जाणार नाही.

2. प्रचंड प्रमाणात पसरलेल्या बेरोजगारी वर तात्पुरता उपाय म्हणून सर्व सत्ताधारी संस्थांना निर्देश देण्यात आले की **सहकारी संस्था आणि शेतीला संघटित करून गरीब स्त्रियांसाठी रोजगार उपलब्ध करून द्यावा.**

3. शाळा, प्रशिक्षण केंद्रांमध्ये भरती व्हायला स्त्रियांना प्रोत्साहित केलं जावं तसेच कामगार संघटनांनी या मान्यतेविरोधात तीव्र संघर्ष चालवावा की "गिरण्या कारखान्यांमध्ये महिलांनी काम करू नये."

4. ज्या स्त्रियांना राहण्याची जागा नाही अथवा गावाकडून शहरात आलेल्या स्त्रियांसाठी आवास अधिकाऱ्याने राहण्यालायक सहकारी घरांची तरतूद करावी.

5. अनाथ मुलं व तरुण मुलींच्या सुरक्षेचे नियम सक्तीने लागू करावेत.

6. गुप्त रोग आणि वेश्यावृत्तीच्या दुष्परिणामांविरोधात सामान्य जनतेला जागृत करण्यासाठी अज्ञानावर हल्ला केला जावा. ही भावना सामान्य जनतेत रुजवावी की नवीन लोकतंत्राच्या मदतीने आपण हे रोग उखाडून फेकू.

**ठेकेदार, वेश्या आणि ग्राहकांप्रती 3 वेगळे नियम लागू केले.**

1. वेश्याघर चालवणारे मालक मग ते घरमालक असो की हॉटेलमालक, किंवा मानवी तस्करीतून नफा कमावणारे ठेकेदार ह्या सर्वांना अटक करून कायद्यानुसार कडक शासन केले जावे.

2. वेश्यावृत्तीतून बाहेर आलेल्या स्त्रियांबद्दल जनता आणि फौजेला (सोवियत रशियामध्ये कामगार वर्गाच्या सेनेला संघटित केले गेले. फौजेतील सर्व सैनिक हे कामगार-कष्टकरी वर्गाशी जोडलेले लढवैये होते) सूचित केलं जावं की त्यांना इतर नागरिकांप्रमाणे समान वागणूक दिली जावी. पोलिसी छाप्यांदरम्यान त्यांना समान नागरिक समजलं जावं. त्यांना अटक केली जाणार नाही तर फक्त ठेकेदाराविरोधात साक्ष देण्यासाठी त्यांना न्यायालयात आणले जाईल.

3. ग्राहकांप्रती सामाजिक दबावाचे धोरण अवलंबले जाईल. त्यांना अटक न करता त्यांचे नाव, पत्ते आणि कामाचे ठिकाण नोंद करून बाजाराच्या ठिकाणी, कारखाने गिरण्यांच्या बाहेर ही सर्व नावे छापलेली पाटी लटकवली जाई ज्यावर नाव पत्त्यासोबतच लिहिलेले असे की "महिलांचे शरीर विकत घेणारा".

### सामाजिक पुनर्वसन

देहविक्रय व्यवसायातून बाहेर पडलेल्या स्त्रियांना पूर्णतः त्या वातावरणातून बाहेर काढण्यासाठी विविध धोरणांचा अवलंब केला गेला. उपचारांच्या ठिकाणी फौजेतील किमान एक व्यक्ती कायम सोबत असणे. उपचार होऊन बाहेर पडण्याआधीच अशा रोजगाराचा पर्याय शोधून ठेवणे, ज्याने पैशासाठी पुन्हा लाचार होण्याची वा कोणापुढे हात पसरण्याची वेळ येणार नाही. ह्या नवीन कामाचे प्रशिक्षणावेळी सुद्धा फौजेतील व्यक्तीसोबत प्रशिक्षण घेतील, आणि कामावर रुजू झाल्यावर सुद्धा किमान एक फौजेतील व्यक्ती कायम सोबत काम करेल. पूर्वजीवनाबाबत योग्य ती गोपनीयता ठेवून समाजाच्या एका घरात राहण्याची पूर्ण सोय केली जाई. फौजेतील व्यक्तींकडून मैत्रीपूर्ण नातं प्रस्थापित करून समाजात राहण्यासाठी रुची निर्माण करण्यावर जोर दिला जाई. प्रत्येक जिल्ह्याच्या देखरेख करणाऱ्या टीमची महिन्यातून तीन वेळेस बैठक होत असे व त्यात येणाऱ्या अडी-अडचणींवर चर्चा करून उपाय काढला जात असे. काही विशिष्ट बाबींसाठी कायद्याच्या तत्काळ संरक्षणाची देखील व्यवस्था केली होती.

परिणामी, सोव्हिएत रशियात समाजवादी क्रांतीनंतर पहिल्या 5 वर्षातच गैरव्यावसायिक वेश्यावृत्ती पूर्णतः नष्ट झाली. 25,000 पेक्षा जास्त स्त्रिया व्यवसायातून निघाल्यावर रुग्णालयातून उपचार घेऊन एक सामान्य आयुष्य जगू लागल्या. 80 टक्क्यांपर्यंत स्त्रिया शेती किंवा कुठल्या ना कुठल्या उद्योगात कामाला लागल्या. 3000 व्यावसायिक स्त्रिया अजूनही वेश्याव्यवसायात राहिल्या, आणि पुढील काळात रशियात वेश्याव्यवसाय नावालाही उरला नाही.

रशियाप्रमाणेच चीनमध्ये सुद्धा माओंच्या नेतृत्वात 1949 मध्ये महान सर्वहारा सांस्कृतिक क्रांतीद्वारे कामगारांची सत्ता स्थापन झाली. त्यानंतर देहविक्रयाचा पूर्णतः खात्मा करून सर्व स्त्रियांना नवीन आणि सन्मानजनक रोजगाराची साधने उपलब्ध करून दिली. चीन व रशियामध्ये भांडवलशाहीची पुनर्स्थापना झाल्यावर वरील प्रथा पुन्हा वाढीस लागल्या कारण भांडवलशाहीच्या हातात हात घालूनच ह्या कुप्रथा वाढीस लागतात.

**इतिहासात झालेल्या कामगार क्रांत्यांनी हे दाखवून दिलंय की बिभत्सतेचे हे सर्वोच्च रूप देखील नष्ट करून सर्व मानवी मूल्ये जोपासणारी मानवतेवर आधारलेली व्यवस्था स्थापन केली जाऊ शकते. मानवी शरिरालाही विक्रेय वस्तू मानणाऱ्या भांडवली व्यवस्थेला, आणि तिच्या मूल्यमान्यतांना गाडणारी कामगारांची सत्ता स्थापन करूनच देहविक्रयासारख्या अमानवीय कृतींना संपवले जाऊ शकते.**

# ज्ञानवापी मशीद प्रकरण: कामगार वर्गीय दृष्टिकोन

पान 15 वरून

महागाईने कळस गाठला आहे. बेरोजगारी व गरिब-श्रीमंत दरी वाढते आहे आणि अर्थव्यवस्था नफ्याच्या घसरत्या दराच्या संकटाने ग्रस्त आहे. मालक वर्ग मात्र देशातील कामगार वर्गाच्या शेवटच्या रक्ताच्या थेंबालाही शोषून नफ्याचा दर टिकवण्याची धडपड करत आहे. मजुरी-गुलामी सोबतच देशातील दलित जातीय दमन आणि स्त्रिया पितृसत्ताक गुलामीचा दंश झेलत आहेत. अशा स्थितीत मंदिर-मशीद हा मुद्दाच असू शकत नाही. अशा सर्व स्थळांचं राजकीयीकरण धार्मिक कारणानी नव्हे तर राजकीय कारणांनी होते हे लक्षात घ्या. त्यामुळेच आज व्यवस्थेला तिच्या संकटाच्या काळात टिकवण्याच्या धडपडीत फॅसिस्ट काळाला मागे ढकलण्यासाठी शक्ती लावत आहेत. हे करण्यात फॅसिस्ट भारतीय जनतेमधील तार्किकतेचा अभाव, वैज्ञानिक दृष्टिकोनाचा अभाव आणि वर्गचेतनेच्या अभावाचा फायदा करून घेत आहेत.

त्यामुळे कामगार वर्गाने योग्य वैज्ञानिक दृष्टिकोन अवलंबुन मंदिर-मशीद सारख्या अत्यंत अतार्किक व प्रतिक्रियावादी तर्कांतुन मुक्त झाले पाहिजे. आजचा संघर्ष आजच्या अन्यायाच्या विरुद्ध म्हणजे भांडवलशाही-साम्राज्यवादाच्या विरोधाचा संघर्ष आहे. ह्याच संघर्षात धार्मिक ध्रुवीकरण करून कामगार-कष्टकऱ्यांत फूट पाडणे हे मालक वर्गाचे हत्यार आहे. ह्यासाठी मालक वर्गाच्या ढालीच्या स्वरूपात खोट्या शत्रूची निर्मिती करणे, परत परत खोटे बोलून आणि आपल्या विशाल प्रचार यंत्रणेच्या माध्यमातून मिथकांना सामान्य बोध बनवले जाते. अशा वेळी कामगार वर्गाला विभाजनवादी राजकारणाला दूर सारून आपल्या सशक्त वर्ग एकतेने आणि राजकीय वर्गचेतनेने ह्याला उत्तर द्यावे लागेल.

सोबतच अशा प्रकरणांना सुट्या सुट्या अतिरेकी किंवा अराजकच्या घटना म्हणून बघण्याचा उदारमतवादी विभ्रम अत्यंत घातक आहे. **'फायर ब्रिगेड अप्रोच' सोडावा लागेल. म्हणजे अशा घटना घडल्यावर त्याला "विझवण्याचा" प्रयत्न करण्यासाठी प्रेम, सद्भावनेची फुंकर घालणे, निवेदनं देणे हे करून फॅसिस्टांना कणमात्रही फरक पडत नाही.** आपल्याला कामगार-कष्टकऱ्यांच्या आयुष्याच्या खऱ्या प्रश्नाला भिडणाऱ्या भांडवलशाही विरोधी मजबूत एकीच्या आणि जनतेच्या वर्गजाणिवेच्या आधारावर ह्याला उत्तर द्यावे लागेल. फॅसिस्ट शक्तींना गल्लोगल्ली कामगार वर्गीय शक्तींकडून सक्रिय प्रतिरोध उभा करून हद्दपार करावे लागेल आणि रस्त्यावरील प्रतिकारासाठी तयार राहावे लागेल.

# ज्ञानवापी मशीद प्रकरण: कामगार वर्गीय दृष्टिकोन



पान 1 वरून

घेतला. ह्या कायद्यात नमूद केल्याप्रमाणे 1947 रोजी अस्तित्वात असणारी धार्मिक उपासना स्थळं आहे त्याच स्थितीत राहावेत आणि त्यासंबंधातील कुठलाही वाद कोर्टात नेला जाऊ नये ह्यासाठी सर्व धार्मिक स्थळांना संरक्षित वास्तू घोषित करण्यात आले. या कायद्यावर प्रश्न उपस्थित करण्याचे काम आता संघ समर्थकांनी चालू केले आहे.

ह्यानंतरही देशात भाजप सत्तेत असो वा नसो गरजेनुसार अशा मुद्द्यांना वेळोवेळी खतपाणी घालण्यात आले आहे. परंतु आज भाजप सत्तेत आहे आणि सरकार आर्थिक संकटाच्या मधोमध आहे. अशा वेळी सत्तेला धार्मिक उन्मादाची आवश्यकता आहेच. त्याचाच भाग म्हणून ज्ञानवापी मशीद ही जुनी काशी विश्वनाथची जमीन आहे; मशिदीला हटवून तिथला कब्जा हिंदूंना देण्यात यावा, अशी मागणी सुरू करण्यात आलेली आहे. हिंदुत्ववादी आणि भांडवली मीडियाकडून मशीद परिसरातील विहीरीमध्ये शिवलिंग असल्याच्या खळबळजनक बातम्या जोरदारपणे पसरवल्या जात आहेत. ह्या प्रकरणांकडे लक्ष केंद्रित करून आर्थिक संकटाच्या चटक्यांची जाणीव क्षीण करता येतेय का त्याचा अंदाज घेणे सुरू आहे.

### ज्ञानवापी प्रकरणातील न्यायालयाची भूमिका

भारतीय न्यायपालिकेचे तकलादू धर्मनिरपेक्ष चरित्र अनेकदा दिसून आले आहे. ज्ञानवापी संबंधातील याचिकेच्या सुनावणीतुनही ते स्पष्ट होत आहे. 1986 साली मशिदीला टाळे ठोकलेले असतानाही आणि न्यायालयातील वादींपैकी कोणीही प्रतिवादाला उपस्थित नसताना, एका त्रयस्थ अर्जदाराच्या विनंतीवरून अयोध्येत पूजा करण्याचा निर्णय सुद्धा "आश्चर्यकारक"रित्या खालच्या एका न्यायालयानेच दिला होता. ज्ञानव्यापी प्रकरणात 1991 च्या प्रार्थना स्थळे (विशेष तरतुदी) अधिनियमाला दृष्टीआड करून न्यायालयाने पुरातत्व खात्याला `पुराव्यांना सुरक्षित ठेवण्याच्या' नावाखाली सर्वेक्षणाची परवानगी दिली आणि वादात तेल ओतण्याचेच काम केलेले आहे. मथुरेतील जिल्हा न्यायालयानेही मागे श्रीकृष्ण जन्मभूमी प्रकरणी याचिकेवर सुनावणी करण्यास परवानगी दिली आहे. मागील काही काळातील बाबरी मशीदीपासून ते काश्मीरमध्ये 370, 35 (अ) हटवल्यानंतर `हेबिअस कॉर्पस रिट पेटीशन' पर्यंत वेगवेगळ्या मुद्द्यांवरील **कोर्टाच्या निकालांतून कोर्टावरील बहुसंख्यांकवादी दबाव आणि कोर्टाचा बहुसंख्यांकवादी कल स्पष्ट होतो.**

### मंदीरे पाडल्याचे कपोलकल्पित आकडे!

मागील काही काळात ताजमहाल हा तेजो महालय मंदिर असल्याचा दावा, कुतुबमिनार परिसरातील कुव्वातुल इस्लाम मशिदीत पूजा करण्याची मागणी, मथुरेतील मशीद श्रीकृष्ण जन्मभूमीवर उभी असल्याचा दावा, दिल्लीच्या जामा मशिदीखाली देवतांच्या मूर्ती असण्याचा दावा व तिथे उत्खनन झाले पाहिजे अशी मागणी झालेली आहे. बीबीसी मराठीच्या एका बातमी नुसार 'रिक्लेम टेंपल्स' नावाच्या गटाशी संबंधित असलेल्या विमल व्ही यांच्या म्हणण्यानुसार, "मुस्लिम राज्यकर्त्यांनी एक लाख हिंदू मंदिरं नष्ट केली. त्यामुळे आता हिंदूंची मंदिर परत घेण्याकडे 'ऐतिहासिक न्यायाच्या' दृष्टीकोनातून पाहिले पाहिजे". माजी मंत्री आणि भाजप नेते के.एस. ईश्वरप्पा यांनी म्हटलंय की, 'मुघलांनी 36 हजार हिंदू मंदिरं पाडली. आता ती कायदेशीररित्या परत घेतली पाहिजेत'. तर काही हिंदू संघटना मुस्लिम शासकांनी सुमारे 60 हजार हिंदू मंदिरे पाडली असल्याचा दावा करतात. ह्याच बातमीनुसार डी.एन झा आणि रिचर्ड ईटन या इतिहासकारांच्या मते, इतिहासात फक्त 80 हिंदू मंदिरांचं नुकसान झाल्याचे पुरावे आहेत. नष्ट झालेल्या हिंदू मंदिरांच्या संख्येबाबत इतिहासकार हरबंस मुखिया म्हणतात, "60 च्या दशकात काही वृत्तपत्रांमध्ये 300 मंदिरे पाडण्यात आल्याच्या बातम्या येऊ लागल्या. त्यानंतर पुढील दोन-तीन वर्षांत ही संख्या 300 ते 3,000 पर्यंत वाढली. त्यानंतर 3,000 ते 30,000 बनली आहे." म्हणजे व्यवस्थेच्या गरजेनुसार देशभरात तीस हजार ते 1 लाख स्फोटकांत दारुगोळा भरण्याचे काम संघाकडून होऊ शकते.

### इतिहासातील धर्मस्थळांचा विध्वंस एक संक्षिप्त अवलोकन

इतिहासात जगातील सर्व भागांत मुख्यतः आर्थिक आणि राजकीय कारणांनी व गौणरित्या धार्मिक कारणांनी धर्मस्थळांची लुटपाट, मोडतोड झालेली आहे. त्याचे कारण धर्मस्थळे ही सत्ताकेंद्रांसोबत घट्ट संबंध असलेली आणि अनेकदा अमाप संपत्ती संचित असलेली स्थळं राहिलेली आहेत. भारतातच बघायला गेलं तर हिंदू धर्मस्थळांवर फक्त मुस्लिम राज्यकर्त्यांनी हल्ले केले हे म्हणणे धर्मवादाने कलुषित डोक्याची उत्पत्ती आहे. **भारतातील हिंदू मंदिरं केवळ बाहेरून आलेल्या गैरहिंदू आक्रमकांनी लुटली आहेत हे ऐतिहासिक दृष्ट्या खरं नाही.** हे समजण्यासाठी काही उदाहरणे ५बघुयात. 'राजतरंगिणी' ग्रंथात उल्लेख केल्याप्रमाणे, काश्मीरमधील हिंदू राजा हर्षने देवळांमधील धन मिळवण्यासाठी 'देवोत्पाननायक' म्हणजे मूर्ती भंजक अधिकाऱ्याची नेमणूक केली. बीबीसीच्या बातमीनुसार इतिहासकार रिचर्ड ईटन लिहितात की, "भारतात पूर्वी मंदिरांमध्ये असलेले देव आणि त्यांचे राजेशाही संरक्षक यांच्यात घनिष्ट संबंध असायचे. आणि मध्ययुगीन भारताच्या सुरुवातीच्या काळात शाही घराण्यांमधील कलहांमुळे मंदिरांचा अपमान व्हायला सुरुवात झाली." ईटन लिहितात की, स्थानिक मान्यतेनुसार सन 642 मध्ये पल्लव राजा नरसिंह वर्मन-प्रथम याने चालुक्य राजधानी वातापीमधून (बदामी) गणेश मूर्ती लुटली. आठव्या शतकात, बंगाली सैन्याने राजा ललितादित्यविरुद्ध सूड उगवला. याच दरम्यान काश्मीरमधील ललितादित्यच्या राज्यातील राजदेव विष्णू वैकुंठाची मूर्ती नष्ट केल्याचं त्यांना वाटतं. इतिहासकार हरबंस मुखिया यांच्या म्हणण्यानुसार, `राजघराण्यांना मंदिरांमधून वैधता मिळायची. आणि विरोधकांची मंदिरं नष्ट करणं म्हणजे विरोधकांच्या शक्ती आणि वैधतेवर हल्ला करण्यासारखं होतं'. पुढे ते म्हणतात, "त्यावेळी असे प्रश्न विचारले जायचे की, तू कसला राजा जो आपलं मंदिर ही वाचवू शकला नाहीस." हरबंस मुखिया यांच्या म्हणण्यानुसार, "मंदिरांवरील हल्ल्याचं आणखी एक कारण म्हणजे तिथून मिळणारं सोनं, हिरे आणि दागिने". डी. एन. झा पुष्यमित्र शुंगाबद्दल लिहितात की, त्याने पाटलीपुत्र (आजचे पाटणा) येथील बौद्ध विहार नष्ट केले असावेत. झा लिहितात की, शुंगाच्या राजवटीत करण्यात आलेल्या सांची येथील बौद्ध स्थळांसह अनेक इमारतींच्या तोडफोडीचे पुरावे सापडले आहेत. **चीनी प्रवासी ह्युएन त्सांगच्या भारत भेटीचा हवाला देत झा म्हणतात की, शिवभक्त मिहिरकुलने 1,600 बौद्ध स्तूप आणि विहार नष्ट केले आणि हजारो बौद्धांना मारले.** डी. एन. झा प्रसिद्ध नालंदा विद्यापीठाविषयी लिहितात की, तिथल्या ग्रंथालयांना `हिंदू कट्टरतावाद्यांनी आग लावली' आणि नाव मात्र बख्तियार खिलजीचं पुढं करण्यात आलं, जो कधी तिथे गेला ही नव्हता. म्हणून भारतातील हिंदू धर्मस्थळांवर फक्त मुस्लिम राज्यकर्त्यांनी हल्ले केले हे म्हणणे वस्तुस्थितीशी दुरदुरपर्यंत संबंध नसणारे आणि सांप्रदायिकतेने कलुषित डोक्याची उत्पत्ती आहे.

पण हे सगळे मुद्दे आजच्या राजकारणाचे वास्तव बनवले जात आहेत. त्यामुळे अशा सगळ्या प्रश्नांवर योग्य कामगार वर्गीय दृष्टिकोन जनतेच्या एकतेसाठी व खऱ्या राजकीय संघर्षासाठी अत्यंत आवश्यक आहे. कामगार वर्गाने हे लक्षात घेतले पाहिजे की मुख्यतः फॅसिस्ट शक्तींकडून व कधी कधी इतर प्रतिक्रियावादी शक्तींकडूनही असे अनेक मुद्दे वेळोवेळी उपस्थित केले जात राहतील. इतिहास बघा आणि असे मुद्दे कधी समोर आणले जातात ते लक्षात घ्या. **भांडवलशाही आहे तोपर्यंत भविष्यातही गरजेनुसार असे मुद्दे नक्कीच समोर येत राहतील.** कॅडर आधारित फॅसिस्ट चळवळ समाजाच्या नसानसांत उतरून कावेबाजपणे धिम्यागतीने पण सतत द्वेषाची आणि फुटीची बीजं रुजवत राहते. पण अशा मुद्द्यांना खतपाणी घालण्याचे काम आर्थिक किंवा राजकीय संकटांच्या अपरिहार्यतांच्या काळात केले जाते, जसे की जनविरोधी कायदे/धोरणे आणण्याचा किंवा राबवायचा काळ, निवडणूका, प्रगतिशील व व्यवस्थाविरोधी जनआंदोलनांचा उभार, आर्थिक धोरणांसंबंधातील अपयश, असंतोष किंवा संकट, व्यवस्थेच्या राजकीय संकटांचा काळ. उदाहरणादाखल **1986 साली जेव्हा बाबरी मशिदीचे द्वार खुले केले गेले आणि मंदिराचे भूमिपूजन करण्यात आले तेव्हा देश आर्थिक संकटाच्या तोंडावर होता.** 1990 च्या दशकाच्या सुरवातीला जेव्हा राम मंदिर आणि मंडल आयोगाचा मुद्दा उभा राहिला त्यावेळीही देशातील अर्थव्यवस्था अंतर्गत भांडवल संचयाचे संकट आणि व्यापारी तूट आणि परकीय चलनाच्या संकटात होती; महागाई, बेरोजगारी आणि गरिबीमुळे जनतेच्या मनात राग खदखदत होता.

आजही बघा, कोविडपूर्व काळातील मंदीचे संकट कोविड काळातील मागणी आणि पुरवठ्याच्या धक्क्यामुळे आणि आता रशिया-युक्रेन युद्धामुळे अजून गडद होत आहे. इंधनापासून ते जीवनावश्यक सर्व गोष्टींची महागाई, अभूतपूर्व बेरोजगारी, गरिबी आणि सरकारचे अर्थव्यवस्थेच्या सर्व आघाड्यांवरील अपयशामुळे आज अशा सर्व मुद्द्यांना परत खतपाणी घातले जात आहे. नजीकच्या काळात देशभरात रामनवमी आणि हनुमान जयंतीला मोठ्या मिरवणूका काढून धार्मिक उन्माद व दंगल सदृश्य स्थिती निर्माण करणे, मुस्लिमांना (मुखतः गरीब मुस्लिमांना) निशाणा बनवणारे बुलडोझर अभियान, महाराष्ट्रात मनसेकडून भोंग्याचा मुद्दा असे अनेक मुद्दे उपस्थित केले जात आहेत. ह्यातून हिंदू-मुस्लिमांमध्ये सतत तणाव, शहरं गावांमध्ये कर्फ्यु आणि शक्य झाले तिथे छोटे मोठे दंगे सुद्धा घडवले जात आहेत. जनतेच्या वाढत्या असंतोषाला धर्मवादी रंग दिला जात आहे किंवा लाठी बंदुकीच्या जोरावर दाबण्याचा प्रयत्न केला जात आहे. आज संपूर्ण देशभरात धार्मिक कट्टरता व जातीवादी उन्माद निर्माण करण्यामागचा सत्ताधाऱ्यांचा उद्देश एकदम स्पष्ट आहे.

### धार्मिक उन्मादाच्या अशा घटनांसंबंधातील कामगार वर्गीय दृष्टिकोन

कामगार वर्गाने हा विचार करणे गरजेचे आहे की **इतिहासाची चाकं उलटी फिरवली जाऊ शकतात का व जावीत का? इतिहासातील घटनांचा न्याय आज केला जाऊ शकतो का? कामगार वर्गाचे हित भूतकाळातील शव उकरून काढण्यात आहे की भविष्यशोध आणि भविष्य निर्मितीत आहे?** जगात कुठे कुठली धर्मस्थळ का व कशी बनली हा खरं तर कामगार वर्गाचा प्रश्नच नाही. कारण जगातील अनेक धर्मस्थळं ही इतर धर्मस्थळांच्या विध्वंसावर उभी राहिलेली आहेत. आपण वरती बघितल्याप्रमाणे भारतातच अनेक हिंदू धर्मस्थळं बौद्ध धर्मस्थळांच्या अवशेषांवर उभे आहेत. आणि मग हा मुद्दा फक्त धर्मस्थळांपुरता मर्यादित कसा राहील? इतिहासातील हरेक गोष्टीला हा दृष्टिकोन लावला जाऊ शकतो. मग देशात प्राचीन काळापासून सर्वात जास्त शोषित, अपमानित दलितांनी त्यांच्या वंशजांच्या अधिनस्ततेचा बदला त्याकाळातील शोषक पुरोहित, क्षत्रिय, सामंतांच्या आजच्या वारसांना अधिनस्त स्थितीत पोहोचून घ्यावा लागेल. तसेच महिलांची पितृसत्ताक गुलामी अत्यंत प्राचीन आहे; त्यांना स्त्रीसत्ताक व्यवस्था आणून पुरुषांना अधिनस्त स्थितीत घेऊन जाण्याचा कार्यक्रम बनवावा लागेल. **स्त्रियांनी एकेकाळी भारतातील काही भागांत अत्यंत अमानुष अशी सतीप्रथा होती त्याचा बदला आता 'सताप्रथा' सुरू करून घ्यावा का?** थोडाही तार्किक विचार केला तर असे तर्क किती प्रतिक्रियावादाकडे जाऊ शकतात हे कोणाच्याही लक्षात येईल. कामगार वर्गाची भूमिका ह्या प्रतिक्रियावादाला हाणून पाडण्याची असायला हवी. क्रांतिकारक वर्ग म्हणून एकंदर वर्ग समाजाचा अंत करून इतिहासातील सर्व प्रकारच्या अन्याय-शोषणाचा अंत करण्याची असायला हवी.

आज देशात कामगार वर्गाची स्थिती अभुतपूर्व शोषण आणि संकटाची आहे.

पान 14 वर

# देहविक्रय 'व्यवसाय' नाही, पतीत समाजव्यवस्थेचे लक्षण आहे!

## मानवी शरीराला खरेदी-विक्रीची गोष्ट बनवणाऱ्या बाजारी मानसिकतेचा धिक्कार असो!

**अश्विनी**

नुकत्याच आलेल्या सुप्रीम कोर्टाच्या निकालानुसार देहविक्रय हा इतर व्यवसायांसारखाच व्यवसाय आहे आणि देहविक्रय करणाऱ्या महिलासुद्धा कायद्यानुसार सन्मान आणि समान संरक्षण मिळण्यास पात्र आहेत. हा निकाल आल्यापासून देहविक्रय करणे कायदेशीर असावे की नसावे यावर चर्चा सुरू झाली आहे. नागरिकांनी, आणि मुख्यतः पोलिसांनी, देहविक्रय करणाऱ्यांप्रती संवेदनशील राहण्याची गरज आहे असे मत न्यायमूर्ती एल. नागेश्वर राव, बी. आर. गवई आणि ए. एस. बोपण्णा यांनी नोंदवले आहे.

**सुप्रीम कोर्टाचा हा निर्णय भांडवली व्यवस्थेने जन्मास घातलेल्या बाजारी मूल्य-मान्यतांच्या आधारावर दिलेला निर्णय आहे.** असे करून भारत त्या भांडवली देशांच्या पंगतीत सामील झाला आहे, ज्यांनी मानवी देहाला सुद्धा बाजारातील क्रयवस्तू म्हणून मान्यता दिली आहे. देहविक्रय म्हणजेच मानवी शरीराचे 'माला'मध्ये रूपांतरण हे मानवी शोषणाचं अत्यंत बीभत्स रूप आहे. कोणत्याही व्यक्तीचा शेवटचा 'किल्ला', तिच्या सार्वभौम अस्तित्त्वाची शेवटची निशाणी आहे तिचे शरीर. या शरीराची खरेदी-विक्री करण्यास व्यक्ती तेव्हाच तयार होऊ शकते जेव्हा प्रस्थापित समाजाच्या चौकटीत जगणे असह्य बनवले जाईल. **बाजाराच्या वैचारिक चौकटीत देहविक्रय करणे कायदेशीर की बेकायदेशीर या मुद्द्यावर नव्हे, तर त्याचा खात्मा कसा करता येईल, त्याला मुळापासून कसं मिटवता येईल आणि स्त्रियांचं वस्तूकरण थांबवून त्यांना सन्मानजनक आयुष्य कसं देता येईल ह्या गोष्टींवर आज वाद विवाद, चर्चा होणं जास्त महत्वाचे आहे.**

### भारतात चालतो प्रचंड देहव्यापार

भारतात यासंबंधी कोणतीही अधिकारिक आकडेवारी गोळा केलीच जात नसल्यामुळे याबद्दलचे सुसंगत आकडे मिळत नाहीत. यु.एन. एड्स संस्थेच्या अंदाजानुसार 2016 पर्यंत भारतात देहविक्रय "व्यवसाय" करणाऱ्यांची संख्या 6,57,827 होती, जी 2021 पर्यंत 7.5 लाखावर गेली. पश्चिम बंगाल मधील सोनिगाची हे आशिया खंडातील सर्वात जास्त देहविक्रय करणाऱ्यांचे म्हणजे 14,000 देहविक्रय करणाऱ्यांची संख्या असलेले शहर आहे. दोन नंबर मुंबईतील कमाठीपुरा 7000 संख्येसह आणि 400 कुंटणखान्यांसहित तिसरा नंबर पुण्यातील बुधवार पेठ, शुक्रवार पेठेचा लागतो. इतर काही अंदाजांनुसार भारतासारख्या "महासत्ता" बनू पाहणाऱ्या देशामध्ये 30 लाख ते 1 कोटी पर्यंत महिलांना देहविक्रय करण्यास भाग पाडले जाते.

वयाच्या 12 वर्षापासून मुलींची तस्करी सुरू होते. मोठमोठ्या शहरांमधून आणून बळजबरीने त्यांना ह्या व्यवसायात ढकलले जाते. अँटी ट्रॅफिकिंग करणाऱ्या अनेक संस्था ट्रॅफिकींग वर लगाम बसवण्यासाठी, व्यवसायात नवीन तरुणींना येण्यापासून रोखण्यासाठी पूर्ण प्रयत्नशील असतात परंतु समस्येच्या मुळावरच घाव घालण्यासाठी कुठलीही एनजीओ अस्तित्वात असणे शक्य नाही, कारण एन.जी.ओ. चे काम बाजाराचे रक्षण आहे, ना कि त्याला विरोध. वारंवार मलमपट्टी करण्यासाठी म्हणजेच पुनर्वसन, दुसऱ्या व्यवसायांचा पर्याय देणारे, वेश्यांच्या मुलांना शिक्षणाची व्यवस्था, समाजात सन्मानाचे स्थान, लॉकडाऊन सारख्या कठीण काळात राशन पाणी, थोडक्यात मदत आणि कल्याणकारी योजना पुरवणाऱ्या संस्था अनेक आहेत. पण सर्वांचे काम मूळ समस्येबाबत कानाडोळा करणेच आहे. म्हणून




सोवियत रशियातील देहविक्रयाविरोधातील पोस्टर

आज देहविक्रय कायदेशीर करण्यावर वाद चालू आहेत पण ते मुळापासून संपवण्यासाठी मात्र कोणतीही चर्चा चालू नाही.

### देहविक्रयाचा इतिहास आणि भांडवलशाहीने दिलेली "मान्यता"

देहविक्रयाची गुलामी भारतात नव्हे जगभरात खूप प्राचीन काळापासून चालत आली आहे. खाजगी संपत्तीच्या उदयासोबतच कुटुंबव्यवस्था जन्माला आली, समाज वर्गांमध्ये विभागला गेला आणि त्याबरोबरच स्त्रीची दास्यता सुरू झाली. कुटुंबसंस्थेच्या रूपाने स्त्रीवर नियंत्रण स्थापित होण्यापासूनच स्त्रीदेहाच्या विक्रयाची कल्पनासुद्धा जन्मास आली. आजवर देहविक्रयाला समाजाने "पाप" या नजरेनेच पाहिले, जेव्हा की समाजानेच सक्तीने स्त्रीवर लादलेल्या पितृसत्तारुपी व्यवस्थेचेच ते दुसरे रूप होते, ज्यामध्ये **एकीकडे स्त्रीला चूल-मूल मध्ये बंदिस्त करून "पतिव्रता" होण्याचे बंधन टाकले गेले, तर दुसरीकडे पुरुषांच्या स्वैराचाराकरिता देहविक्रयाची गुलामगिरीही जन्माला घातली गेली.** "देवदासी" सारखे व्यवसाय तर धार्मिक मान्यतेने चालणारे लैंगिक शोषणाचे प्रकार होते आणि "तवायफ" म्हणून तथाकथित "राजमान्यता" असणारे प्रकारही. एकंदरीत स्त्रीचे स्वतंत्र अस्तित्व नाकारत, तिला "चूल आणि मूल" पुरतेच मर्यादित ठेवणाऱ्या व्यवस्थेत तिला "वैध" किंवा "अवैध" मार्गाने पुरूषांची देहगरज भागवण्याची भोगवस्तू म्हणूनच स्थान दिले गेले. **वेश्यांमुळे "आपल्या घरातील स्त्रिया" सुरक्षित आहेत असा विचार आजही सर्रास मांडला जातो. पुरूषांची वासना तर राहणारच, आणि तिला शमवण्याकरिता "आपल्या घरातील" नव्हे तर इतर कोणी महिला बळी जात असतील तर ते चांगलेच आहे असा हा घृणास्पद विचार** याच पुरुषसत्ताक मानसिकतेची निशाणी आहे.

भांडवली व्यवस्थेत देहविक्रयाला "व्यवसाय" स्वरूप प्राप्त झाले. भांडवली व्यवस्था ही "माला"च्या खरेदी विक्रीचीच व्यवस्था आहे. **भांडवलशाहीच्या विस्तारासोबत बाजाराचा विस्तार होत जातो आणि प्रत्येक गोष्ट विक्रेय होत जाते. प्रत्येक वस्तूला "माल" बनवण्याच्या प्रक्रियेत, जिथे पाणी, हवा सुद्धा "माल" बनले, मानवी नाती आणि मानवी शरीरही सुटले नाही.** आई-वडील वा तत्सम नाती भाड्याने घेण्याचा व्यवसाय काही "विकसित" भांडवली देशांमध्ये चालला. याच बाजाराच्या व्यवस्थेने देहविक्रयालाही "व्यवसाय" म्हटले नसते तर नवल. स्वीडन, नॉर्वे, जर्मनी सारख्या देशांमध्ये देहविक्रयाला "व्यवसाय" म्हणून कधीच परवानगी देण्यात आली आहे आणि इथे अधिकृतरित्या हा व्यापार चालतो.

**भांडवलशाहीने फक्त या घृणास्पद गोष्टीला व्यवसाय म्हणून मान्यता दिली नाही, तर यात प्रचंड वाढ करवली आहे.** प्रचंड मोठ्या प्रमाणात त्या महिलांना देहविक्रयाकडे ढकलले गेले आहे ज्यांना जीवनात इतर कोणत्याही मार्गाने उपजीविका चालवण्याचे मार्ग उपलब्ध नव्हते. उदाहरणार्थ, भांडवली व्यवस्थेने उध्वस्त केलेल्या, **प्रचंड गरिबी आणि बेरोजगारी असलेल्या थायलंड सारख्या देशामध्ये जवळपास 25 टक्के महिलांना देहविक्रय करण्यास भाग पाडले गेले आहे** आणि इथे "सेक्स टुरिझम" (देहविक्रय पर्यटन) सारखे "उद्योग" विकसित झाले आहेत. ही कोणतीही छुपी गोष्ट नाही की मोठ्या प्रमाणात गरीब घरांमधील मुलींची सर्रास विक्री केली जाते आणि देहविक्रयाभोवती संघटित गुन्हेगारीच्या अनेक टोळ्या कुंटणखान्यांसोबत मिळून काम करतात. नेपाळ, बांग्लादेश सारख्या तुलनेने अधिक दैन्यावस्थेतील देशांमधून मोठ्या प्रमाणात मानवी व्यापार केला जातो आणि भारतातील वेश्या-वस्त्यांमध्ये अल्पवयीन व सज्ञान महिलांना सक्तीने आणले जाते. प्रचंड दैन्य, बेरोजगारी, गरिबीमुळे जगण्यासाठी कोट्यवधी महिला नाईलाजाने देहविक्रयात ढकलल्या जातात, किंवा सक्तीने त्यांना भाग पाडले जाते.

### देहविक्रय "स्वेच्छेने" होतो का?

सुप्रीम कोर्टाच्या निर्णयानंतर "आम्ही स्वतःच्या इच्छेने ह्या व्यवसायात आलो आणि आता तो व्यवसाय चुकीचा की बरोबर यावरुन कोणी हिणवणार नाही" अशा प्रतिक्रिया सुद्धा काही वेश्यांच्या मुलाखतींमधून झळकल्या. देहविक्रयातून "पोराबाळांचे शिक्षण करून स्वतःचे घर बांधण्याचे स्वप्नदेखील पूर्ण केले" अशाही प्रतिक्रिया प्रसारमाध्यमांनी प्रसारित केल्या. **थोडक्यात देहविक्रयामध्ये अनेक महिला स्वखुशीने काम करत आहेत अशी प्रतिमा निर्माण केली जात आहे.**

देहविक्रयात **कोट्यवधी महिलांना बळजबरीने किंवा नाईलाजानेच आणले जाते,** परंतु काही प्रमाणात भांडवलशाहीने निर्माण केलेल्या चंगळवादी, भोगवादी संस्कृतीने आणि मानवी प्रेमाबद्दल वाढीस लावलेल्या शरीरसुखकेंद्री मूल्यव्यवस्थेने असाही वर्ग तयार केला आहे जो याकडे खरोखर "व्यवसाय" म्हणून पाहतो आणि **"हर चीज बिकती है" सारख्या भांडवली पतनशील मूल्यमान्यतांना स्विकारून या "व्यवसाया"त उतरतो. अनेक उच्चभ्रू "एस्कॉर्ट" सेवा** किंवा "मसाज" पार्लरच्या नावाने काही ठिकाणी चालणारे व्यवसाय याच श्रेणीत मोडतात. एकंदरीत जिथे प्रत्येक गोष्टच विकाऊ झाली आहे अशी पतनशील संस्कृतीच या अमानवीय बाजाराच्या वाढीचे कारण आहे. देहविक्रयाला "सेक्स वर्क" म्हणवणे, थोडक्यात त्यालाही उत्पादक कामाच्या श्रेणीत गणणे हे पतनशील बाजारी मानसिकताच करू शकते.

परंतु एखाद्या अमानवीय कामामध्ये दीर्घकाळ काम केल्यानंतर मानवीयतेच्या मूल्यांचा लोप होणे, ज्या समाजाने सन्मानाने जगण्याचा कोणताच मार्ग शिल्लक ठेवलेला नाही, अशा समाजाप्रती असलेली घृणा या अमानवीय व्यवसायाच्या "स्विकृतीत" परिवर्तित होणे, कुटूंबसंस्थेने स्त्रीवर लादलेल्या गुलामीपेक्षा बाजाराने दिलेले फसवे स्वातंत्र्य जास्त हवेसे

पान 14 वर

• संपादक मंडळ – निखील एकडे, बबन ठोके • संपादकीय कार्यालय- रूम नंबर 209, हीरानंदानी बिल्डिंग, 7-बी, लल्लुभाई कंपाऊंड, मानखुर्द (वेस्ट) मुंबई 400043
मो. नं. 8669735643 , 9619039793 • जागृति प्रिंटर्स, 12-ए, ग्राउंड फ्लॉर, भायखला सर्विसेज इंडस्ट्रीज, भायखळा, मुंबई - 9820017588 येथे मुद्रित